CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

आजचा सामना




मुंबई इंडियन्स वि. सनरायजर्स हैद्राबाद
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : राजीव गांधी स्टेडियम, हैद्राबाद

सोलापूर | बुधवार, २३ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १६५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प




ज्याप्रमाणे शरीराला त्याच्या अवयवांमध्ये समन्वयाची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे प्रशासनाने सर्व सामाजिक अवयवांचे सुसंवादी कार्य सुनिश्चित केले पाहिजे.
**- पं. दीनदयाल उपाध्याय,**
पूर्व अध्यक्ष भारतीय जनसंघ

## महत्त्वाचे

### बाजारात पुन्हा तेजीचा माहौल

**मुंबई** : सलग पाच सत्रांनंतर मंगळवारी देशांतर्गत शेअर बाजार तेजीने बंद झाला. मुंबई बाजारातील निर्देशांक १८७ अंकांनी वाढून ७९,५९५ वर बंद झाला तर निफ्टी ४१ अंकांनी वाढून २४,१६७ वर बंद झाला. मुंबई बाजारातील ३० पैकी १४ शेअर्स हिरव्या तर १६ शेअर्स लाल रंगात बंद झाले. सर्वाधिक वाढणाऱ्या कंपन्यांमध्ये आयटीसी, हिंदुस्थान युनिलिव्हर, महिंद्रा, एचडीएफसी बँक यांचा समावेश आहे. सर्वाधिक तोट्यात राहिलेल्या कंपन्यांमध्ये इंडसइंड बँक, पॉवरग्रीड, भारती एअरटेल, बजाज फिनसर्व्ह यांचा समावेश आहे.



### पातूर तालुक्यात 'मनरेगा'द्वारे मोठी रोजगार निर्मिती

**अकोला** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत पातूर तालुक्यात सन २०२४-२५ मध्ये मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. यंदा ४ लक्ष ३० हजार ७०६ मनुष्य दिवस निर्मिती झाल्याची माहिती तालुका प्रशासनाने दिली आहे. तालुक्यात अद्याप मग्रारोहयोअंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीर, विहीर पुनर्भरण, तुती लागवड, वृक्ष लागवड, नाला खोलीकरण, रस्ता खडीकरण, शेत, पांदण रस्ते आदी वैयक्तीक व सार्वजनिक स्वरुपाची कामे सुरू असून, या कामावर ग्राम पंचायत स्तरावरील मजुरांना काम उपलब्ध करून देण्यात येते. तालुक्यात आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मग्रारोहयो अंतर्गत एकूण ४ लाख ३० हजार ७०६ मनुष्य दिवस निर्मिती झाली आहे.

### पोप फ्रान्सिस यांच्यावर २६ एप्रिलला अन्त्यसंस्कार

**व्हॅटिकन** : कॅथोलिक ख्रिश्चन धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांच्यावर अन्त्यसंस्कार २६ एप्रिल रोजी होणार आहेत. व्हॅटिकनने ही माहिती दिली. त्यांच्या मृत्यूनंतरचा त्यांचा पहिला फोटोही प्रसिद्ध झाला आहे. त्यांचे पार्थिव शवपेटीत ठेवण्यात आले आहे. पार्थिवाच्या जवळ धार्मिक नेत्यांनी प्रार्थना केली. अंत्यसंस्काराची तयारी आजपासून सुरू होईल. कॅथोलिक चर्चचे कार्डिनल्स (याजक) व्हॅटिकनला येतील.

# काश्मिरात हिंदूंचे 'टार्गेट किलिंग'

## अतिरेक्यांचा पर्यटकांवर गोळीबार, २६ ठार

**२० जखमी; अनंतनाग जिल्ह्याच्या पहलगाममधील घटना**

**◆ जम्मू, २२ एप्रिल**

**जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास लष्करी गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी पर्यटकांवर बेछूट गोळीबार केला. यात २६ नागरिक ठार, तर २० जखमी झाले. मृतकांमध्यो दोन विदेशी पर्यटकांचा समावेश आहे. टीआरएफ या स्थानिक अतिरेकी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या घटनेनंतर सुरक्षा दलाने परिसराला घेरले असून, अतिरेक्यांचा युद्धपातळीवर शोध सुरू केला आहे.**



एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, पहलगाम येथे पर्यटक निसर्गाचा आनंद लुटत असताना गवताळ भागात दबा धरून बसलेल्या तीन ते चार अतिरेक्यांनी गोळीबार करण्यास सुरुवात केली. जखमी झालेल्या एका महिलेने गोळीबार सुरू असताना कुटुंबीयांना फोनवरून घटनेचा माहिती दिली. यानंतर कुटुंबातील सदस्याने पोलिसांना माहिती दिल्यानंतर घटनास्थळापासून काही अंतरावर तैनात असलेल्या सुरक्षा दलाला याची माहिती देण्यात आली. काही मिनिटातच जवान तेथे पोहोचले, तोपर्यंत अतिरेक्यांनी पळ काढला होता.

पहलगाम हल्ल्यानंतर गृहमंत्री अमित शाह यांनी आपत्कालीन बैठक बोलावली, ज्यात आयबी प्रमुख आणि गृहसचिव उपस्थित होते. बैठकीनंतर गृहमंत्री श्रीनगरला रवाना झाले. तत्पूर्वी, त्यांनी पंतप्रधान मोदींना घटनेची सविस्तर माहिती दिली. गृहमंत्री शाह म्हणाले की, निष्पाप नागरिकांवर झालेला हा क्रूर हल्ला भ्याड आणि अत्यंत निंदनीय आहे. भयानक हल्ल्यात सहभागी असलेल्यांना सोडले जाणार नाही. आम्ही दोषींवर कठोर कारवाई करू. (वृत्तसंस्था)

### आधी धर्म विचारला, नंतर झाडल्या गोळ्या

जखमी झालेल्या एका महिलेने सांगितले की, दहशतवाद्यांनी पर्यटकांना आधी नाव विचारले आणि हिंदू असल्याची ओळख पटल्यावर गोळीबार केला. अतिरेक्यांनी पर्यटकांना सुरुवातीला त्यांचे नाव विचारले तसेच हिंदू की, मुस्लिम असेही विचारले. हिंदू असलेल्या नागरिकांना लक्ष्य करीत त्यांनी गोळ्या झाडल्या.

### दोषींना सोडणार नाही

भ्याड दहशतवादी हल्ल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र निषेध केला. त्यांनी एक्सवरील पोस्टमध्ये लिहिले की, पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मी तीव्र निषेध करतो. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले, त्यांच्याबद्दल माझ्या संवेदना आहे. जखमी लोक लवकरात लवकर बरे व्हावेत, अशी मी प्रार्थना करतो. या घृणास्पद कृत्यामागील लोकांना सोडणार नाही. त्यांचा नापाक अजेंडा कधीही यशस्वी होणार नाही.
● **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### प्रशासनाकडून सर्वतोपरी मदत

जिल्हा प्रशासन आणि आरोग्य अधिकाऱ्यांना पहलगाममध्ये दाखल झालेल्यांना त्वरित वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. जखमी पर्यटकांना अनंतनाग येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्ला करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाईल. तसेच पीडितांना आणि राज्यात येणाऱ्या पर्यटकांना प्रशासनाकडून सर्वतोपरी मदत दिली जाईल
● **मनोज सिन्हा,** नायब राज्यपाल

### गुन्हेगार अमानुष, घृणास्पद

आमच्या पाहुण्यांवरील हा हल्ला घृणास्पद कृत्य आहे. या हल्ल्याचे गुन्हेगार अमानुष आणि घृणास्पद आहेत. निषेध करण्यासाठी शब्द पुरेसे नाहीत. मृतांच्या कुटुंबीयांबद्दल मी संवेदना व्यक्त करतो. मी माझ्या सहकाऱ्यांशी बोललो आहे आणि ते जखमींच्या व्यवस्थेची देखरेख करण्यासाठी रुग्णालयात आहेत.
● **उमर अब्दुल्ला,** मुख्यमंत्री

# पंच परिवर्तन आचरणात आणावे


## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**◆ हरिगड (अलीगड), २२ एप्रिल**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सांगितलेले पंच परिवर्तन हा केवळ भाषणाचा विषय नाही, तर सर्वांनी आपल्या व्यवहारात, आचरणात तो आणला पाहिजे. प्रथम आपण ही पंचसूत्री आपल्या जीवनात अंगीकारावी. शाखेतील प्रत्येक स्वयंसेवकाला पंचसूत्रीचे स्मरण करून द्यावे. त्यानंतर आपण समाजात आग्रह करू तर याचा परिणाम नक्कीच दिसेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

अलीगड येथील पाच दिवसांच्या प्रवासात अखेरच्या दिवशी आपल्या उद्‌बोधनात सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, संघाकडून समाजाला बऱ्याच आशा आहेत. अशा स्थितीत आपण समाजासमोर जे काही ठेवले ते स्वीकारण्यास समाज तयार आहे. त्यासाठी आपल्याला पूर्ण तयारीनिशी समाजात जाण्याची गरज आहे. समाजाला आपण देत असलेल्या पंचसूत्रीविषयी प्रत्येक शाखेतील स्वयंसेवकाला माहिती असली पाहिजे.

यातील पहिला मुद्दा म्हणजे सामाजिक समरसता. या माध्यमातून समाजातील भेदभाव नष्ट करायचा आहे. आपल्याला जातिभेद नष्ट करून समाजातील विविध घटकांपर्यंत जायचे आहे. त्यांच्या घरी जायचे आणि त्यांनाही आपल्या घरी बोलवायचे. स्वयंसेवक सामाजिक समरसतेचे उदाहरण समोर ठेवू शकतात. दुसरा मुद्दा कुटुंब प्रबोधन, हा अतिशय महत्त्वाचा विषय असून आजकाल कुटुंब व्यवस्था विस्कळीत होत असताना याचे महत्त्व वाढले आहे. तिसरा स्वदेशीचा मुद्दा असून चौथा पर्यावरण रक्षण आणि संवर्धन आहे. पाचवा अत्यंत महत्त्वाचा विषय नागरी कर्तव्यांचा आहे. देशाप्रति असणारे आपले नागरी कर्तव्य कोणते, हे जाणून घेणे आणि त्याचे पालन करणे हा समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा विषय आहे, असेही सरसंघचालक म्हणाले. (तभा वृत्तसेवा)



### डॉ. आंबेडकरांचा गौरवपूर्ण उल्लेख

सरसंघचालकांनी आपल्या उद्‌बोधनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरवपूर्ण उल्लेख करताना म्हटले की, समरसतेचे महान अग्रणी आणि घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या सर्वांसाठीच पूजनीय आहेत. त्यांचे योगदान कायम स्मरणात ठेवले जाईल. सामाजिक समरसतेतही त्यांचे प्रमुख योगदान राहिले आहे.

# पुढील तीन दिवसांत सूर्य आग ओकणार

### हवामान खात्याचा विदर्भाला हायअलर्ट

**◆ पुणे, २२ एप्रिल**

नागपूरसह विदर्भातील काही भागांत आगामी तीन दिवस उष्णतेची लाट कायम राहणार असून, या काळात बहुतांश ठिकाणी उष्णतेच्या लाटांचा इशारा देण्यात आला आहे.

चंद्रपूर, अकोला, अमरावती, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात पुढील पाच दिवस तापमानाचा चांगलाच चटका जाणवणार आहे. अकोल्यात पाच दिवस उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. अमरावती, चंद्रपुरातही चार दिवस तापमानाचा उद्रेक होणार असून, नागरिकांना उन्हापासून वाचण्यासाठी योग्य ती काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

राज्यभरातील तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. विदर्भात उष्णतेची लाट आली आहे. चंद्रपूर तर देशात सर्वांत उष्ण शहर ठरले आहे. अजून एप्रिल महिना सुरू असताना तापमानात इतकी वाढ होत आहे. अद्याप मे महिना उजाडला नाही. त्याआधीच उन्हाच्या काहिलीने नागरिक हैराण झाले आहेत.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा उच्चांक होताना दिसत आहे. उन्हाच्या चटक्याने नागरिक हैराण झाले आहेत. देशभरासह राज्यात विदर्भात पुढील दोन दिवस उष्णतेची लाट राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. (वृत्तसंस्था)



### चंद्रपूर @ ४५.८

**चंद्रपूर** : गेल्या दोन दिवसांपासून अख्ख्या जगात चंद्रपूरचे तापमान सर्वाधिक नोंदविले जात आहे. चंद्रपूरकरांना तप्त उन्हाचा सामना करावा लागत असून मंगळवार, २२ एप्रिलला चंद्रपूर ४५.८ तर ब्रह्मपुरी ४५.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदविले गेले. हे तापमान विदर्भात सर्वाधिक आहेच; जगातही अग्रेसर आहे.

चंद्रपुरात विदर्भातील सर्वाधिक तापमानाची नोंद होत असून त्या पाठोपाठ अकोला ४४.८, अमरावती ४४.४, नागपूर ४४.२, वर्धा ४४.२, गडचिरोली ४४, यवतमाळ ४४, वाशिम ४३.५, भंडारा ४३, गोंदिया ४२.७, बुलढाणा जिल्ह्यात ४०.४ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद घेण्यात आली आहे. मंगळवारी दुपारी महानगरात तप्त उन्हाचे चटके बसत होते. 'हॉट सिटी' म्हणून ओळख असलेल्या चंद्रपूरचा उन्हाळा राज्यात गाजतो. सर्वाधिक तापमानाची नोंद अनेकदा चंद्रपूर जिल्ह्यात होत असते. (तभा वृत्तसेवा)

# गोसेखुर्दसाठी २५,९७२ कोटी

**◆ मुंबई, २२ एप्रिल**

भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या कामासाठी २५ हजार ९७२ कोटी ६९ लाख रुपयांच्या खर्चाच्या तरतुदीस मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत चौथी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील १ लाख ९६ हजार ६०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे.

गोसेखुर्द प्रकल्प हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूराद्वारे राबविण्यात येत आहे. गोदावरी खोऱ्यातील वैनगंगा उपखोऱ्यात वैनगंगा नदीवर पवनी तालुक्यातील गोसेखुर्द येथे हा बहुउद्देशीय प्रकल्प साकारण्यात येत आहे. सिंचन, पिण्यासाठी पाणी, औद्योगिक पाणी पुरवठा व मत्स्यव्यवसाय व जलविद्युत निर्मिती असा हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पातून खुले कालवा वितरण, उपसा सिंचन व बंदिस्त नलिका वितरण या पद्धतीने नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांतील सिंचन क्षेत्राला लाभ होणार आहे. हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समाविष्ट आहे. (तभा वृत्तसेवा)



# पंतप्रधानांच्या विमानाला अभेद्य सुरक्षा

**◆ जेद्दाह, २२ एप्रिल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विमान एअर इंडिया वन हे मंगळवारी सौदी अरबच्या हवाई हद्दीमध्ये प्रवेश करताच त्यांच्या विमानाला सौदीच्या हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी एअर स्कॉट देत त्यांचे स्वागत केले. त्यांच्या विमानाला आकाशात लढाऊ विमानांनी अभेद्य सुरक्षा कवच प्रदान केले होते.

मंगळवारी मोदींचे विमान सौदीच्या हवाई हद्दीत पोहोचले, यावेळी हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी त्यांच्या विमानाला चहूबाजूंनी सुरक्षा देत अनो'या पद्धतीने स्वागत केले. सौदी अरबचे क्‍राऊन प्रिंस यांनी दिलेले निमंत्रण स्वीकार करून मोदी सौदी अरबच्या दोन दिवसीय दौऱ्यावर गेले आहेत. भारत आणि सौदी अरबमधील सामरिक भागीदारीच्या दृष्टीने त्यांचा हा दौरा खूप महत्त्वपूर्ण मानला जात आहे. संरक्षण आर्थिक क्षेत्रातील भागीदारीबाबत या दौऱ्यामधून चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या दौऱ्यात अनेक महत्त्वपूर्ण करारांवर सह्या होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)


# युपीएससी परीक्षेत पुण्याचा अर्चित डोंगरे देशात तिसरा व राज्यात प्रथम

### ▸▸ उत्तरप्रदेशच्या प्रयागराजची शक्ती दुबे देशात पहिली

**नवी दिल्ली, २२ एप्रिल-**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल जाहीर झाला असून देशभरातून १००९ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यापैकी राज्यातून ९० हून अधिक उमदेवारांनी घवघवीत यश मिळविले आहे. पहिल्या १०० मध्ये राज्यातील ७ उमेदवार आहेत. उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथील शक्ती दुबे देशात पहिली आली आहे. हर्षिता गोयल देशात दुसरी आली असून, पुण्याच्या अर्चित डोंगरेने देशात तिसरा तर राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे.

यंदाही यूपीएससी परीक्षेत महाराष्ट्राची मान उंचावली असून, ठाण्यासह विविध जिल्ह्यांतील उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. त्यात मुलींनी देदीप्यमान कामगिरी बजावली आहे. पुण्याचा अर्चित डोंगरे याने गुणवत्ता यादीत तिसरे स्थान पटकावले असून, ठाण्यातील तेजस्वी देशपांडे हिने ९९ वा क्रमांक मिळवला आहे. ठाण्याचीच अंकिता पाटीलही यशस्वी ठरली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर सुमारे १५ दिवसांनी उमेदवारांचे गुण जाहीर केले जातील. यूपीएससी नागरी सेवा परीक्षेच्या मुलाखती १७ एप्रिलपर्यंत घेण्यात आल्या. मुलाखत फेरी ७ जानेवारी रोजी सुरू झाली. मुख्य परीक्षेत यशस्वी झालेल्या सुमारे २८४५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले होते. नागरी सेवा परीक्षा २०२४ अंतर्गत यूपीएससीने आयएएस, आयपीएससह सेवांमध्ये ११३२ पदांसाठी भरतीची घोषणा केली होती. पूर्वी मूळ अधिसूचनेतही फक्त १०५६ रिक्त जागा जाहीर करण्यात आल्या होत्या; नंतर त्या ११३२ पर्यंत वाढवण्यात आल्या.


अर्चित डोंगरे

### राज्यातून यशस्वी झालेले पहिल्या शंभरातील ७ उमेदवार

अर्चित पराग डोंगरे (०३) शिवांश सुभाष जगदाळे (२६) शिवानी पांचाळ (५३) अदिती संजय चौघुले (६३) साई चैतन्य जाधव (६८) विवेक शिंदे (९३) तेजस्वी प्रसाद देशपांडे (९९)

# जिल्ह्यातील १ हजार २५ ग्रा.पं.च्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर



### ५० टक्के महिलांना आरक्षण

**तालुका- एकूण - अ जाती अनुसूचित - अनुसूचित जाती - ना.मा. प्र. - सर्वसाधारण**

- करमाळा-१०८-१२-०१-२९-६६
- माढा-१०८-१४-२-२९-६४
- बार्शी-१२९-११-१-३५-८२
- उत्तर सोलापूर-३६-०६-१-३५-१९
- मोहोळ-९०-१३-०१-२४-५२
- पंढरपूर-९५-२०-३-२६-४६
- माळशिरस-१०३-२४-१-२८-५०
- मंगळवेढा-७९-११-०१-२१-४६
- सांगोला-७६-१६-०१-२१-३८
- द.सोलापूर-८३-१३-०४-२२-४४
- अक्कलकोट-११३-१५-३-३२-६८.
- एकूण -१०२५

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२२ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील सन २०२५ ते सन २०३० या कालावधीसाठी १ हजार २५ मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आज २२ एप्रिल रोजी संबंधित तालुक्यातील तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी, प्रांताधिकाऱ्यांनी ठरवून दिलेल्या ठिकाणी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम घेण्यात आला.त्यामध्ये ग्रामपंचायतीसाठी ही आरक्षण सोडत काढण्यात आली.

यामध्ये स्थानिक स्वराज संस्थामध्ये असलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग तथा सर्वसाधारण प्रवर्गासाठीच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत जाहिर करण्यात आली. सरपंच मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच/उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मध्ये सरपंच पदराच्या आरक्षणबाबत तरतुदी निश्चित केल्या आहेत.

त्यातील तरतुदी आणि नियमान्वये अनुसुचित अनुसुचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग, खुला व महिला (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागास प्रवर्गाच्या महिलांसह सरपंच पदे निश्चित करण्यात येणार आहेत, तर या आरक्षण सोडतीसाठी त्या त्या तालुक्यातील जाती, ३० टक्के महिलांसाठी राखीव, अनुसूचित जातीच्या १५५ पैकी ७८ महिलांसाठी, अनुसुचित जमातीच्या एकुण १९ पैकी ९ जागा महिलांसाठी, नागरिकांच्या मागास प्रवर्गातील २७७ पैकी १३९ जागा महिलांसाठी तर सर्वसाधारण प्रवर्गातील ५७५ / महिला २८८ जागा महिलासाठी राखीव तर सर्व साधारण २८७ असणार आहे.

आरक्षण सोडतीमुळे सरपंचपदासाठी इच्छूक असणाऱ्या उमेदवारांना आतापासून तयारी करण्यासाठी वेळ मिळणार आहे. काही ठिकाणी अपेक्षित आरक्षण निघाले नसल्याने अनेक इच्छुकांचा अपेक्षाभंग झाला आहे. मात्र इच्छुकांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. आरक्षण सोडतीमुळे 'काही ठिकाणी खुशी, तर काही ठिकाणी गम' दिसून येत आहे. यातील सुमारे ५० टक्के जागांवर महिलांना संधी मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# मत्स्यव्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा

## मासेमारांना पाणी, वीज सुविधा, विविध सवलतींचा लाभ होणार

**मुंबई, २२ एप्रिल**

राज्यातील मासेमार,मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना कृषी क्षेत्राप्रमाणेच पायाभूत सुविधा व सवलती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टने मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मत्स्यव्यसायातील प्रक्रिया उद्योग वगळता अन्य घटकांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि मत्स्य उत्पादनात वाढ साधण्यासाठी राज्यातील मासेमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्यकास्तकारांना कृषी क्षेत्रासारख्या पायाभूत सुविधा आणि सवलती दिल्या जाणार आहेत. महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य असून, शेतीसह पशुपालन, मत्स्यपालन, फळभाजी उत्पादन यासारख्या क्षेत्रांवर ग्रामीण अर्थव्यवस्था टिकून आहे. विशेषतः देशाला परकीय चलन मिळवून देणाऱ्या आणि प्रथिनयुक्त अन्नाची गरज भागवणाऱ्या मत्स्य व्यवसायाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. राज्याला ७२० किलोमीटर लांबीचा प्रदीर्घ समुद्र किनारा लाभला आहे तसेच भुजल क्षेत्रामध्ये पाटबंधारे विभागाचे जलाशय, तलाव, जिल्हा परिषदांचे तलाव, मालगुजारी तलावांसह ४ लाख हेक्टरवर ही जलसंपत्ती आहे. अडीच लाखांहून अधिक शेततळी आहेत. यामुळे आता राज्यात पारंपरिक मासेमारीपेक्षा शास्त्रोक्त मत्स्यपालनावर भर दिला जात असून, राज्यात मत्स्यबीज संचयन आणि पिंजरा संवर्धन यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढू लागला आहे.

कृषी क्षेत्राशी साधर्म्य असूनही मत्स्य व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा नसल्याने मासेमार व मत्स्यपालकांना वीज सवलत, कर्ज, विमा आणि उपकरणांवरील अनुदान या सुविधा मिळत नव्हत्या. मात्र, आंध्रप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार आणि कर्नाटकसारख्या राज्यांनी या क्षेत्राला कृषी दर्जा दिल्यामुळे त्यांच्या मत्स्य उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. राज्य शासनाने या पृष्ठभूमीवर महत्त्वाची पावले उचलली असून, कृषी दराने वीजपुरवठा, किसान क्रेडिट कार्ड, बँक कर्ज सुविधा, अल्प दरात विमा संरक्षण तसेच सौर ऊर्जा योजनेचा लाभ यासारख्या सवलती मत्स्यशेतकऱ्यांना मिळणार आहेत. परिणामी, ग्रामीण भागात रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार असून, मत्स्य उत्पादनात भरीव वाढ होण्याची अपेक्षा आहे.

(तभा वृत्तसेवा)



नाशिकमधील दुष्काळग्रस्त भागात नागरिकांना पाण्यासाठी नुसती वणवणच करावी लागत नसून, कोरड्या विहिरींमध्ये उतरून थोडेतरी पाणी मिळेल का, या आशेने जीवावर उदार व्हावे लागत आहे

## महत्त्वाचे

### झारखंड, बिहारमध्ये १६ ठिकाणी ईडीचे छापे

**नवी दिल्ली** : बोकारो वनजमीन घोटाळ्यात मनी लॉन्ड्रिंग तपासाचा भाग म्हणून मंगळवारी अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने झारखंड आणि बिहार राज्यात या प्रकरणाशी संबंधित लोकांच्या १६ ठिकाणांवर छापे टाकले. मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायदा अर्थात् पीएमएलएच्या तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली. अधिकृत सूत्राने दिलेल्या माहितीनुसार झारखंड येथील बोकारोच्या मौजा तेतुलिया येथील १०३ एकर संरक्षित वनजमिनीच्या बनावट संपादन आणि बेकायदेशीर विक्रीत कथित सहभागी असलेल्या संशयितांची घरे आणि कार्यालयांवर ईडीने छापे टाकले. ईडीच्या पथकाने रांचीतील लालपूर येथील व्यावसायिक बिलम अग्रवाल आणि पुनीत अग्रवाल यांच्या जागेवरही छापे टाकले आहेत. जानेवारी महिन्यात ईडीने काही भूमाफियांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती, प्राथमिक तपासात असे दिसून आले की अधिकारी आणि भूमाफियांनी बोकारो जंगलातील जमीन हाताळून ती विकली. यानंतर ईडीने या प्रकरणाची चौकशी सुरू केली होती.

### एचसीएल जिगसॉने आणली मूल्यांकन मंचची नवी आवृत्ती

**दिल्ली** : एचसीएल ग्रुपने शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतातील सर्वांत मोठा समस्या सोडवणारा मूल्यांकन मंच, एचसीएल जिगसॉच्या सहाव्या आवृत्तीची घोषणा केली. नावीन्यपूर्णता आणि विश्लेषणात्मक कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी डिझाईन केलेले एचसीएल जिगसॉ तरुणांना सर्जनशील आणि तार्किक विचारसरणीद्वारे जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम करीत आहे. हे व्यासपीठ इयत्ता ६ ते ९ मधील शालेय विद्यार्थ्यांना संशोधन, समीक्षात्मक विचारसरणी आणि संवाद यासह २१ व्या शतकातील प्रमुख कौशल्यांचे मूल्यांकन करते आणि त्यांना वास्तविक जगातील आव्हाने सोडवण्यासाठी या कौशल्यांचा वापर करण्यास मदत करते. इच्छुक विद्यार्थी किंवा शाळा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलैपर्यंत नोंदणी करू शकतात. एकूण १२ लाखांहून अधिक बक्षिसांची अक्कम अंतिम स्पर्धकांना दिली जाईल, ज्यात एचसीएलच्या इनोव्हेशन लॅब्समध्ये शिकण्याच्या संधींचा समावेश आहे. सहाव्या आवृत्तीत प्रकल्प-आधारित आव्हानाचे ध्येय यावर्षी सहयोग करणे, निर्मिती करणे आणि जिंकणे आहे. या उपक्रमाबद्दल एचसीएल ग्रुपचे असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट रजत चंडोलिया म्हणाले, एचसीएलमध्ये आम्ही गतिमान जगात भरभराटीसाठी कौशल्यांनी सुसज्ज करून तरुण मनांच्या क्षमतेला चालना देण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

### नाशिक जिल्हाधिकाऱ्यांना पंतप्रधान नागरी सेवा उत्कृष्टता पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली** : नागरी सेवा दिनानिमित्त नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना 'पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासातील उल्लेखनीय योगदानासाठी शर्मा यांना हा पुरस्कार 'जिल्ह्यांचा समग्र विकास' श्रेणीत मिळाला. १७ व्या नागरी सेवा दिनानिमित्त आज विज्ञान भवन येथे केंद्रीय कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्ती वेतन मंत्रालयाच्या अंतर्गत प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागा मार्फत या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्ह्याने आयुष्मान भारत, पंतप्रधान आवास योजना, जल जीवन मिशन, उज्ज्वला योजना, मुद्रा योजना, पोषण आहार योजना, स्वनिधी योजना आणि पीएम विश्वकर्मा योजना यासह केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीत राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७९,५९५.५९ (+१८७.०९) |
| निफ्टी | २४,१६७.२५ (+४१.७०) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | १,०१,३५० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | १,०१,००० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ४३.४ | २७.९ |
| अमरावती | ४४.४ | २४.९ |
| भंडारा | ४३.० | २५.० |
| बुलडाणा | ४०.४ | २६.५ |
| चंद्रपूर | ४५.८ | -.- |
| गडचिरोली | ४४.० | २४.६ |
| गोंदिया | ४२.७ | २४.४ |
| नागपूर | ४४.२ | २४.७ |
| वर्धा | ४४.२ | २७.८ |
| वाशीम | ४३.५ | -.- |
| यवतमाळ | ४४.० | २६.० |

# अन्नदाता शेतकऱ्याला ऊर्जादाता करणार

## नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली, २२ एप्रिल**

२२ लाख कोटींची पेट्रोलियम आयात थांबवण्यासाठी अन्नदात्या शेतकऱ्याला ऊर्जादाता केले पाहिजे. पर्यावरणाच्या रक्षणातून अर्थव्यवस्था मजबूत करून पुढील पाच वर्षांत ऊर्जा आयातदार देश निश्चितपणे ऊर्जा निर्यात देश घडेल, असा विश्वास भूपृष्ठ वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.



जागतिक पृथ्वी दिन साजरा करण्यासाठी नवी दिल्लीत आयोजित एक दिवसीय परिसंवादात ते बोलत होते. आपल्या उद्घाटनीय भाषणात नितीन गडकरी म्हणाले, मोठ्या प्रमाणात शहरांकडे स्थलांतर वाढत असल्यामुळे ग्रामीण भागात विपन्नता निर्माण झाल्याचे दिसते. शेती आता ग्लोबल झाली आहे, त्यामुळे जगाच्या बाजारावर स्थानिक शेतमालाचे दर ठरतात. देशाचा सर्वांत मोठा खर्च पेट्रोलियम आयातीवर २२ लाख कोटी रुपये होतो. हा खर्च कायमस्वरूपी बंद झाला पाहिजे. त्यातील १० लाख कोटी मला शेतकऱ्यांच्या खिशात द्यायचे आहेत. त्यातून शेतीचा जीडीपी हा २३ टक्क्यांपर्यंत वाढून क्रयशक्ती वाढेल. नवी दिल्ली शहर आणि परिसरातील राज्यांमध्ये परडी जाळण्याचे थांबून त्यापासून ऊर्जा निर्मितीचा मोठा प्रकल्प हाती घेतला आहे.

(तभा वृत्तसेवा)

### बांबूपासून पांढरा कोळसा

बांबूपासून पांढरा कोळसा निर्माण करून एक प्रकारे ऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये मोठी क्रांती घडून आणण्याची क्षमता आहे, असे नितीन गडकरी यांनी सांगितले. ते म्हणाले, औष्णिक विद्युत प्रकल्पांची एवढी मोठी गरज आहे की, एक कोटी शेतकरी जरी आले, तरी कदाचित औष्णिक विद्युत प्रकल्पांची कोळशाची गरज भागणार नाही. शेतकऱ्याला आता अन्नदाता न ठेवता त्याला ऊर्जादाता बनवण्याची गरज आहे. पर्यावरण रक्षणाबरोबरच अर्थव्यवस्था वाढीला गती देऊन बांबूपासून हायड्रोजन बनवण्यावर जास्त प्राधान्य देण्याची गरज आहे. येत्या पाच वर्षांत भारतातील ऑटोमोबाईल उद्योग हा जगात एक नंबरचा उद्योग बनेल आणि भारत पुढील काळात ऊर्जा आयात करणारा नसेल तर निर्यात करणारा देश बनवण्याची ताकद या योजनांमध्ये आहे.

### विश्वगुरू होण्यासाठी ग्रीन हायड्रोजन आवश्यक

ग्रीन हायड्रोजन हे भारताचे भविष्य आहे. त्यातूनच खऱ्या अर्थाने विश्वगुरू आणि सुपर इकॉनॉमी असलेला भारत घडणार आहे, असा ठाम विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला. दृष्टी देण्यासाठी डोळे दान करता येतात, परंतु व्हिजन दान करता येणार नाही. त्यासाठी चीनच्या धर्तीवर भारताची बांबू इकॉनॉमी तयार होण्याची गरज आहे. यातूनच खऱ्या अर्थाने भारताच्या ग्रामीण व्यवस्थेत गरीब मजुरांना मोठा रोजगार मिळेल, असे गडकरी म्हणाले.

# ५०० रुपयांच्या बनावट नोटांचा सुळसुळाट

## सरकारने दिला सतर्कतेचा इशारा

**नवी दिल्ली, २२ एप्रिल**

चलनात येणाऱ्या बनावट नोटा हे आपल्या व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे. दरम्यान, आता बाजारामध्ये खऱ्या नोटांप्रमाणे हुबेहूब दिसणाऱ्या बनावट नोटांचा सुळसुळाट झाला आहे. या संदर्भात केंद्रीय गृहमंत्रालयाने चिंता व्यक्त करत सतर्कतेचा इशारा दिला आहे.

५०० रुपयांच्या या नोटा अगदी खऱ्या नोटांप्रमाणे दिसतात. मात्र, काही गोष्टी बारकाईने पाहिल्यावर हा फरक ओळखणे शक्य होईल, असे सरकारने म्हटले आहे.



५०० रुपयांच्या बनावट नोटांबाबत बजावलेल्या इशाऱ्याबाबत केंद्रीय गृहमंत्रालयाने सांगितले की, बनावट नोटा या गुणवत्ता आणि छपाईच्याबाबतीत खऱ्या नोटांशी मिळत्याजुळत्या आहेत. त्यामुळे त्यांना ओळखणे कठीण आहे. यांचा रंग आणि रूप हुबेहूब खऱ्या नोटांप्रमाणेच आहे.

गृहमंत्रालयाने सांगितले की, या नोटा ५०० रुपयांच्या खऱ्या नोटांप्रमाणे दिसत असल्या तरी त्यांच्या स्पेलिंगमध्ये एक चूक झालेली आहे. त्यामुळे त्या सहजपणे ओळखता येतात. ५०० रुपयांच्या बनावट नोटेवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या ओळीमध्ये ही चूक झालेली आहे. त्यात या शब्दामध्ये एकेठिकाणी 'ई'च्या ऐवजी 'ए'चा वापर करण्यात आला आहे. ही छोटीशी चूक सहजपणे नजरेत येत नाही. त्यामुळे या नोटा सहजपणे चलनात पसरू शकतात, अशी भीती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने व्यक्त केली आहे. दरम्यान, या नोटा बाजारामध्ये मोठ्या प्रमाणावर पसरवण्यात आल्या असल्याचा इशारा तपास यंत्रणांनी दिला आहे. तसेच बँका आणि नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन केले आहे.

(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार

## कामगार कायद्यांमध्ये सुधारणा

**मुंबई, २२ एप्रिल**

केंद्रीय कामगार संहितेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२५ आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम, २०२५ यांना मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

केंद्र सरकारने १९९९ मध्ये माजी कामगार मंत्री रवींद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा श्रम आयोग नियुक्त केला होता. या आयोगाने सर्व २९ कामगार कायदे एकत्रित करून केवळ चार कामगार संहिता तयार करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार केंद्राने चार संहिता तयार केल्या आहेत. त्यात वेतन संहिता, औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता यांचा समावेश आहे.

या चार संहिताचे अधिनियम संसदेनेही मंजूर केले आहेत. कामगार हा विषय समवर्ती सूचीमध्ये आहेत. केंद्राने सर्व राज्यांसाठी एकत्रित संहिता तयारी केली आहे. या संहितांची अंमलबजावणी सर्व राज्यांमध्ये एकत्रितरीत्या करावी लागणार आहे. त्यासाठी राज्यांना संबंधित संहितांच्या अंमलबजावणीसाठी नियम तयार करावे लागणार आहेत. त्यानुसार राज्याच्या कामगार विभागाने महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२५ आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम, २०२५ तयार केले होते. या नियमांना विधी व न्याय विभागाने काही सुधारणांसह मान्यता दिल्याने या नियमांना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यानुसार या नियमांचा प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.

(तभा वृत्तसेवा)

# मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात महेश बाबूला ईडीची नोटीस

## २७ एप्रिलला चौकशीसाठी बोलवले

**हैदराबाद, २२ एप्रिल**

दाक्षिणात्य अभिनेता महेश बाबू याला अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने समन्स बजावत २७ एप्रिल रोजी हैदराबाद येथील कार्यालयात हजर राहण्यास सांगितले आहे. साई सूर्या डेव्हलपर्स आणि सुराणा ग्रुप या रिअल इस्टेट कंपन्यांशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात हा समन्स पाठवण्यात आला.



महेश बाबू या कंपन्यांच्या ग्रीन मेडोज प्रकल्पाचे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर आहे. रिअल इस्टेट गुंतवणूकदारांसोबत झालेल्या कथित फसवणुकीशी संबंधित मनी लाँड्रिंग चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालयाने बुधवारी अनेक ठिकाणी छापे टाकले होते. सुराणा ग्रुप आणि साई सूर्या डेव्हलपर्सवर ही कारवाई करण्यात आली. सिकंदराबाद, जुबली हिल्स आणि बोवेनपल्ली येथील ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. साई सूर्या डेव्हलपर्स आणि सुराणा ग्रुपने सुरू केलेल्या रिअल इस्टेट प्रकल्पांच्या प्रमोशनल जाहिरातींमध्ये महेशबाबूने काम केले होते. या जाहिरातींसाठी त्याला ५.९ कोटी रुपये मिळाल्याचे वृत्त आहे. ३.४ कोटी रुपये धनादेशाद्वारे आणि २.५ कोटी रुपये रोख स्वरूपात मिळाले होते. मात्र, त्याच्यावर अद्याप कोणतेही आरोप नाहीत.

(वृत्तसंस्था)

# चारधाम यात्रेसाठी १९ लाखांवर भाविकांची नोंदणी

**डेहराडून, २२ एप्रिल**

३० एप्रिलपासून सुरू होणाऱ्या चारधाम यात्रेसाठी देशभरातून १९ लाखांवर भाविकांनी नोंदणी केल्याची माहिती उत्तराखंड सरकारने दिली. ३० एप्रिल रोजी गंगोत्री आणि यमुनोत्री मंदिरांचे कपाट, तर २ मे रोजी केदारनाथ आणि ४ मे रोजी बद्रीनाथ मंदिराचे कपाट उघडण्यात येणार आहे. हेमकुंड साहेबचे कपाटही २५ मे रोजी खुले होणार आहेत.

बद्री-केदार मंदिर समितीचे सीईओ विजय प्रसाद थापलियाल यांनी सांगितले की, आतापर्यंत चारधाम यात्रेसाठी नोंदणीचा आकडा १९ लाखांच्या पुढे पोहोचला आहे. यमुनोत्री धामसाठी ३ लाखांहून अधिक भाविकांनी नोंदणी केली, तर गंगोत्री धामसाठी नोंदणीचा आकडा ३ लाखांच्यावर पोहोचला आहे. सर्वाधिक नोंदणी ही केदारनाथ धामसाठी झाल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत जवळपास ६ लाख ४८ हजार लोकांनी दर्शनासाठी नोंदणी केली आहे. तर, शिख भाविकांचे प्रमुख तीर्थस्थळ असलेल्या हेमकुंड साहिबसाठी ५ लाख ७४ हजारहून अधिक लोकांनी नोंदणी केलेली आहे. भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी चारधाम यात्रा सुरू होण्यापूर्वी सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### ७३९ किमीच्या रस्त्याची दुरुस्ती

**चारधाम यात्रा मार्ग दुरूस्ती विभागाने कार्याचा वेग वाढवला आहे. विभागाचे मुख्य अभियंता राजेश चंद्र शर्मा म्हणाले की, ही यात्रा एकूण ७३९ किमी लांबीच्या रस्त्याच्या मार्गानेच होते, ज्यात चार एजन्सी सतत काम करते. ज्या भागात भूस्खलनाच्या घटना घडतात, त्या भागांचीही नोंद करण्यात आली. तिथे विशेष दुरुस्तीची कामे केली जात आहे. २५ एप्रिलपर्यंत सर्व रस्ते सुधारणा कामे पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.**




# डॉ. रवींद्र प्रभुदेसाई यांचा नागरी सत्कार

**ठाणे, २२ एप्रिल**

'डॉक्टर' ही पदवी मी केवळ नावामागे लावायचा मान म्हणून पाहत नाही, तर तिच्यामागे दडलेला विचार उद्योगासाठी खूप महत्त्वाचा आहे. डी- डिफरेंशिएटर अर्थात आपल्या प्रॉडक्टचे वेगळेपण, ओ- ऑब्जेक्टिव्ह म्हणजे उद्योगाचे स्पष्ट ध्येय आणि उद्दिष्ट असणे, सी- कलेक्टिवली म्हणजे टीमवर्क आणि एकजूट, टी- टाईम मॅनेजमेंट अर्थात वेळेचे काटेकोर नियोजन, ओ- ऑर्डर म्हणजे नियोजनबद्ध अंमलबजावणी, आर- रिझल्ट म्हणजे शंभर टक्के रिझल्टची खात्री. अशा प्रकारे 'डॉक्टर' या शब्दातील प्रत्येक अक्षर पितांबरी उद्योगाच्या यशाचा पाया आहे. म्हणूनच पितांबरी उद्योगाला पाठबळ देणाऱ्या प्रत्येक संस्थेला मला मिळालेली ही डॉक्टरेट पदवी मनःपूर्वक अर्पण करतो, असे प्रतिपादन डॉ. रवींद्र प्रभुदेसाई यांनी पुरस्कार स्वीकारताना केले.




टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांच्यावतीने उद्योग क्षेत्रातील नेत्रदीपक कर्तृत्व आणि सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पितांबरीचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र प्रभुदेसाई यांना नुकतीच डि. लिट. ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली. यानिमित्त त्यांचा नागरी सत्कार गुरुवारी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात नागरी अभिवादन सत्कार समिती ठाणेच्यावतीने आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, प्रसिद्ध व्याख्याते डॉ. सच्चिदानंद शेवडे, चितळे उद्योग समूहाचे श्रीकृष्ण चितळे, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. ठाणेकरांची उपस्थिती लाभलेल्या आणि ब्रह्मवृंद आशीर्वचनाने मंत्रमुग्ध झालेल्या भरगच्च सभागृहात मान्यवरांच्या हस्ते पुणेरी पगडी आणि मानपत्र देऊन डॉ. रवींद्र प्रभुदेसाई यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. रवींद्र प्रभुदेसाई यांना डॉक्टरेट प्राप्त झाल्याविषयी पाठविलेल्या संदेशाचे व्यासपीठावरून वाचन करण्यात आले.

वा

# दहशतवाद्यांच्या हल्ल्यात महाराष्ट्रातील दोघा पर्यटकांचा मृत्यू तर दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**

**मुंबई, दि.२२ एप्रिल:**

पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्यात महाराष्ट्रातील दोघे पर्यटक मृत्युमुखी पडले आहेत तर दोघे जखमी झाले आहेत अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स वर ट्विट करून दिली आहे.

अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात दिलीप डिसले, अतुल मोने हे दोघे ठार झाले आहेत तर पनवेल येथील माणिक पटेल व एस. भालचंद्रराव हे जखमी झाले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी एक्स वरील आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, मी या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध करतो. या घटनेत जे लोक मृत्यूमुखी पडले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबीयांच्या, आप्तस्वकियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जे जखमी झाले, त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. जम्मू-काश्मीर प्रशासनातील वरिष्ठांच्या आम्ही संपर्कात आहोत. पहलगाम ज्यांच्या अखत्यारीत येते, ते काश्मीरचे विभागीय आयुक्त विजयकुमार बिदरी यांनाही फोन करुन माहिती घेतली.

आतापर्यंत प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्रातील दोन पर्यटकाचा मृत्यू झाला असून, त्यात दिलीप डिसले, अतुल मोने असे दोघे आहेत. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील २ जण जखमी झाले आहेत. त्यातील एक माणिक पटेल हे पनवेलचे आहेत. एस. भालचंद्रराव हे दुसरे जखमी आहेत. सुदैवाने दोघांचीही प्रकृती स्थिर आहे.

# सौदी अरब भारताचा सर्वांत विश्वासू मित्र

## मुलाखतीतून पंतप्रधान मोदींचे द्विपक्षीय संबंधावर भाष्य

◆ **जेद्दाह, २२ एप्रिल**

सौदी अरब भारताचा सर्वांत विश्वासू मित्र आणि सहयोगी आहे. दोन्ही देशांत अमर्याद क्षमता आहे आणि केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी शांतता, प्रगती आणि समृद्धीसाठी आम्ही पुढे जात आहो. प्रस्तावित मुक्त करारामुळे दोन्ही देशांसह संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक संबंधात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

सौदीच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान मोदी यांनी अरब न्यूजला मुलाखती दिली. यात त्यांनी द्विपक्षीय संबंधावर भाष्य केले. मोदी म्हणाले, मी क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांचे आभार मानतो की, त्यांनी मला भेटीसाठी आमंत्रित केले. सौदी अरब भारताचा सागरी शेजारी देश, विश्वासू मित्र आणि एक धोरणात्मक सहयोगी आहे. दोन्ही देशांचे संबंध हे मान्सूनच्या वाऱ्यांइतकेच जुने आहे. आमच्या भागीदारीत प्रचंड शक्यता आहेत. अनिश्चिततेने भरलेल्या जगात आमचे संबंध स्थिरतेचा आधारस्तंभ म्हणून मजबूत आहेत. दोन्ही देशांत ऊर्जा, शेती आणि खते क्षेत्रातील व्यापाराने मोठा उच्चांक गाठला आहे. प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांच्यासोबत मी जेव्हा भेटतो, तेव्हा त्यांची अंतर्दृष्टी, दूरदृष्टी आणि त्यांच्या लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याची त्यांची आवड मला अधिक प्रेरणा देते. देशवासीयांमध्ये त्यांच्याबद्दल खूप आदर आहे. जागतिक आव्हानांमध्येही सौदीसोबत भारताचे व्यापारी संबंध केवळ टिकून राहिले नाहीत, तर अधिक व्यापक झाले आहे. सौदी व्हिजन २०३० आणि विकसित भारत २०४७ मध्ये मला अनेक साम्य दिसतात. (वृत्तसंस्था)



### सौदीतील कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करावी

पंतप्रधान मोदी म्हणाले की, सौदीतील उद्योजक भारतातील पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स, अक्षय ऊर्जा, आरोग्यसेवा, उपयुक्तता, नवोन्मेष, स्टार्टअप्स आणि ब्लू इकॉनॉमी क्षेत्रांच्या विकासात सहभागी होऊ शकतात. दोन्ही देश रिफायनरीज आणि पेट्रोकेमिकल्समध्ये संयुक्त प्रकल्पांच्या शक्यतांचा शोध घेत आहेत. ऊर्जा हा आपल्या आर्थिक भागीदारीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. सौदी अरब आमच्यासाठी एक मजबूत आणि विश्वासार्ह ऊर्जा भागीदार राहिला आहे. आमचे ऊर्जा सहकार्य केवळ खरेदीदार-विक्रेता संबंधांपुरते मर्यादित नाही.

### द्विपक्षीय गुंतवणुकीला मिळाली नवी दिशा

भारत आणि सौदी मधील वाढत्या द्विपक्षीय गुंतवणुकीवर बोलताना मोदी म्हणाले, विकसित भारतासाठी गुंतवणूक आणि भागीदारीसाठी सौदीच्या कंपन्यांना प्रचंड संधी उपलब्ध आहेत, ज्यात अंतराळ अर्थव्यवस्थेपासून ते जागतिक पुरवठा साखळी सहकार्यापर्यंतचा समावेश आहे. भारतीय कंपन्या विविध क्षेत्रांमध्ये सौदीत मजबूत उपस्थिती राखतात. दोन्ही देशांमधील वाढती संरक्षण आणि सुरक्षा भागीदारी आणि सहकार्य हे खोल परस्पर विश्वासाचे प्रतिबिंब आहे. भारत सौदी अरबच्या सशस्त्र दलांच्या काही गरजा पूर्ण करीत आहे. भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात सौदी अरबच्या गुंतवणुकीचे आम्ही स्वागत करू.

### पंतप्रधानांचा तिसरा दौरा; विविध करारांवर स्वाक्षरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसीय दौऱ्यासाठी सौदी अरबमध्ये पोहोचले. २०१६ आणि २०१९ नंतर पंतप्रधान मोदी यांचा हा तिसरा दौरा आहे. या दौऱ्यात मोदी भारत आणि सौदी अरब किमान सहा सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करतील. दोन्ही देशांमध्ये ज्या करारांवर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे, त्यात अंतराळ, ऊर्जा, आरोग्य, विज्ञान आणि वैज्ञानिक संशोधन, संस्कृती आणि प्रगत तंत्रज्ञान या क्षेत्रातील करारांचा समावेश आहे.



अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांनी भारत दौऱ्यादरम्यान मंगळवारी जयपूरच्या आमेर किल्ल्याला भेट दिली. त्यावेळी त्यांचे शाही स्वागत करण्यात आले. या दौऱ्यात त्यांच्यासह मूळ भारतीय असणाऱ्या त्यांच्या पत्नी उषा चिलुकुरी आणि तिन्ही मुलेही सोबत आहेत.

# भारतीय विद्यार्थ्यांचा ट्रम्प सरकारविरोधात खटला

## बेकायदेशीरपणे व्हिसा रद्द केल्याचा आरोप



◆ **वॉशिंग्टन , २२ एप्रिल**

अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांचा एफ-१ व्हिसा रद्द करण्यात आल्याने त्यांच्यावर हद्दपारीची कारवाई होण्याची शक्यता आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाविरोधात भारतीय आणि चिनी विद्यार्थ्यांनी अमेरिकन सिव्हील लिबर्टीज युनियन अर्थात् एसीएलयूच्या मदतीने न्यू हॅम्पशायरच्या जिल्हा न्यायालयात खटला दाखल केला.

विद्यार्थ्यांनी अमेरिकेचा गृह सुरक्षा विभाग आणि इतर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी एकतर्फी आणि बेकायदेशीरपणे व्हिसा रद्दचा आरोप केला आहे. त्यांच्यावर केलेल्या कारवाईमुळे त्यांचा शिक्षणाचा, भविष्यातील नोकऱ्यांचा आणि अमेरिकेत कायदेशीर वास्तव्याचा अधिकार हिरावून घेतला जात आहे. न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात म्हटले की, हे प्रकरण केवळ या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित नाही, तर ते अमेरिकेत राहणाऱ्या हजारो आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित आहे. व्हिसा स्थिती अचानक रद्द केल्याने विद्यार्थ्यांना हद्दपारी आणि ताब्यात घेण्याचा धोका निर्माण झाला. या निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांना परीक्षादेखील देता येणार नाही, त्यामुळे त्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले. याप्रकरणी न्यायालयाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली. अमेरिकेचा परराष्ट्र विभाग गेल्या चार महिन्यांपासून परदेशी विद्यार्थ्यांच्या डेटाची तपासणी करीत आहे. याद्वारे इस्रायलविरुद्ध आणि हमासच्या समर्थनार्थ निदर्शने करणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द केले जात आहेत. (वृत्तसंस्था)

### नियमांचे पालन करूनही कारवाई

तनुज कुमार गुम्मदवेली नावाच्या भारतीय विद्यार्थ्यांनी न्यायालयात सांगितले की, पदवी पूर्ण करण्यासाठी एक सेमिस्टर शिल्लक आहे. सर्व नियमांचे पालन केले असतानादेखील व्हिसा रद्द करण्यात आला. आम्हाला न्यायालयाकडून न्याय मिळण्याची अपेक्षा आहे. अमेरिकन सरकारने अनेक परदेशी विद्यार्थ्यांना त्यांचे व्हिसा रद्द करण्याबाबत ई-मेल पाठवले आहेत. या मेलमध्ये या विद्यार्थ्यांना अमेरिका सोडण्यास सांगण्यात आले होते. अहवालांनुसार, यापैकी ५० टक्के विद्यार्थी भारतीय आहेत.

### परराष्ट्र मंत्रालयाची पुनर्रचना करण्याची तयारी

ट्रम्प प्रशासन परराष्ट्र मंत्रालयाची पुनर्रचना करण्याची तयारी करीत आहे. यात आफ्रिकेतील कार्यालये आणि दूतावास बंद करणे समाविष्ट आहे. हवामान बदल, निर्वासितांचे प्रश्न, लोकशाही आणि मानवी हक्कांशी संबंधित कार्यालये देखील बंद होऊ शकतात. आफ्रिकन व्यवहार ब्युरो बंद केला जाईल आणि विशेष दूताचे कार्यालय तयार केले जाणार असल्याचे संकेत अमेरिकेच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने दिले.

# पोलाद उत्पादनांच्या आयातीवर १२ टक्के सुरक्षा शुल्क

## चीन, दक्षिण कोरिया, जपानला बसणार फटका

◆ **नवी दिल्ली, २२ एप्रिल**

केंद्र सरकारने काही पोलाद उत्पादनांच्या आयातीवर १२ टक्के सुरक्षा शुल्क लादण्याचा निर्णय घेतला. आगामी २०० दिवसांसाठी हे शुल्क लागू असेल. पोलाद उत्पादनांच्या स्वस्त आयातीपासून देशांतर्गत कंपन्यांना संरक्षण देण्यासाठी भारत सरकारने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा फटका चीन, दक्षिण कोरिया, जपान या देशांना बसणार आहे.

वाणिज्य मंत्रालयाच्या व्यापार उपाय महासंचालनालयाने केलेल्या शिफारशींनंतर हा निर्णय घेण्यात आला असल्याचे महसूल विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे. गेल्या महिन्यात हे शुल्क लादण्याचा सल्ला देण्यात आला होता. या अधिसूचनेंतर्गत लादण्यात आलेले सुरक्षा शुल्क ही अधिसूचना प्रकाशित झाल्यापासून २०० दिवसांच्या कालावधीसाठी प्रभावी राहील, असे अर्थ मंत्रालयाच्या महसूल विभागाने म्हटले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच अमेरिकेने सर्व पोलाद आणि ॲल्युमिनियम आयातीवरील शुल्क २५ टक्क्यांपर्यंत वाढवले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून कॅनडा, युरोपियन युनियन आणि ब्रिटननेही आयात शुल्क लागू करण्याची घोषणा केली. त्यामुळे भारतात स्वस्त दरात स्टीलचा पुरवठा होण्याची शक्यता बळावली होती. त्यादृष्टीने टाटा, जिंदाल स्टील आणि इतर पोलाद कंपन्यांनी सरकारकडे २५ टक्के सुरक्षा शुल्क लागू करण्याची मागणी केली होती. अमेरिका, ब्रिटन, कॅनडा आणि इतर देशांनी पोलाद आणि ॲल्युमिनियमवर आयात शुल्क वाढविल्याने भारताचे नुकसान होणार असल्याचे कंपन्यांनी सांगितले होते.

**भारतात पोलादचा पुरवठा करणे महाग होईल**

भारताने पोलाद आयातीवर शुल्क आकारल्याने विदेशी कंपन्यांना भारताला पोलादचा पुरवठा करणे महाग होणार आहे. चीन दरवर्षी एक अब्ज टनांपेक्षा जास्त पोलादचे उत्पादन करतो. चीनने आपली अर्थव्यवस्था चांगली नसतानाही पोलादाची निर्यात वाढवली. यामुळे भारतासह जगभरातील पोलादाच्या किमतींवर परिणाम झाला आहे. चीनकडून स्वस्त पोलाद मिळाल्याने पोलादाच्या किमती घसरल्या आहेत. आता अमेरिका आणि इतर देशांनी शुल्क लादल्यामुळे चीन भारतातील पोलादाची निर्यात वाढवेल, अशी भीती होती. ती टाळण्यासाठी भारताने हे पाऊल उचलले आहे. (वृत्तसंस्था)

# ट्रम्प प्रशासनाविरुद्ध हार्वर्डकडून खटला दाखल

**अनुदान रोखण्याचे प्रकरण**

◆ **बोस्टन, २२ एप्रिल**

हार्वर्ड विद्यापीठाने २.२ अब्ज डॉलर्सचा निधी रोखल्या प्रकरणी ट्रम्प प्रशासनाविरुद्ध खटला दाखल केला आहे.

विद्यापीठाने त्यांच्या परिसरातील ट्रम्प सरकारच्या प्रशासकीय सक्रियतेबाबतच्या मागण्यांना नकार दिला होता. ११ एप्रिल रोजी हार्वर्डला लिहिलेल्या पत्रात ट्रम्प प्रशासनाने विद्यापीठात व्यापक सरकार आणि नेतृत्व सुधारणा तसेच त्यांच्या प्रवेश धोरणांमध्ये बदल करण्याची मागणी केली होती. विद्यापीठाने कॅम्पसमधील विविधतेचे विचार ऑडिट करावे आणि काही विद्यार्थी क्लबला मान्यता देणे थांबवावे, अशी मागणी त्यांनी केली होती. हार्वर्डचे ॲलन गार्बर म्हणाले की, विद्यापीठ मागण्यांपुढे झुकणार नाही.

गार्बर यांच्या भूमिकेनंतर काही तासांतच ट्रम्प सरकारने विद्यापीठाचा २.२ अब्ज डॉलर्सहून अधिकचा निधी गोठवला. प्रशासनाच्या निर्णयाविरोधात आता विद्यापीठाने न्यायालयात दाद मागितली आहे. सरकारने यहुदी विरोधी चिंता आणि वैद्यकीय, वैज्ञानिक, तांत्रिक आणि इतर संशोधन यांच्यात कोणताही तर्कसंगत संबंध ओळखला नाही. ते ओळखूही शकत नाहीत, असे बोस्टन फेडरल कोर्टात दाखल केलेल्या याचिकेत विद्यापीठाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### अनन्याचा भाऊ झळकणार चित्रपटात

**मुंबई :** यशराज फिल्म्सने सैयारा या नवीन चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटात अहान पांडे मुख्य भूमिकेत दिसणार आहे. तो बॉलिवूडमध्ये प्रवेश करणार आहे. तो अनन्या पांडेचा चुलत भाऊ आहे. अनन्या यामुळे खूप उत्साहित आहे. तिने भावाचे कौतुक करीत स्वागत केले. अनन्याने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर यशराज फिल्म्सने तिच्या चुलत भावाच्या पदार्पणाच्या चित्रपटाची अधिकृत घोषणा केलेली पोस्ट शेअर केली. चित्रपटांमध्ये स्वागत आहे माझ्या भावा, असे आनंद व्यक्त करीत अनन्याने लिहिले आहे. अहानची बहीण आणि आईनेही त्याच्या चित्रपट पदार्पणाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. हा रोमँटिक चित्रपट आदित्य चोप्रा प्रस्तुत आणि अक्षय विधानी निर्मित करत आहे. सैयारा १८ जुलै रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.



### उत्तराखंडच्या 'पायरे'चा अमेरिकेत डंका

**मुंबई :** न्यू यॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हल अवॉर्ड्सच्या २५ व्या आवृत्तीबाबत एक मनोरंजक बातमी समोर आली आहे. या महोत्सवात, उत्तराखंडच्या ८० वर्षीय पदम सिंह कापरी आणि ७० वर्षीय हीरा देवी यांना पायरे चित्रपटातील त्यांच्या अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीसाठी नामांकन मिळाले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या दोघांनीही यापूर्वी कोणत्याही चित्रपटात काम केलेले नाही. पदम सिंह हे भारतीय सैन्यातील निवृत्त सैनिक आहेत, तर हिरा देवी या एक शेतकरी आहेत. दोघेही उत्तराखंडमधील पिथौरागढ जिल्ह्यातील बेरीनाग तालुक्याचे आहेत. हा चित्रपट निर्माते विनोद कापरी यांनी दिग्दर्शित केला आहे. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपट प्रेक्षक पुरस्कार, ज्युरी पुरस्कार मिळाला आहे.



## छत्तीसगडमधील कॅम्पमध्ये वीज पडून जवानाचा मृत्यू

◆ **बिजापूर, २२ एप्रिल**

छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त बिजापूर जिल्ह्यातील एका छावणीवर वीज पडून केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या एका जवानाचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. सोमवारी सायंकाळी गंगलूर पोलिस स्टेशन परिसरातील सीआरपीएफच्या १९५ व्या बटालियनच्या छावणीत ही घटना घडली.

कॉन्स्टेबल सुजॉय पाल यांना विजेचा धक्का बसल्यानंतर गंगलूर येथील सामुदायिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना उपचारादरम्यान मृत घोषित केले. (वृत्तसंस्था)



कशासाठी... पोटासाठी... कोणासाठी... पिलांसाठी! मनुष्य असो वा प्राणी, आपल्या पिलांच्या तोंडी घास देण्यासाठी केवळ मातृत्वाची भावनाच पुरेशी असते. आपल्या पिलाला तितक्याच ममतेने हा पक्षीही घास भरवतोय्.

## न्या. वर्मा खंडपीठाच्या खटल्यांची पुन्हा सुनावणी होणार

◆ **नवी दिल्ली, २२ एप्रिल**

दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सुनावणी सुरू असलेल्या ५० हून अधिक प्रकरणांची नव्याने सुनावणी होणार आहे. उच्च न्यायालयाने याबाबत अधिसूचना जारी केली आहे.

या सूचनेमध्ये दिवाणी रिट याचिकांसह ५२ प्रकरणांची यादी आहे. ही प्रकरणे २०१३ ते २०२५ पर्यंतची आहेत. यामध्ये मालमत्ता कराशी संबंधित एनडीएमसी कायद्यातील तरतुदींच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या २२ याचिकांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

### टायगर श्रॉफचा हवेतील 'बॅलेन्स'

**मुंबई :** बॉलिवूडचा ॲक्शन हिरो टायगर श्रॉफ थरारक स्टंटमुळे चर्चेत आला आहे. समाज माध्यमावर टायगरचा एक व्हिडीओ प्रचंड व्हायरल होत आहे. यात तो समुद्रकिनारी हवेत वेगवेगळ्या प्रकारे उड्या मारताना दिसतो. या व्हिडीओमध्ये टायगरने आपल्या फिटनेस आणि ॲक्शन कौशल्याचे प्रदर्शन केले आहे. त्याचा हा स्टंट पाहून चाहत्यांनी त्याला फ्लाईंग मशीन आणि सुपरहिरो अशा उपाधी दिल्या आहेत. टायगरने स्वतः हा व्हिडीओ इंस्टाग्रामवर शेअर केला. यावर लाखो लाईक्स आणि कमेंट्स आल्या आहेत. टायगर श्रॉफने यापूर्वीही अशा प्रकारचे थरारक स्टंट्स करून आपल्या चाहत्यांना प्रभावित केले आहे. सध्या तो त्याच्या आगामी चित्रपटांच्या चित्रीकरणात व्यस्त आहे. यात तो आणखी थरारक ॲक्शन सीनसह प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# कार नदीत कोसळल्याने आठ जणांचा मृत्यू

## सहा जण गंभीर जखमी

◆ **दमोह, २२ एप्रिल**

मध्यप्रदेशच्या दमोह जिल्ह्यातील नोहटा पोलिस स्थानक परिसरात भीषण रस्ता अपघातात आठ जणांचा मृत्यू, तर सहा जण गंभीर जखमी झाले. बनवार रस्त्यावरील सिमरी गावाजवळ आज सकाळी अकराच्या सुमारास हा अपघात झाला.

पोलिस प्रशासन घटनास्थळी पोहोचले. जखमींना दमोह जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले असून, त्यांची प्रकृती गंभीर आहे. महादेव घाट पुलावर एक कार नियंत्रणाबाहेर गेली आणि सुनार नदीच्या कोरड्या पात्रात पडली. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी जिल्हा रुग्णालयात येऊन घटनेची माहिती दिली. हे सर्वजण एकाच कुटुंबातील आहेत. ते वेगवेगळ्या वाहनांमधून बंदकपूरला भेट देण्यासाठी आले होते. या ठिकाणाला भेट दिल्यानंतर आम्ही गावी परतणार होतो. त्यानंतर बनवरच्या महादेव घाट पुलावरून एक बोलेरो खाली पडली, असे मृतांचे नातेवाईक गोविंद सिंग यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# माजी पोलिस महासंचालक हत्या प्रकरणी मुलगी, पत्नीला अटक

◆ **बंगळुरू, २२ एप्रिल**

कर्नाटकचे माजी पोलिस महासंचालक ओम प्रकाश यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी पत्नी पल्लवीला अटक केली. यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले, जिथून त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. मुलीलाही अटक करण्यात आली आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या वेळी ओम प्रकाश जेवण करीत होते. यादरम्यान दोघांमध्ये भांडण झाले. हे इतके वाढले की, पत्नीने त्यांची हत्या केली. पल्लवीने प्रथम ओमप्रकाशवर मिरची पावडर फेकली आणि जेव्हा डीजीपी जळजळ कमी होण्यासाठी इकडे तिकडे धावत होते, तेव्हा पल्लवीने त्यांच्या मानेवर, पोटावर आणि छातीवर १०-१२ वेळा चाकूने वार केले. या घटनेच्या वेळी मुलगी कृती देखील तिथे उपस्थित होती.



तपासाशी संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पत्नी हत्येच्या पाच दिवस आधी गुगलद्वारे मृत्यूचा कट रचत होती. गुगलवर मानेतील नसा कापल्याने मृत्यू कसा होतो, अशा गोष्टी शोधल्या. डिव्हाइसेस आणि सर्च हिस्ट्रीची तपासणी केल्यानंतर हे उघड झाले आहे. पोलिसांच्या मते, ही हत्या पूर्वनियोजित होती.

सुरुवातीच्या तपासात असे दिसून आले की, हत्येनंतर माजी डीजीपीच्या पत्नीने दुसऱ्या आयपीएस अधिकाऱ्याच्या पत्नीला संदेश पाठवला, एका राक्षसाचा वध झाला आहे. नंतर पल्लवीने त्यांना फोन करून सांगितले की, तिने ओम प्रकाशचा खून केला आहे. यानंतर आयपीएस अधिकाऱ्याने स्वतः पोलिसांना माहिती दिली. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# एक साधा प्रश्न माझा, लाख येती उत्तरे!

भारतातील सर्वांत जुन्या काँग्रेस पक्षाचे खासदार आणि लोकसभेतील विद्यमान विरोधी पक्षनेते राहुल गांधी असे प्रश्न विचारतात की, त्याची असंख्य उत्तरे दिली जाऊ शकतात. आता त्यांनी अमेरिकेत जाऊन असा प्रश्न केला की, महाराष्ट्रात भाजपाचा विजय झालाच कसा...? या प्रश्नाचे उत्तर अमेरिकेत जाऊन कसे मिळेल? ते भारतात किंवा महाराष्ट्रात मिळेल आणि एका ओळीचे उत्तर त्यांच्या प्रश्नाला मिळू शकत नाही. त्यांच्या प्रश्नाचे उत्तर अनेक मुद्यांमध्ये दिले जाऊ शकते आणि ते ऐकायचे असेल तर त्यांनी महाराष्ट्रात यावे आणि कार्यकर्त्यांचे ऐकावे, एवढाच सल्ला दिला जाऊ शकतो. तर, मुद्दा असा की, एकेकाळी संपूर्ण देशावर आणि देशातल्या जवळजवळ प्रत्येक राज्यावर काँग्रेसची सत्ता होती. आता ती केवळ तीन राज्यांपुरती उरलेली आहे. महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात काँग्रेसचा पाडाव झालेला आहे. त्याला कारण आहे काँग्रेसची स्वतःची धोरणे, धरसोड वृत्ती, गांधी घराण्याचा सोस आणि संघटनात्मक ताकदीचा अभाव. हीच कारणे महाराष्ट्रातही काँग्रेसला घेऊन बुडाली. निवडणुकीतील प्रत्येक पराभवानंतर राहुल गांधी यांचे एक पालुपद असते. हा पराभव आमच्यासाठी अनपेक्षित आहे आणि आम्ही लवकरात लवकर या पराभवाचे विश्लेषण करून पुढील रणनीती ठरवू, असे ते म्हणतात. आजवर एकाही पराभवानंतर त्यांनी किंवा त्यांच्या पक्षाने विश्लेषण केले किंवा रणनीती ठरविली असे घडले नाही. तसे ऐकण्यात-वाचण्यात आले नाही. अजूनही काँग्रेसमध्ये दरबारी पद्धतीचे राजकारण सुरू आहे. गांधी घराण्याचा वरचष्मा आहे. जुन्या मुखंडांची भरती आहे. या पक्षाला ठोस धोरण नाही, चेहरा नाही आणि दिशाही नाही. असे असताना आपल्याला केवळ 'काँग्रेस' म्हणून लोकांनी मते द्यावीत आणि सत्तेत बसवावे, अशी अपेक्षा राहुल गांधी करीत असतील तर त्यांच्या विनोदी स्वभावाला तोड नाही, असेच म्हणावे लागेल. राहुल गांधी यांच्या लक्षात यायला हवे की, आपण विदेशात आपल्या देशाबद्दल बोलतो तेव्हा जबाबदारीने शब्द उच्चारायचे असतात. आपले वाद-मतभेद जे काही असतील, त्यावर तोडगे काढण्याची सोय देशात आहे. अमेरिका त्यात कोणतीही मदत किंवा हस्तक्षेप करू शकत नाही. राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते असल्यामुळे त्यांनी सत्ताधीशांच्या विरोधात बोलणे ही नवलाई नाही. त्यावर आक्षेपही असण्याचे कारण नाही. परंतु, कुठे आणि काय बोलावे, याचे तारतम्य त्यांनी बाळगावे, अशी अपेक्षा ठेवली तर वावगे ठरू नये. लोकशाहीत विरोधीपक्ष महत्त्व आहेच. त्यामुळेच राहुल गांधी यांच्याकडे लोकसभेतील विरोधी पक्ष नेत्याचे जबाबदारीचे व संवैधानिक पद आलेले आहे. पण, त्यांना लोकतांत्रिक प्रक्रियेतून आलेले निकाल मान्य नाहीत आणि संवैधानिक जबाबदारीचे भानही नाही, हे त्यांच्या वक्तव्यांमधून दिसून येते. ते वारंवार असेच बोलत असतात. ब्रिटनमध्येही तेच आणि अमेरिकेतही तेच. राहुल गांधी स्वतः संवैधानिक पदावर आहेत. निवडणूक आयोग ही संवैधानिक यंत्रणा आहे. निवडणूक ही संवैधानिक पद्धतीने नियुक्त केलेल्या आयोगाच्या मार्फत कायदेशीर पद्धतीने झाली आणि त्याच पद्धतीने तिचे निकाल लागले. भाजपाच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार महाराष्ट्रात आले. त्याची कारणे आपल्याला ठावूक नाहीत, असे राहुल गांधी म्हणत असतील तर ते जबाबदारीपासून पळ काढत आहेत आणि निवडणूक आयोगाबद्दल संशय उत्पन्न करीत असतील तर ते देशाच्या संपूर्ण घटनात्मक व्यवस्थेची नाचक्की करीत आहेत, असेच म्हटले पाहिजे. भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. १४२ कोटी लोकसंख्या, शेकडो भाषा, अनेक धर्म-पंथ, असंख्य जाती-जमाती, अनेक प्रकारची संस्कृती, उपासना पद्धतीचे असंख्य प्रकार, खाद्य संस्कृतीतील विविधता, भौगोलिक व वातावरणातील वैविध्य अशी विविधतेची किती तरी उदाहरणे काढता येतील. एवढे वैविध्य असलेला देश एकसंध आहे तो संविधानामुळे आणि संवैधानिक व्यवस्था-यंत्रणांमुळे. भारताचे नागरिक ही आपल्या सर्वांची संवैधानिक ओळख. आता राहिला प्रश्न महाराष्ट्रातील भाजपाच्या विजयाचा. राहिला प्रश्न महाराष्ट्राच्या निकालांचा. त्याबद्दलचा प्रश्न राहुलजींनी अमेरिकेत जाऊन विचारला. त्यांनी महाराष्ट्रात आठ-पंधरा दिवस वेळ देऊन फेरफटका मारला असता तर त्यांनी असा प्रश्न आणि तोसुद्धा परक्या भूमीत विचारला नसता. गतवर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या कामगिरीने काँग्रेसच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. पण, त्याच विजयाने महाविकास आघाडीला आणि विशेषतः काँग्रेसला बेसावध ठेवले. याच निकालाने भाजपाला आणि मित्र पक्षांना मात्र सावध केले. एकीकडे भाजपाने विधानसभा निवडणूक कोणत्याही परिस्थितीत जिंकण्याचा प्रण केला होता. त्यासाठी लोकसभेच्या आधीच तयारी सुरू होती. तिला लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर अधिक वेग दिला गेला. महाविकास आघाडीच्या तंबूत मात्र लोकसभेतील भाजपाला आता यश मिळणे नाही, याची खात्री झाल्यागत माहोल होता. काँग्रेसमध्ये नेहमीचा अंतर्गत कलगीतुरा सुरू होता. महाविकास आघाडीत सुसंवादाचा अभाव सुरुवातीपासून आहेच. तो कायम होता. या पृष्ठभूमीवर महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक झाली. बेसावध आणि गटबाजीने ग्रस्त पक्ष किंवा आघाडीच्या तुलनेत सावध आणि एकसंध पक्ष व आघाडीची कामगिरी चांगलीच राहणार. तशी कामगिरी महायुतीने दाखविली आणि विजय मिळविला. यात अमेरिकेत जाऊन प्रश्न विचारण्यासारखे अद्भुत काहीही नाही. भाजपा एकेक पाऊल पुढे जात असताना काँग्रेसकडे रणनीतीच नव्हती. काँग्रेसच्या उमेदवारांना वाऱ्यावर सोडून दिले गेले होते. २८८ जागांच्या विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष १०८ जागा लढला. महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या राज्यात राहुल गांधी, मल्लिकार्जुन खडगे, प्रियांका गांधी यांनी अपेक्षित लक्ष टाकले नाही. ते यायला लागले तेव्हा उशीर झालेला होता. वातावरण महायुतीच्या बाजूने आधीच वळलेले होते. काँग्रेसकडे मुद्दा नव्हता, नॅरेटिव्ह नव्हते आणि नेतृत्वही नव्हते. भाजपाने मात्र मित्रपक्षांना सोबत घेतले, त्यांना विश्वास दिला. निवडणुकीच्या मुद्यांचा योग्य वापर केला आणि निवडणूक निवडणुकीच्या पद्धतीने लढविली. भाजपाच्या मुत्सद्देगिरीच्या व रणनीतीच्या पासंगात काँग्रेसची कोणतीच तयारी बसत नव्हती. त्यामुळे काँग्रेसचा व महाविकास आघाडीचा पराभव झाला. राहुल गांधींनी स्वपक्षीयांना विचारले पाहिजे की, आपल्या पक्षाचा, आघाडीचा पराभव झाला कसा? त्यांनी हे तपासले पाहिजे की, त्यांचे मित्रपक्ष खरे बोलतात काय, त्यांचे वरिष्ठ नेते आपल्या चुका मान्य करतात काय, आपल्या उमेदवारांना पक्षाने साथ दिली काय, आपल्या पक्षाची प्रचार यंत्रणा व्यवस्थित होती काय इत्यादी. या सर्व प्रश्नांची खरी उत्तरे राहुल गांधी यांनी मिळविली पाहिजे. त्यांना त्यासाठी महाराष्ट्रात यावे लागेल. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे ऐकावे लागेल. नेते खरे बोलणार नाहीत. त्यांना पक्षापेक्षा गटबाजी महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातला कोणताही जिल्हा घ्या. काँग्रेस एकसंध दिसणार नाही. गटबाजी आहेच व असतेच. त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसच्या तळागाळातील कार्यकर्त्यांशी राहुल गांधी, मल्लिकार्जुन खडगे आणि इतर देश पातळीवरील नेत्यांनी बोलावे. नेत्यांनी फक्त ऐकावे. राहुल गांधी यांना त्यांनी अमेरिकेत विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तर मिळेलच. काँग्रेसचा व कार्यकर्त्यांचा आणि काँग्रेसचा व जनतेचा आता कोणताच संबंध उरलेला नाही. संपर्कही नाही. फक्त निवडणुकीत आपला पक्ष उभा असतो, हे पुरेसे नाही. तो सदासर्वकाळ आपला पक्ष वाटला पाहिजे. तसे आपल्या कार्यकर्त्यांना वाटते काय, एवढे तर राहुल गांधींनी महाराष्ट्रात येऊन विचारावे आणि कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. त्यांना सगळे कळेल. भाजपाचा विजय स्वाभाविक होता, हेही कळेल आणि आपल्या पराभवाचे मर्महीं लक्षात येईल. एक नव्हे अनेक कारणे सापडतील. मग ते म्हणू शकतात की...

**एक साधा प्रश्न माझा, लाख येती उत्तरे!**
**हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे?**

## विशेष

# वाहन उद्योगाचा टॉप गिअर

**प्रा. सुखदेव बखळे**

ऑटोमोबाईल उद्योग हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. देशाच्या जीडीपीमध्ये या क्षेत्राचा वाटा ७.१ टक्के असून, जीडीपीमध्ये ४९ टक्के योगदान आहे. भारत सध्या जगातील चौथा सर्वांत मोठा वाहन उत्पादक देश आहे. २०२३-२४ मध्ये भारतात २.८ कोटींहून अधिक वाहने तयार झाली. तथापि, जागतिक ऑटो पार्ट्सच्या व्यापारात भारताचा वाटा सध्या केवळ तीन टक्के (सुमारे २० अब्ज डॉलर) आहे. याचा अर्थ भारतीय उद्योगवाढीसाठी भरपूर वाव आहे. 'नीती' आयोगाच्या अहवालानुसार, २०३० पर्यंत उत्पादन १४५ अब्ज डॉलर्स, निर्यात ६० अब्ज आणि ऑटो पार्ट्सच्या व्यापाराचा हिस्सा आठ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे. अहवालात असेही म्हटले आहे की इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापरामुळे बॅटरी, सेमीकंडक्टर आणि प्रगत सामग्रीची मागणी झपाट्याने वाढत आहे. एकटा चीन या वर्षामध्ये आठ दशलक्षापेक्षा जास्त 'ईव्ही' तयार करेल, तर युरोपीय महासंघ आणि अमेरिकादेखील 'ईव्ही' वाहनांसाठी प्रोत्साहन योजना आखत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), रोबोटिक्स, डिजिटल ट्विन्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी आणि थ्री डी प्रिंटिंग यासारख्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाहननिर्मिती प्रक्रिया स्मार्ट आणि कार्यक्षम बनवत आहे. जर्मनी आणि दक्षिण कोरियासारखे देश स्मार्ट फॅक्टरी स्पेसमध्ये आधीच आघाडीवर आहेत. आज अनेक जागतिक ऑटोमोबाईल कंपन्या भारतातील स्मार्ट कारखान्यांमध्ये गुंतवणूक करत आहेत. केंद्र सरकारच्या 'फेम', 'पीएम-ई ड्राईव्ह' आणि 'पीएलआय'सारख्या योजनांतर्गत आतापर्यंत ६६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मदत देण्यात आली आहे. ती इलेक्ट्रिक वाहने आणि स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे.

योग्य रणनीती अवलंबिल्यास भारत जगाला पुढील पिढीच्या 'मोबिलिटी सोल्यूशन्स'चा प्रमुख पुरवठादार बनवू शकतो, असे अहवालात म्हटले आहे. भारताचे ऑटोमोबाईल क्षेत्र आज खूप वेगाने वाढत आहे. तो देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक मजबूत भाग बनला आहे. सरकारच्या 'मेक इन इंडिया' योजनेने त्याला नवी उंची दिली आहे. २०२३-२४ मध्ये भारताने २८ दशलक्ष वाहनांची निर्मिती केली. हा मोठा विक्रम आहे. आता भारत हे जगातील इलेक्ट्रिक वाहनांचे (ईव्ही) प्रमुख केंद्र बनत आहे. भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी क्षेत्राने या वर्षी जानेवारी-मार्च तिमाहीमध्ये १.५ अब्ज डॉलर्स किमतीचे २९ सौदे नोंदवले. 'ग्रॅण्ट थॉर्नटन इंडिया'च्या अहवालानुसार 'आयपीओ' आणि 'क्यूआयपी' वगळता या क्षेत्राने खंडांमध्ये २७ टक्के वाढ नोंदवली. २०२४ च्या चौथ्या तिमाहीपासून हे मूल्य १९१ टक्क्यांनी वाढले आहे. ते ५०९ दशलक्ष डॉलरवरून १.४ अब्जपर्यंत वाढले आहे. ही वाढ धोरणात्मक आणि आर्थिक गुंतवणुकीद्वारे झाली. त्यात एक अब्ज खाजगी इक्विटी कराराचा समावेश आहे आणि इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही), ऑटोटेक आणि सेवा (मास)सारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये वाढते स्वारस्य पाहायला मिळत आहे.

भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी सेक्टरमध्ये एक मोठे परिवर्तन घडत आहे. त्याद्वारे विद्युतीकरण, डिजिटल इंटिग्रेशन आणि टिकाऊपणावर भर दिला जात आहे. जागतिक व्यापार गतिशीलता आणि पुरवठा साखळीत अडचणी असूनही गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास मजबूत राहिला आहे. गेल्या तिमाहीमधील 'डील व्हॉल्यूम' आणि मूल्यांमधील मजबूत वाढीवरून ते दिसून येते. भारतीय वाहन उद्योगाने स्पर्धात्मक राहण्यासाठी नवकल्पना, धोरणात्मक भागीदारी आणि मूल्यवर्धित ऑफर, विशेषतः 'ईव्ही', ऑटो घटक आणि पुढच्या पिढीतील 'मोबिलिटी सोल्यूशन्स' यासारख्या क्षेत्रात दुप्पट काम केले पाहिजे. २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी सेक्टरमध्ये वाढ होत राहिली आणि ३५९ दशलक्ष डॉलर्स किमतीचे ९ सौदे नोंदवले गेले. हे सलग तिसऱ्या तिमाहीमधील वाढ दर्शवते. इटलीतील फोंटाना ग्रुपने राईट टाईट फास्टनर्समध्ये ११५ दशलक्ष डॉलर्समध्ये ६० टक्के भागभांडवल विकत घेतले आहे. भारतातील ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी क्षेत्रातील खाजगी इक्विटी आणि उद्यम भांडवल क्रियाकलापांनी २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये १.१२ अब्ज डॉलर्सच्या एकूण १९ सौद्यांसह जोरदार वाढ नोंदवली. हे मागील तिमाहीच्या तुलनेत 'डील व्हॅल्यू'मध्ये सहा पट (५०० टक्के) तर 'व्हॉल्यूम'मध्ये ३६ टक्के वाढ दर्शवते.

ऑटोमोबाईल क्षेत्र हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. देशाच्या जीडीपीमध्ये ते सहा टक्के योगदान देते. याचा अर्थ भारताच्या एकूण कमाईत त्याचा मोठा वाटा आहे. या क्षेत्राचे उत्पन्न २४० अब्ज डॉलर्स म्हणजे अंदाजे २० लाख कोटी रुपये आहे. त्यातून तीन कोटी लोकांना रोजगार मिळतो. ४२ लाख लोक यात थेट काम करतात आणि २.६५ कोटी लोक इतर मार्गांनी, जसे की दुकाने किंवा वाहतुकीशी संबंधित आहेत. वाहनांचे सुटे भाग बनवण्याचे कामही खूप महत्त्वाचे आहे. हा उद्योग जीडीपीच्या २.३ टक्के योगदान देतो. त्यात १५ लाख लोक काम करतात. २०२३-२४ मध्ये सुट्या भागांचे उत्पन्न ६.१४ लाख कोटी रुपये होते. त्यापैकी ५४ टक्के भाग भारतातील वाहन उत्पादक कंपन्यांना देण्यात आले. १८ टक्के भाग परदेशात पाठवले गेले. यावरून भारताचे ऑटोमोबाईल क्षेत्र देशातच नव्हे, तर जगभरात मजबूत होत असल्याचे दिसून येते. यापूर्वी भारतात फार कमी वाहने तयार होत होती. १९९१-९२ मध्ये केवळ वीस लाख मोटारींचे उत्पादन झाले; मात्र १९९१ मध्ये सरकारने नियम बदलले. यापूर्वी कंपन्यांना परवाना घ्यावा लागत होता. आता तो नियम काढून टाकण्यात आला. विदेशी कंपन्यांना शंभर टक्के गुंतवणूक सूट मिळाली. यानंतर सुझुकी, ह्युंदाई आणि होंडासारख्या मोठ्या कंपन्या भारतात आल्या. त्यामुळे वाहनांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. २०२३-२४ मध्ये ते २८ दशलक्षवर पोहोचले आहे.

आता भारतात फक्त पेट्रोल आणि डिझेलची वाहने तयार होत नाहीत. इलेक्ट्रिक वाहनांवरही भर आहे. ऑगस्ट २०२४ पर्यंत ४४ लाखांहून अधिक इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी झाली आहे. त्याचा बाजार हिस्सा ६.६ टक्के आहे. यावरून लोक आता नवीन तंत्रज्ञान असलेल्या वाहनांना पसंती देत असल्याचे दिसून येते. भारतीय वाहने आणि त्यांचे पार्ट्स आता जगभर विकले जातात. २०२३-२४ मध्ये भारताने परदेशात ४५ लाख वाहनांची निर्यात केली. सुटे भाग विक्री २१.२ अब्ज रुपयांपर्यंत पोहोचली. हे क्षेत्र दर वर्षी ८.६३ टक्क्यांच्या आसपास वाढत आहे. तज्ज्ञांच्या मते २०२६ पर्यंत ते ३० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. वाहनांचे बहुतेक सुटे भाग युरोप, उत्तर अमेरिका आणि आशियामध्ये विकले जातात. 'पीएम इलेक्ट्रिक ड्राईव्ह'मुळे ईव्ही, ई-ट्रक, ई-बस आणि चार्जिंग स्टेशन्सच्या उभारणीला २०२४ ते २०२६ पर्यंत समर्थन मिळेल. 'पीएम ई-बस सेवा'योजनेंतर्गत २०२४-२९ पर्यंत ३८,००० इलेक्ट्रिक बस चालवण्याची योजना आहे. सरकारने इलेक्ट्रिक वाहनांवरील करही १२ टक्क्यांवरून पाच टक्के केला आहे. नवीन नियमांमुळे घरे आणि कार्यालयांमध्ये चार्जिंग स्टेशन बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे लोकांसाठी गोष्टी सुलभ होतील. त्यांचा बाजारातील हिस्सा ६.६ टक्के आहे. जगात तो बारा टक्के तर चीनमध्ये ३० टक्के आहे. असे असले, तरी या क्षेत्रापुढे अनेक आव्हाने आहेत. इलेक्ट्रिक वाहनांसाठी बॅटरी आणि सेमीकंडक्टर परदेशातून येतात. यामुळे किंमत वाढते. जगात काही अडचण आली तर पुरवठा बंद होऊ शकतो. लहान शहरे आणि गावांमध्ये चार्जिंग सुविधा कमी आहेत. ऑटोमेशन आणि नवीन तंत्रज्ञानासाठी प्रशिक्षित लोक कमी आहेत.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)


## वेध

**गिरीश शेरेकर**

# उच्चांकी तापमानाने विदर्भ होरपळला!

उन्हाळ्यात तापमानात वाढ होणे अपेक्षितच आहे. पण, ते अपेक्षेपेक्षा जास्त नको इतकीच भावना प्रत्येकाची असते. निसर्गाचे चक्र भावनेवर चालत नाही. बदललेल्या स्थितीचा त्याच्यावर परिणाम होत असल्याने तीनही ऋतू आपले गुणधर्म विसरून बसले आहेत. याला मनुष्य नावाच्या प्राण्याइतका दुसरा कोणताच प्राणी जबाबदार नाही. आता उन्हाळ्यात जी उच्च तापमानाची स्थिती निर्माण झाली आहे, ती त्याचाच एक भाग आहे. त्याचे जे भोग आहे ते मनुष्यासह सर्वच सजीव घटकांना भोगावे लागणार आहेत. विदर्भातले तापमान दरवर्षी आपलेच विक्रम मोडत आहे. उच्चांकी तापमानाने विदर्भ होरपळत आहे. अशीच वाढ होत राहिली तर भविष्यातल्या दिवसांमध्ये काय होईल, याची कल्पना केली तरी अंगावर शहारे येतात.

यंदाचा एप्रिल महिना हा गत १२० वर्षांतील आजवरचे सर्व विक्रम मोडणारा ठरेल, असा अंदाज हवामानशास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. उन्हाळ्यात पडणारा सरासरी पाऊस न पडल्याने यंदा तापमान दरवर्षी इतकेच असले तरी, एकूण उष्मा (टोटल हिट कंटेंट) प्रचंड वाढला आहे. सर्वत्र उष्णतेची लाट उसळल्याने घरात राहूनही लोकांना उष्णतेच्या विकारांनी ग्रासले आहे. विदर्भ, उर्वरित महाराष्ट्रासह देशातील सर्वच राज्यांत एप्रिलमध्ये अतितीव्र स्वरूपाची लाट सक्रिय झाली असून, बाहेर पडणे सोडाच, घरातही पंखा आणि कूलर सुरू असला तरी बसवत नाही, इतका तीव्र उन्हाळा आहे, अशी सर्वसामान्यांची प्रतिक्रिया आहे. हवामान शास्त्रज्ञ म्हणतात, यंदा मुंबईसह राज्यात सर्वत्र फेब्रुवारीमध्येच पहिली उष्णतेची लाट जाणवली. आजवर २०२४ एप्रिल सर्वांत उष्ण ठरला होता. मात्र, २०२५ एप्रिल हा विक्रम मोडेल.




कारण फेब्रुवारी ते एप्रिल अशा सलग तीन महिन्यांत उष्णतेच्या लाटांचे कालावधी सर्वाधिक ठरले आहेत. यंदा अतिउष्णतेमुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत आहे. त्यामुळे कडक उन्ह आणि बाष्प यांच्या संगामातून हिट डिस्कंफर्टचा त्रास लोकांना होत असल्याचे मत हवामान शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे. पूर्वी उन्हाळ्यात फक्त विदर्भ आणि कोकणात हा त्रास होत असे. आता त्यातही वाढ झाली असून, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या शहरांतही असा त्रास होत आहे. प्रचंड उकाड्यामुळे कूलर, पंखे लावले तरी थंड न वाटता अस्वस्थ वाटते. अंगाची लाही लाही होते. येत्या काही दशकांत भारतातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांना अतिउष्णतेचा परिणाम जाणवू शकतो. एप्रिल ते जून हे सर्वांत उष्ण महिने असतात. परंतु, सप्टेंबरपर्यंतही विजेची मागणी जास्त राहते. याचे कारण म्हणजे 'वेट बल्ब इफेक्ट' अशी शास्त्रज्ञांनी संज्ञा तयार केली आहे. त्याला उष्ण आणि दमट असे वातावरण म्हणतात. त्यामुळे मानवी शरीर थंड होणे कठीण होते तसेच शहरात काँक्रिटीकरणामुळे उष्मा बाहेर पडत नाही; तर ग्रामीण भागात काळी जमीन दिवसभर उष्मा शोषून घेते. त्यामुळे शहरांसह ग्रामीण भागही यंदा खूप जास्त तापला आहे.

मागील तीन दिवसांपासून विदर्भातले सर्वच जिल्हे अक्षरशः पेटत आहे. तापमानात कमालीची वाढ झाली असून, सोमवारी चंद्रपूरचे तापमान ४५.६ अंश सेल्सिअसवर पोहोचले. हे तापमान देशात सर्वाधिक असल्याची नोंद झाली. विशेष म्हणजे याच जिल्ह्यातील ब्रह्मपुरी शहरात ४५ अंश सेल्सिअस एवढे तापमान 'वर्ल्ड वेदर' या वेबसाईटने नोंदविले. तापमानाकडे नजर टाकली तर चंद्रपूरच जगात अग्रेसर असल्याचे दिसते. पुढचे दोन दिवस जिल्ह्याला 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. देशात चंद्रपूरनंतर ओडिशातील झरसुगुडा येथील तापमान ४५.४ एवढे होते. अमरावती ४४.६, अकोला ४४.१, नागपूर ४३.६, वर्धा ४३.४, यवतमाळ ४३.४, गडचिरोली ४३, वाशीम ४२.५, गोंदिया ४२.१, भंडारा ४१.४, तर बुलढाणा येथे ३९.८ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली. येणाऱ्या चार ते पाच दिवसांत कमी अधिक असेच तापमान राहण्याची शक्यता आहे. ही सुरुवात आहे. पुढचे किमान दोन महिने उष्णतेच्या लाटांचा असाच सामना करावा लागणार आहे. यातून कायमची सुटका करायची असेल तर अनेक उपाय आहेत. पण, ते शाश्वतपणे केल्याशिवाय आपल्याकडे आता दुसरा पर्याय उरलेला नाही.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# चरैवेती! लोक तर म्हणतच असतात!

**प्रा. दिलीप जोशी**

'लोक काय म्हणतील?' या एका विचाराने अनेक जण आपल्या कार्याचा वेग, आपल्यात असलेली ऊर्जा, आपले कौशल्य, आपली बुद्धी, आपली शक्ती आणि आपल्या पराक्रमाला विनाकारण लगाम घालत असतात. लोकांचे काय हो? त्यांना काहीच करायचे नसते! त्यांना फक्त प्रत्येक बाबीवर अकारण प्रतिक्रिया द्यायची असते. त्यांना तुमच्याशी काहीच घेणे-देणे नसते. फक्त तुमची प्रगती त्यांच्या डोळ्यात खुपते आणि ते प्रतिक्रियाळतात. त्यांच्या आगाऊ प्रतिक्रियेने आपण विचलित होतो. पण अशा दुर्जनांना आपण महत्त्व का द्यायचे ? म्हणू द्यात त्यांना काय म्हणायचे ते. आपण मात्र चालत राहायचे अविचल, अथक, निरंतर आणि परिश्रमाने.

आपलंही कसं असतं पाहा. लोकांनी चांगले म्हटले की आपण आनंदी, लोकांनी वाईट म्हटले की आपण लगेच दुःखी. म्हणजे आपला आनंद आणि दुःख लोकांच्या हातात आहे. माझा आनंद माझ्या हातात असावा. माझ्या आनंदाचा कासरा त्या कुचरांच्या हातात का म्हणून द्यायचा? लोकच ते! ते तर म्हणतच असतात.

भगवान रामचंद्र, भगवान कृष्णचंद्र, छत्रपती शिवराय, छत्रपती शंभुराजे, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकरांना त्यांच्या त्यांच्या काळात लोक म्हणतच होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांना तर आजही असे लायकी नसलेले वाचाळवीर बरळत असतात. पण या सर्व महापुरुषांनी 'लोक काय म्हणतील?' असा विचार न करता कार्यकर्तृत्व सुरूच ठेवले. आज ते अजरामर झालेत आणि त्यांना वाचाळ विरोध करणारे काळाच्या प्रवाहात गडप झालेत. हेच महात्मे आपला आदर्श हवेत.

अगदी आताच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, ज्येष्ठ नेते शरद पवार, अण्णा हजारे असे असंख्य नेते आहेत; त्यांना लोक म्हणतच असतात. म्हणून ते थांबले असं नाही. कारण त्यांना माहीत आहे की, लोक म्हणतच असतात. बरं! आपल्यासारख्या सामान्य माणसांनाही हाच अनुभव असतो. फरक इतकाच की, आपल्याबाबत वाचाळणारे लोक आपल्या सभोवतालचे असतात. हे सभोवतालचे लोक पचवणे हीच खरी परीक्षा असते. सभोवतालचे लोक तुमच्यासारखे काहीच कार्य करीत नसतात. ते रिकामे असतात. रिकामे असल्याने ते फक्त तुमच्या प्रत्येक गोष्टीला विरोध करीत असतात किंवा विचलित करणाऱ्या प्रतिक्रिया देत राहतात. त्यांचा विरोध सकारात्मक घेतला पाहिजे. 'निंदकाचे घर असावे शेजारी' असे उगीच म्हटले नाही. त्यांचा विरोध तुम्हाला सजग राहण्यासाठी कारणीभूत ठरतो. म्हणून 'लोक काय म्हणतील?' हा विचार मनातच येऊ द्यायचा नाही. विचार आला तरी त्यातून चांगला अर्थ काढायचा. लोक तर म्हणतच असतात. उलट ती योग्य मार्गावर राहण्याची बाब आहे असे समजायचे. मी लहानपणापासून सामाजिक कार्यात आहे. लोकांचे पराकोटीचे चांगले आणि वाईट अनुभव मी अनुभवले आहेत. आनंद आणि दुःखाच्या चाव्या लोकांच्या हातात कधीच द्यायच्या नाहीत, हे मी अनुभवातून शिकलो. बरं, जे लोक तुमच्याशी तोंडावर चांगले वागतात ते पाठमोऱ्या स्थितीत तसेच असतील, याची अजिबात खात्री नाही. उलट तुमच्या तोंडावर स्पष्ट बोलणारे माघारी तुमचे समर्थक असू शकतात, हेही ध्यानात ठेवावे. लोकांचं काय हो! तुम्ही त्यांच्या मनासारखे वागलात की ते तुमचे समर्थक. त्यांच्या मनाविरुद्ध वागलात की लगेच विरोधक. अपवाद वगळले तर सभोवतालची माणसे अशीच असतात बहुधा. त्यामुळे आपल्या अंतःकरणाचा आवाज ऐकायचा आणि कार्य सुरूच ठेवायचे.

अजून एक लक्षात ठेवा, ज्यांच्या भेटण्याने आपली मनस्थितीच खराब होत असेल तर त्यांना का ठेवायचे आपल्या जीवनात? त्यांना हळूच दूर करा, त्यांच्याविषयी कोणताही आकस न ठेवता. ते आपल्या गृहास न यावे, आपण त्यांच्या सदनास न जावे. ते त्यजावे जीवेभावे. जगात अशी खूप चांगली माणसे आहेत की ज्यांच्यासोबत संगतीने आनंद आणि शांती मिळते. काही माणसे तुमच्याशी काहीच संबंध नसताना तुमच्यावर राळ उडवत असतील तर समजा तुमचे आभामंडल विस्तारित झाले आहे. तुमची कीर्ती दिगंताकडे वाटचाल करीत आहे. त्या राळीला उत्तर देऊ नका; उलट आपले आभामंडल विस्तारित झाल्याचा आनंद लुटा. खूपदा लोक बोलतात. कारण त्यांना तुमचा खरंच विरोध असतो असे नाही तर तुमच्या येण्याने ते शून्य होतात म्हणून ते विरोध करतात. असा गोड विरोध पचवता आला पाहिजे.

'लोक काय म्हणतील?' असा वारंवार विचार हे दुर्बल मन:स्थितीचे लक्षण आहे. म्हणू द्यात त्यांना काय म्हणायचे ते. आपण अविचल चालत राहा. 'चार शेंबड्या पोरांना घेऊन काही होत असते का?' असे लोक म्हणत होते म्हणून डॉ. हेडगेवार थांबले नाहीत. उलट त्यांनी अशा कुचराच्या दाण्यांना अनुल्लेखाने मारून जोमात कार्य केले आणि आज जगातील प्रचंड मोठे संघटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ उभे आहे. योगगुरू रामदेवबाबांना लोक वाटेल ते बोलले आणि बोलतात, पण म्हणून ते विचलित झाले नाहीत. परिणाम सर्वांसमोर आहे.

लोक नावाचा विशिष्ट समुदाय नसतो. लोक म्हणजे कुणीतरी व्यक्तिगत माणूस असतो. काही माणसे अशी असतात की, अठरा विसा म्हणजे तीनशेपासष्ट दिवस सतत त्यांच्या डोक्यात तुम्हीच असता. 'दळिता कांडिता तुज गाईन अनंता' अशीच स्थिती असते त्यांची. लक्षात ठेवा, प्रत्येक वेळी आपणच बरोबर असतो असेही नाही. आपली चूक असेल आणि त्यावर लोक बोलले तर आपण सुधारणा केलीच पाहिजे. पण काही माणसे तुम्ही काहीही करा, त्यांचा विरोध ठरलेला. उद्या तुम्ही म्हणालात की, 'शौचानंतर हात स्वच्छ धुवावेत' तर हे म्हणतील, 'नाही! आता तर आम्ही चाटणार!' ही त्यांची प्रतीक्षिप्त क्रिया म्हणजे मेंदूच्या आज्ञेशिवाय प्रतिक्रिया. मग अशा लोकांना कुढतकुढत जगू द्या. त्यांना अनुल्लेखाने मारा! तुमच्याबद्दल वाईटसाईट बोलणाऱ्या या लोकांबद्दल समाजातील इतर लोकांचे मत अजिबात चांगले नसते. ते वात्रट आहेत हे सर्वांना माहीत असते, फक्त 'दुर्जनं प्रथमम् वंदे' म्हणून इतर माणसे दुर्लक्ष करतात. इतरेजन तुमच्या कार्याचे प्रशंसकच असतात. त्यामुळे आपण आपल्या आनंदात आपली विधायक कामे करीत राहायची. लोकांचं काय हो? ते तर म्हणतच असतात. चला तर! कामात आहात तर अजून जोमात भिडा! दुर्जनांकडे दुर्लक्ष करा! लोक तर म्हणतच असतात.

सूर्यस्य पश्यश्रेमाणम्, यो न तंद्रयते चरन् ।

त्या सूर्याकडे पाहा तो कसा सतत चालत असतो म्हणजे कार्यरत असतो. त्याच्यावर कोणी थुंकले तर थुंकणाऱ्याचेच श्रीमुख भरते!

९८२२२६२७३५

### विरोधी पक्षात 'दे धक्का'; आत्मपरीक्षणाची गरज

सध्याच्या राजकारणाच्या पृष्ठभूमीवर विरोधी पक्षांमध्ये प्रचंड अस्थिरता आणि अंतर्गत अस्वस्थता जाणवत आहे. निवडणुकीचे वारे वाहू लागले की, अनेकजण 'दे धक्का' पद्धतीने पक्षांतर करत आहेत. विशेषतः निष्ठावंत कार्यकर्ते आणि जुन्या सहकाऱ्यांचाही पक्षावरचा विश्वास डळमळीत झाल्याचे चित्र अनेक राज्यांमध्ये दिसून येतो. विरोधी पक्षांमध्ये विश्वासू नेतृत्व आणि स्पष्टता नसल्यामुळे कार्यकर्त्यांची दिशाभूल होते. अनेकदा निर्णय प्रक्रिया अपारदर्शक असते. त्यामुळे जुने निष्ठावंत नाराज होतात. सत्तेपासून दूर असलेल्या पक्षांमध्ये कार्यकर्त्यांना स्वतःचे राजकीय भविष्य असुरक्षित वाटते. त्यामुळे सत्ताधारी पक्षाकडे वळण्याची प्रवृत्ती वाढते. अनेक जुने कार्यकर्ते वर्षानुवर्षे पक्षासाठी झटलेले असतात, पण त्यांना संधी न देता नवख्या, बाहेरून आलेल्या नेत्यांना प्राधान्य दिले जाते. ही स्थिती निष्ठेचा अवमान वाटू लागते. विरोधी पक्षांमध्ये अनेक ठिकाणी गटबाजी आणि 'मीच मोठा' वृत्तीमुळे पक्षसंघटना ढासळते. अशा वातावरणात निष्ठावंत कार्यकर्ते दडपले जाऊन बाहेर पडतात. विरोधी पक्ष हे लोकशाहीचा महत्त्वाचा घटक असतात. परंतु जर त्यांच्यातील निष्ठावंत हात सोडू लागले, तर हा पक्षाच्या अस्तित्वासाठी आणि व्यापक लोकहितासाठीही चिंतेचा विषय ठरत आहे.

**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

### लग्न जुळणे एक समस्या

गेल्या काही वर्षांपासून मुलांचे लग्न जुळणे ही मोठी समस्या होऊन बसली आहे. त्यातल्या त्यात भिक्षुकी करणारे आणि शेतकरी मुलांना मुली मिळणे फार कठीण झाले आहे. शहरातील मुलींना गावातील मुलगा चालत नाही. मुलाला भरपूर पगाराची नोकरी मोठ्या शहरात असावी तसेच शेतीवाडी असावी अशा अपेक्षा असतात, पण मुलगा शेतकरी नको. याला काही अपवादही असतील.

आज मुलाची निवड करताना पहिले प्राधान्य त्याच्या पगाराला जाते. पालकांनी आणि मुला-मुलींनी हे लक्षात घेतले पाहिजे की, सर सलामत तो पगडी पचास, या उक्तीप्रमाणे

## वाचक पत्रे



मुलगा चांगला असेल तर पुढील आयुष्यात प्रगती नक्की करेल, हळूहळू सुखसुविधा येतील. संसार हा दोघांचा असतो. त्यामुळे दोघांनीही स्वकष्टार्जित कमाईने घर उभे करावे. आज थोडे कमी असेल तरी उद्या चांगले दिवस येतील. गावातील मुले आज निराशेकडे झुकताना दिसून येताहेत. वयाची चाळिशी येते तरी लग्न जुळत नाहीत. शेवटी लग्न न करण्याचा निर्णय घेतात. मुलींच्या किंवा काही वेळा मुलांच्या अवास्तव अपेक्षांमुळे त्यांचेही लग्नाचे वय उलटून जाते आहे. योग्य वराची अथवा वधूची वाट बघताना मुला-मुलींची, पालकांची दमछाक होताना दिसते. ही एक सामाजिक समस्या होत चालली आहे. त्यामुळे सारासार विचार करून थोडा है थोडे की जरुरत है हे धोरण ठेवून लग्नास होकार द्यावा.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### मानवाधिकाराचे ठेकेदार कोणत्या बिळात घुसले!

विरोधकांच्या टोकाच्या विरोधानंतरही वक्फ सुधारित कायदा संसदेच्या दोन्ही सभागृहांत बहुमताने पारित झाला आणि मुस्लिमधार्जिण्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी हा कायदा बंगालमध्ये लागू करणार नाही असे जाहीर केले. म्हणजे त्या केंद्र सरकारला आव्हान देत आहे. त्यामुळे मुस्लिमांना वाटते ''दीदी अपने साथ है, तो डरने की क्या बात है!'' ममतांच्या मुस्लिमांना अभय देण्यामुळेच बंगालच्या चार जिल्ह्यांत- त्यात मालदा, नादिया, दक्षिण परगणा आणि मुर्शिदाबादमध्ये धार्मिक हिंसाचार उफाळला आणि त्यात हिंदूंना लक्ष्य करण्यात आले मुर्शिदाबाद या मुस्लिमबहुल जिल्ह्यात, तर ५०० हिंदूंनी मालदा येथे एका शाळेत आश्रय घेतला आहे. यावरून तेथल्या हिंसाचाराची धग लक्षात यावी. आता ते मानवाधिकाराचे तथाकथित ठेकेदार कोणत्या बिळात घुसले आहेत? कुठे आहे ती काँग्रेसाध्यक्ष मल्लिकार्जुन खडगेंच्या काँग्रेसची सत्यशोधक समिती? हिंदूंची घरे पेटविली गेली आणि येथील खासदार युसूफ पठाण समाज माध्यमावर तेथील हिंसाचाराच्या संबंधाने 'अच्छी चाय' अशी निर्लज्ज पोस्ट टाकतो. किती निर्ढावलेली आहेत ही 'हिरवी पिलावळ.' कम्युनिस्टाच्या शासन काळापेक्षाही 'रानटी शासन व्यवस्था' असणाऱ्या बंगालमधील तृणमूलच्या अनियंत्रित सत्तेला लोकशाही मार्गाने उखडून फेकण्याची आज नितांत गरज आहे.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# हिंदीच्या सक्तीबाबत अखेर सरकार बॅकफुटवर!

## हिंदी ऐच्छिक भाषा: शिक्षणमंत्र्यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२३ एप्रिल-**

पहिलीपासून हिंदी सक्तीची करण्याच्या निर्णयावर सर्वस्तरातून टीकेची झोड उठल्यानंतर महायुती सरकार बॅकफूट वर आली आहे. तिसरी भाषा हिंदी ही बंधनकारक नसून ऐच्छिक असणार आहे, असे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. खुद्द शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी त्याची घोषणा केली.



मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय झाल्यानंतर ना. भुसे पत्रकार परिषद घेऊन त्याबाबतची माहिती दिली. ते म्हणाले की, हिंदी भाषेच्या वापरासंदर्भातील निर्णयात सरकारने अनिर्वाय हा शब्द वापरला होता. आता अनिवार्य या शब्दाला शासन स्थगिती देत आहे. हिंदी भाषा ही बंधनकारक असणार नाही तर ऐच्छिक असेल.१६ एप्रिल रोजी जो शासन निर्णय जारी झाला त्यात मराठी भाषा विषय तसाच राहणार आहे. मराठी भाषेला प्राधान्य राहील. इंग्रजी दुसरा विषय असेल. तर तिसरा विषय हिंदी भाषा असेल. हिंदी विषय केंद्र सरकारने बंधनकारक केलेला नाही. सुकाणू समितीने तृतीय भाषा हिंदी विषय स्वीकराला आहे. शासन निर्णयामध्ये हिंदी भाषा अनिवार्य असेल असा शब्द वापरला गेला. त्यामुळे प्रश्न निर्माण झाला. हिंदी सोडून जर दुसरी भाषा शिकायचं ठरलं तर शिक्षकसुद्धा बदलावे लागतील. त्यासाठी धोरण ठरावावे लागेल, आताच्या घडीला हिंदी विषय ऐच्छिक ठेवणार आहोत. इतर विषयासंदर्भात आपण निर्णय घेऊ.

जे विद्यार्थी हिंदी भाषेसाठी इच्छुक असतील त्यांना मराठी, इंग्रजीसोबत हिंदी विषय शिकवला जाईल. या संदर्भातला शासन निर्णय यथावकाश निर्गमित केला जाईल, असेही दादा भुसे यांनी सांगितले.

### सरकारने काय निर्णय घेतला होता?

राज्य शैक्षणिक संसोधन आणि प्रशिक्षण परिषदेने नुकतेच राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा-२०२४ तयार केला. या आराखड्यानुसार मराठी तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळांत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना मराठी, इंग्रजसह हिंदी ही तृतीय भाषा शिकणं अनिवार्य करण्यात आलं होतं. सरकारच्या याच निर्णयाला नंतर राजकीय, समाजिक स्तरातून विरोध झाला. आम्ही हिंदीची सक्ती खपवून घेणार नाही, असे विरोधी बाकावरील पक्षांनी म्हटलं होतं. या निर्णयाला विरोध झाल्यानंतर आता सरकारने हिंदी भाषा शिकण्याची अनिवार्यता हटवून टाकली आहे.

# वक्फ कायद्यामुळे गरीब, गरजू मुस्लिमांना न्याय मिळेल

## केंद्रीय अल्पसंख्याक मंत्र्यांचा दावा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई,दि.२२ एप्रिल -**

वक्फ (सुधारणा) कायद्याचा मूळ उद्देश पूर्वीच्या कायद्यातील त्रुटी दूर करून वक्फ बोर्डाची कार्यक्षमता वाढवणे हा आहे. 'वक्फ मालमत्तां'च्या नियमन आणि व्यवस्थापनातील समस्या आणि आव्हाने दूर करण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. त्यामुळे कोणाच्याही अधिकारांचे हनन होणार नाही. सर्व गरीब गरजू मुस्लिमांना न्याय मिळेल, असा दावा केंद्रीय अल्पसंख्याक विकास व संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी मंगळवारी केला.

भाजपाकडून वक्फ सुधारणा विधेयकाबाबत प्रदेश कार्यालयात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केंद्रीय मंत्री रिजिजू म्हणाले, वक्फ बोर्डातील गैर-मुस्लिम सदस्यांच्या समावेशाबद्दल टीका करणाऱ्यांनी प्रयागराज येथील कुंभमेळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आझम खान हे होते. पण आम्ही कधीही असा विचारच केला नाही. या कायद्यामुळे आता वक्फ बोर्डांना मनमानीपणे कुठल्याही मालमत्ता वक्फ म्हणून घोषित करता येणार नाहीत. हा कायदा संपूर्ण गावेच्या गावे 'वक्फ' म्हणून घोषित करण्यासारख्या गैरवापरांना प्रतिबंध करणार आहे. या कायद्याचे अनेक गरीब मुस्लिम बांधव आणि गटांनी समर्थन केले आहे. हा कायदा मंजूर केल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे पसमंदा, बोहरा, अहमदिया यांसारख्या समाजांनी आभार मानले आहेत. या समुदायाच्या मुख्य मागण्या या कायद्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या कायद्यामुळे मुस्लिमांच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप केला जाईल या मतपेढीच्या राजकारणासाठी विरोधक पसरवत असलेल्या केवळ अफवा असल्याचे त्यांनी नमूद केले.



खासगी मालमत्तांना 'वक्फ मालमत्ता' म्हणून घोषित करण्यासाठी 'वक्फ कायद्या'च्या 'कलम ४०'चा मोठ्या प्रमाणात गैरवापर केला जात होता. आता 'वक्फ' मालमत्तेचे निष्पक्ष आणि पारदर्शक प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी 'वक्फ कायद्या'तील 'कलम ४०' रद्द केले जात आहे असे सांगून रिजीजू म्हणाले की, नियमानुसार आता मुतवल्लींना सहा महिन्यांच्या आत केंद्रीय पोर्टलवर मालमत्तेची माहिती नोंदवावी लागेल. पोर्टलद्वारे 'वक्फ मालमत्ता' व्यवस्थापन स्वयंचलित करेल, ज्यामध्ये नोंदणी, ऑडिट, खटले यांचा समावेश असेल, ज्यामुळे व्यवस्थेत पारदर्शकता येणार आहे. कोणत्याही स्वरुपांच्या वादांचे निराकरण जिल्हाधिकारी करतील, जे राज्याला अहवाल देणार आहेत.

यावेळी खा. मेधा कुलकर्णी, भाजपा प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक , प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष इद्रीस मुलतानी आदी उपस्थित होते.



# २६/११ तील शहीद पत्नी कल्पना पवार बनल्या पोलीस उपअधीक्षक!

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२२ एप्रिल -**

२६/११ च्या मुंबई हल्यातील शहीद पोलीस शिपाई अंबादास पवार यांच्या पत्नी कल्पना पवार यांना थेट पोलीस उपअधीक्षकपदी नियुक्ती देण्यात आली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांना मंगळवारी नियुक्तीपत्र देण्यात आले.

२६/११/ मुंबई दहशतवादी हल्ल्यात अतिरेक्यांशी लढताना कॉन्स्टेबल अंबादास पवार यांच्या पत्नी श्रीमती कल्पना पवार यांना परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षकपदावरील थेट नियुक्तीचे आदेश प्रदान करण्यात आले. ही नियुक्ती करताना मुख्यमंत्री यांनी शहीद पोलीस आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी असलेली शासनाची कृतज्ञता आणि संवेदनशीलता पुन्हा एकदा प्रत्यक्ष कृतीतून दाखवली आहे.

मुख्यमंत्री यांच्या या निर्णयाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना कल्पना पवार म्हणाल्या, ''माझ्या पतीप्रमाणेच मलाही आता देशसेवेची संधी मिळाली आहे. हे सरकार शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, लाडक्या बहिणींचे आणि देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या शहीद वीरांचे आहे, हे माझ्या या नियुक्तीतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.''

# सीएसआरएलद्वारे घडतात विद्यार्थी जेईई मेन्स आणि ॲडव्हान्ससाठी प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. २२ एप्रिल-**

सीएसआरएल (सेंटर फॉर सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अँड लीडरशिप) २००७ मध्ये स्थापन झालेली एक नोंदणीकृत एनजीओ. आम्ही एक समर्पित संस्था आहोत जी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणांना दर्जेदार शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रमंद्वारे सक्षम करून समावेशक आणि नैतिक समाज निर्माण करण्यासाठी काम करत आहे.

सीएसआरएलचा प्रमुख उपक्रम अभियांत्रिकी इच्छुकांसाठी एक वर्षाचा मोफत निवासी मार्गदर्शन कार्यक्रम प्रदान करतो. जेईई मेन्स आणि ॲडव्हान्स्डसाठी सघन प्रशिक्षण प्रदान करतो. विद्यार्थ्यांना आरामदायी निवास, पौष्टिक जेवण आणि भारतातील अत्यंत अनुभवी प्राध्यापकांकडून शैक्षणिक मार्गदर्शन दिले जाते. सध्या, आम्ही देशभरात सुमारे ३० केंद्रे चालवतो. आमच्या नवीनतम जोड्यांपैकी एक, ओएनजीसी सुपर ३० जळगाव, जून २०२४ मध्ये ओएनजीसीने प्रायोजित केले.



कर्मचारी आणि प्राध्यापक खालीलप्रमाणे आहेत: प्रकल्प व्यवस्थापक - शशांक गारे, प्रकल्प अधिकारी - देवेंद्र सावकारे, प्रशिक्षणार्थी विद्याशाखा (रसायनशास्त्र) - कमलेश कुमार, भौतिकशास्त्र विद्याशाखा - गोविंद तिवारी, रसायनशास्त्र विद्याशाखा - आतिश कुमार, गणित विद्याशाखा - बिरेंद्र कुमार.

या केंद्राने पहिल्या बॅचमध्ये ३० विद्यार्थ्यांची नोंदणी केली. आम्हाला हे सांगताना खूप अभिमान वाटतो की, जेईई मेन्स फेज १ मध्ये, ३० पैकी २६ विद्यार्थी पात्र ठरले. जेईई मेन्स फेज २ मध्ये, ३० पैकी २८ विद्यार्थी जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेसाठी पात्र ठरले. नव्याने स्थापन झालेल्या केंद्राची ही अपवादात्मक कामगिरी केवळ विद्यार्थ्यांसाठीच नाही तर संपूर्ण समुदायासाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी आहे. समर्पण, प्रतिभा आणि संधीची ही कहाणी व्यापकपणे सामायिक केली पाहिजे असे आम्हाला वाटते.


## तहसील कार्यालय, तुळजापूर

(भुसुधार विभाग)
ता. तुळजापूर जि. धाराशिव

जा.क्र.२०२४ महसूल/सुधार/कावि -२९६ दि.१६.०४.२०२५

### जाहीर प्रगटन

प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे मौ.वाणेवाडी ता.तुळजापुर जि.धाराशिव येथील सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की , अर्जदार श्री बाळु अंबादास साठे माजे वाणेवाडी ता . तुळजापूर यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे वाणेवाडी ता . तुळजापूर येथील जमीन गट नंबर २९६ मध्ये क्षेत्र ५.०० हे . आर . असून या जमीनीच्या ७/१२ वरील इतर अधिकार मध्ये साधे कुळ सं.कु. भिमा घोडि बामन पायमार्ग ही नोंद कमी करणे बाबत अर्जादारे विनंती केलेली आहे.

अर्जदार यांनी उक्त जमीनवरील क्षेत्राला इतर अधिकारमध्ये साधे कुळ सं.कु. भिमा धोडि बामन पायमार्ग ही नोंद कमी करणे बाबत आवश्यकती कागदपत्रे या कार्यालयास सादर केलेली आहेत . सदर जमिनी बाबत या कार्यालयास कुळ नोंद कमी करणे बाबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा काही अक्षेप, उजर, तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरूपात तहसील कार्यालय तुळजापूर येथे कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा. अन्यथा विहीत मुदतीत कोणाचा आक्षेप, उजर , तक्रार नाही असे समजण्यात येऊन सदर प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी . तसेच सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेण उजर , तक्रार, विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**
**(अरविंद बोळंगे)**
**तहसीलदार तुळजापुर**




# अक्षय सोसायटी समोरील शिवशक्ती चौक येथील ड्रेनेजचे काम पूर्णत्वास

## नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या अथक प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

प्रभाग क्रमांक २६ मधील अक्षय सोसायटी जवळील शिवशक्ती चौकात नेहमी वर्दळ असते या चौकातून ओम गजानन चौक, बॉम्बे पार्क, भाग्यलक्ष्मी पार्क, अक्षय सोसायटी, गुरुदेव दत्त नगर, आय एम एस कॉलेज, या भागातील नागरिक ह्या रस्त्यावरून सारखी वर्दळ असते.

गेल्या तीन दिवसापासून सदर चौकात ड्रेनेज लाईन तुंबल्यामुळे रोडवर गटारीचे पाणी येऊन ते अक्षय सोसायटीच्या मैदानात गेल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली होती. नागरिकांनी वारंवार संबंधीत विभागाकडे तक्रार करूनही त्याची कोणी दखल घेत नव्हते.

त्यावेळी सदर परिसरातील महिला वर्ग ही बाब नगरसेविका राजश्री चव्हाण यांचे निदर्शनास आणून दिली व आमची कोणीच दखल घेत नाही अशा व्यथा मांडल्या असता नगरसेविका चव्हाण यांनी लगेच सोलापूर महानगरपालिका आयुक्त ओंबासे यांना सदर समस्या निदर्शनास आणून दिल्यानंतर तातडीने अतिरिक्त आयुक्त श्री संदीप कारंजे साहेब यांना सदर समस्या आजचे आज पूर्ण करण्यासाठी आदेश दिल्याने युद्ध पातळीवर तेथील काम एका दिवसात पूर्ण केल्याने तेथील रहिवासी यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

आपले मनोगत व्यक्त केली की.. नगरसेवक असावा तर नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांचा सारखा असावा कारण त्यांना फोन किंवा समक्ष भेटून समस्या सांगितल्या तर त्या जातीने पाठपुरावा करतात व नागरिकांच्या समस्या सोडवतात. विशेष म्हणजे त्यांचा नगरसेवकांचा कार्यकाल संपलेला असताना सुद्धा त्या नागरिकासाठी जोमाने कामे करत आहेत हे विशेष. वास्तविक पाहता इतर नगरसेवक कुठे आहे हेच दिसत नाही परंतु नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांचे बाबतीत सांगायचे झाले तर ते वेगळेच आहे विशेष म्हणजे त्यांना फोन केला असता जातीने उचलतात व समस्या ऐकून घेऊन त्यांचं निराकरण करीत असतात एखाद्या वेळेस जर चुकून फोन उचलला गेला नाही किंवा मिस कॉल पडला तर त्या आवर्जून फोन करतात व समस्या ऐकून घेऊन संबंधित अधिकारी यांना समक्ष बोलवून घेऊन त्यांचे समस्याचे निराकरण करीत असतात हे विशेष अशा जनतेसाठी तळमळ असणाऱ्या नगरसेविका आम्हाला लाभल्या हे आमचे भाग्य समजतो असे मनोगत व्यक्त केले व तातडीने दुर्गंधीच्या समस्या दूर केल्याने त्यांचे मनापासून आभार मानले आहे.

# जिल्हा प्रशासन विभागातील तीन अधिकाऱ्यांना पदोन्नती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

जिल्हा अधिकारी कार्यालयातील निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार,महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, प्रमोद गायकवाड या तीन जणांना पदोन्नती मिळाली आहे.सोलापूरच्या निवासी भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांना अकोला अप्पर जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती मिळाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वने विभागामार्फत निवड सूची कार्य २०२४-२५ उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गात पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी पदी संवर्गातील नियमित पदोन्नती कोट्यातील रिक्त पदावर पदोन्नती व पदस्थापना देण्याचे आदेश शासनाचे उपसचिव महेश वरुडकर यांनी मंगळवारी जाहीर केले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत निवड सूची कार्य २४- २५ उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गात पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी पदी संवर्गातील नियमित पदोन्नती कोट्यातील रिक्त पदावर पदोन्नती व पदस्थापना देण्याचे आदेश शासनाचे उपसचिव वरुडकर यांनी मंगळवारी जाहीर केले.

यामध्ये निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांना अप्पर जिल्हाधिकारीपदी पदोन्नती देत मुंबईच्या उद्योग विभागाच्या मैत्री कक्षाकडे नियुक्ती करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांना मुंबईच्या झोपडपट्टी प्राधिकरणचे सचिव म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे भूसंपादन अधिकारी प्रमोद गायकवाड यांची अकोला अप्पर जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे,नगर व भूमापन अधिकारी शमा पवार यांना महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्यांचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अभिनंदन केले आहे.


## चौकशीची जाहिर नोटीस

चौ. अ. क्र. : मु.सा.वि.व्य.अ. १९५० चे कलम ५० (अ) (१) अन्वये १७७७/२०२४
संस्थेचे नांव : रघुनाथदास हनुमंतराम अट्टल माहेश्वरी भुवन, २३९, प. मंगळवार पेठ, सोलापूर
न्यास नोंदणी क्रमांक: ए ६७ / सोलापूर

**अर्जदार - १. धनशाम रामनिवास करवा**
**२. गोविंदलाल शंकरलाल खडलोया**

सदरील अर्ज अजदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० (अ) (१) प्रमाणे संस्थेस स्किम करुन मिळणेबाबत अर्ज सादर केलेला असुन त्यामध्ये न्यासाचे व्यवस्थापन सुरळीत चालण्याकरिता न्यासास स्किम तयार करण्यात आलेली आहे. या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, या न्यासाचे आपले कांही संबंध असल्यास अथवा कांही हरकत / तक्रार नोंद करावयाची असल्यास आपण स्वतः किंवा वकीलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरुपात दाखल करावी. ३० दिवसाचे नंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही आणि एकतर्फी हुकूम करुन सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

ही नोटीस माझे सहिनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे सहीनिशी आज दिनांक ०९.०४.२०२५ रोजी दिली.

**सही/-**
**(वि.सि.कांबळे)**
**अधिक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर**



## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (यापूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड हे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | 111445816 | मालमत्तेवर कर्ज | १. प्रशांत विजयकुमार देशमुख<br>२. विजयकुमार दत्तात्रय देशमुख | 05/04/2025 | रुपये 9,88,873.73/- |

**मालमत्तेचा पत्ता:** दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = १०८९ चौरस फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ १०९८ चौरस फूट, ग्रामपंचायत करकंबच्या रजिस्टरमध्ये मालमट्टा क्रमांक ३४०४ मध्ये नोंदणीकृत, गावः करकंब, तालुकाः पंढरपूर, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०२ येथे स्थित, आणि पूर्वः शेटे, पश्चिमः देशमुख, उत्तरः खाडे, दक्षिणः शिंगटे अशी सीमा आहे.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : २३/०४/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**



## Classifieds

### पाहिजेत

**पार्ट टाईम काम करु इच्छिणाऱ्या शंभर महिला, मुले, मुली पाहिजेत. अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटून काम सुरू करणाऱ्यांना नावनोंदणी व हजाराची वस्तू मोफत. मात्र अटी लागू. संपर्क: 9765641261**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

### जाहीर आवाहन

सोलापूर शहरातील तमाम पशुधन मालक व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, आपल्या मालकीचे पशुधन शहरातील रस्त्यावर मोकळ्या जागेवर सोडण्यात येऊ नये. सदर पशुधन रस्त्यावर सोडल्यामुळे शहरातील नागरिकांना व रस्त्यावरील वाहतुकीस अडचण निर्माण होत आहे. तसेच अनेक वेळा शहरात अपघात घडल्याचे प्रकारही निदर्शनास आले आहे. अशा दुर्घटना टाळण्यासाठी व आपत्तीचे पूर्वनियोजनासाठी शहरातील मोकाट पशुधनांसाठी प्रतिबंध घालणे अत्यंत आवश्यक आहे. पशुधन मालकांनी स्वतःच्या जागेत, गोठ्यामध्ये बंदिस्त करावे व मोकळे सोडू नये. त्याप्रमाणे मोकळी सोडलेली पशुधन कचरा कुंडीमध्ये टाकलेले अन्न खातात व त्यामधून अनेक वेळा प्लॅस्टिक व इतर वस्तू खाल्याने मोकाट पशुधन मरण पावतात. सदरच्या स्थितीमध्ये त्वरीत बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

सबब या प्रसिध्दीकरणापासून ७ दिवसांच्या नंतर सोलापूर शहरात मोकाट पशुधन आढळून आल्यास प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून सदर पशुधन सोलापूर मनपाच्या, कोंडवाडा विभागाच्यावतीने पकडून गोशाळे मध्ये दि.०१ मे २०२५ पासून कायमस्वरुपी जमा करण्यात येतील.

शहर स्वच्छता व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व पशुधन पाळणाऱ्या नागरीकांना या बाबत गंभीर दखल घेऊन कायदेशीर वर्तणुक ठेवावी व प्रशासनास सहकार्य करावे, ही विनंती

**मा.आयुक्त यांच्या मान्यतेने**

**सही/-**
**उपायुक्त**
**सोलापूर महानगरपलिका, सोलापूर**



## जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः बार्शी शहर व तालुका तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) डि.सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी म्यु.पल हद्दीतील ग.नं. १०८८/१/१/१अ/२ यापैकी प्लॉट नं. १५३ याचे क्षेत्र १६३.४४ चौ.मी. यासी चतुःसिमा **पुर्वेस**- म्हाडाची हद्द, **दक्षिणेस** रोड, **पश्चिमेस** प्लॉट नं.५४ व **उत्तरेस** प्लॉट नं.१५२ येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे वापराचे हक्कासह जागा.

वर नमूद मिळकत ही रामा शिवदास देवकते यांचे मालकीची असून त्यांनी त्यांचे बांधकाम करण्याकरीता आमचे अशिल सांगली अर्बन को. ऑप बँक लि. शाखा बार्शी यांचेकडे कर्ज मागणी केली असून त्यांना रुपये २२,०००,०००/- चे कर्ज आमचे अशिल बँकेने मंजूर केलेले आहे. सदर कर्जाकरीता रामा शिवदास देवकते यांनी त्यांची वर नमूद मिळकतीतील भाडेकरु हक्क आमचे अशिल बँकेचे हक्कात गहाण तारण देण्याचे मान्य केले असून तसा दस्त नोंदवून देणेचेही त्यांनी कबुल केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेचा भरवसा त्यांनी आमचे अशिल बँकेस दिलेला असून सदर मिळकत अन्य कोणत्याही बँकेकडे अगर वित्तीय संस्थेकडे गहाण तारण दिलेली नाही, कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ठ नाहीत अशीही ग्वाही त्यांनी दिलेली आहे.

तरी या जाहीर नोटीसीने सर्वत्रास कळविण्यात येते की, वर नमूद मिळकती संबंधाने जर कोणाचे कांही गहाण, दान, लिज, बोजा व हस्तांतर अगर कर्जबोजाचे हक्क अधिकार असल्यास संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसात आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येवून आमची खातरजमा करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाची फसगत होवू नये व आमचे अशिलाचे हक्काची सर्वत्रास जाणीव व्हावी म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली. ता. २२/०४/२०२५.

**सही/-**
**श्री. प्रसाद जे. कुलकर्णी, ॲडव्होकेट**
लक्ष्मीनृसिंह, कासारवाडीरोड,
सिध्देश्वरनगर, बार्शी ता. बार्शी
(अशिलातर्फे पॅनल ॲडव्होकेट)



## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, उत्तर सोलापूर, कसबे सोलापूर, शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील तेलंगी पाच्छा पेठेतील सि.स.नं. १०३८०/७४ब पैकी प्लॉट नं.२१८ पै. क्षेत्रफळ ९१.१ चौ.मी. यातील जुने विट, मातीचे कच्चे बांधकाम त्यावर पन्हाळी लोखंडी पत्रे असून, त्यात तीन खोल्या व संडास बाथरुम, एकूण बांधकाम क्षेत्र ४१.८२ चौ.मी. त्यातील पश्चिम बाजुची भिंत समाईक मालकीची असून, बाकीच्या निती स्वतंत्र मालकीच्या आहेत. सदर घर जागेत अर्धा इंची पिण्याच्या पाण्याचे नळ कनेकशन आहे. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विद्युत पुरवठा दिनांक १३/०५/१९७४ रोजी घेतलेला असून, त्यांचा ग्राहक क्र.३३०२४०३१२५४९ आहे. सदर मिळकतीचा म्यु.पल नं.७४/अ आहे, यांसी चतुः सिमा खालीलप्रमाणे पूर्वस सि.स.नं.१०३८०/७५, दक्षिणेस रस्ता, पश्चिमेस सि.स.नं.१०३८०/७४अ, उत्तरेस बोळ रस्ता येणेप्रमाणे चतुःसिमेतील ही **मुस्ताक अहमद नुरमहंमद काडगांवकर** यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे. सदर **मुस्ताक अहमद नुरमहंमद काडगांवकर** यांनी आमची अशिल कंपनी श्रीराम सिटी युनियन फायनान्स लि. यांचेकडे कर्ज मागणी केलेली असुन त्या कर्जापोटी वरील मिळकत तारण देण्याचे मान्य केलेले आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचेही कसल्याही स्वरूपाचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा सदर गहाणखतास हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाचे आत आमचेंशी संपर्क साधुन लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे कोणाची हरकत न आल्यास सदर मिळकतीवर **मुस्ताक अहमद नुरमहंमद काडगांवकर** यांचे व्यतिरीक्त अन्य कोणाचीही हक्क, अधिकार नाही, असे गृहीत धरून सदर मिळकतीचे W गहाणखत आमचे अशिल कंपनीचे हक्कात करून घेण्यास येईल व त्यानंतर कोणाचीही कसल्याही स्वरूपाची तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. सबब ही जाहीर नोटीस दिली. दि. २२/०४/२०२५

**जाहीर नोटीस देणार**
**ॲड. योगेश घनशामराव अबूज**
**आनंद नगर, आनंद बाजार जवळ,**
**धाराशिव ता. जि. धाराशिव. ४१३५०१**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**




## महत्त्वाचे

### पंकज अडवाणीला अव्वल मानांकन

**मुंबई** : २८ एप्रिलपासून येथे सुरू होणाऱ्या सीसीआय बिलियर्ड्स क्लासिकमध्ये अनेक जागतिक विजेता पंकज अडवाणी आणि आशियाई विजेतेपद पटकावणारा ध्रुव सितवाला हे अव्वल क्यूइस्ट (स्नूकर आणि बिलियर्ड्स) मध्ये सहभागी होतील. या स्पर्धेची सुरुवात



२५ आणि २६ एप्रिल रोजी पात्रता फेरीने होईल जिथे ४८ स्पर्धक मुख्य ड्रॉमध्ये १२ स्थानांसाठी स्पर्धा करतील. मुख्य सोडतीमध्ये १२ पात्रता फेरीतील २० खेळाडूंसह लीग स्वरूपात खेळतील. १० लाख रुपयांच्या बक्षीस रकमेची ही स्पर्धा थ्री-बॉल क्लासिक स्वरूपात खेळवली जाईल. इंग्लंडचा माजी युरोपियन ओपन चॅम्पियन मार्टिन गुडविल हा या स्पर्धेत मानांकित झालेला एकमेव परदेशी खेळाडू आहे. गतविजेता अडवाणी अव्वल मानांकित आहे तर सितवाला दुसरा मानांकित आहे. ब्रिजेश दमानी, रैयानी रझमी, दिवाज हरिया, केतन चावला आणि रोहन जंबुसारिया हे इतर मातब्बर खेळाडू आहेत.

### बुमराह-मंधाना 'विस्डेन क्रिकेटर ऑफ द इयर'

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला विस्डेन क्रिकेटर ऑफ द इयर हा किताब देण्यात आला आहे. महिला खेळाडूंमध्ये स्मृती मंधानाला जगातील सर्वोत्तम क्रिकेटपटूचा मान मिळाला आहे. दोन्ही भारतीय खेळाडूंना २०२४ मध्ये त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी हा सन्मान मिळाला आहे. ३१ वर्षीय बुमराहने २०२४ मध्ये कसोटीमध्ये ७१ गडी बाद केले. या काळात त्याची सरासरी १४.९२ होती. बुमराह हा कसोटी क्रिकेटच्या इतिहासात २० पेक्षा कमी सरासरीने २०० बळी घेणारा पहिला गोलंदाज आहे. ऑस्ट्रेलियात खेळल्या गेलेल्या बॉर्डर-गावस्कर चषकामध्ये, बुमराहने जवळजवळ एकट्याने भारतीय गोलंदाजीचे नेतृत्व केले आणि १३.०६ च्या सरासरीने ३२ गडी बाद केले. त्याच वेळी, बुमराहला टी-२० विश्वचषकात स्पर्धावीर म्हणून घोषित करण्यात आले.महिला संघाची वरिष्ठ फलंदाज स्मृती मंधानाने २०२४ मध्ये सर्व फॉर्मॅटमध्ये १६५९ धावा केल्या. एका कॅलेंडर वर्षात महिला क्रिकेटपटूने केलेल्या या सर्वाधिक धावा आहेत. या काळात तिने चार एकदिवसीय शतकेही झळकावली. स्मृती मंधाना ही दुसऱ्यांदा हा किताब जिंकणारी पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू आहे. तिला २०१८ मध्येही हा सन्मान मिळाला आहे. याशिवाय, वेस्ट इंडीजच्या निकोलस पूरनला जगातील सर्वोत्तम टी-२० खेळाडूचा किताब मिळाला आहे.

### इंग्लंड दौऱ्यासाठी मधल्या फळीत सहा दावेदार

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय निवड समिती मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात इंग्लंडच्या कसोटी दौऱ्यासाठी भारत आणि भारत अ संघांची घोषणा करण्याची शक्यता आहे आणि त्यांना मधल्या फळीतील दोन स्थानांसाठी किमान सहा दावेदारांचा विचार करावा लागेल. बीसीसीआयने ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी १७ सदस्यीय संघ पाठवला होता परंतु इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांसाठी अंतिम संघात १५ किंवा १६ खेळाडूंचा समावेश असू शकतो. या दौऱ्यादरम्यान, भारताचा अ संघ देखील इंग्लंडमध्ये असेल आणि अशा परिस्थितीत, मुख्य संघाच्या गरजेनुसार अ संघातील खेळाडूंना बोलावता येईल. अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय निवड समितीला काही खेळाडूंचा, विशेषतः राखीव फलंदाजांचा खूप विचार करावा लागेल. देशांतर्गत हंगामात चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंव्यतिरिक्त, राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करणारे परंतु अद्याप त्यांच्या क्षमतेनुसार स्वतःला सिद्ध न केलेले खेळाडू देखील यामध्ये असतील. जर सर्व खेळाडू तंदुरुस्त राहिले तर सुरुवातीच्या सामन्यांच्या अंतिम अकरा संघात कर्णधार रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल, लोकेश राहुल, शुभमन गिल आणि विराट कोहली यांचे स्थान निश्चित होईल.

### तायक्कांदो व विविध खेळाचे मोफत प्रशिक्षण

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तायक्कांदो व विविध खेळाचे मोफत प्रशिक्षण २६ एप्रिल ते २० मे पर्यंत आयोजित केले आहे. या शिबिरास प्रतीक्षा खंडाळकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. जिल्हा तायक्कांदो स्पोर्ट्स् कौन्सिलच्या वतीने हे शिबिर आयोजित केल्याचे अध्यक्ष मोहन भूमकर व सचिव मंजूर शेख यांनी कळविले आहे. नोंदणीसाठी ८७६६८६१४६३ अथवा ९९२२८९३७४१ यांच्याशी संपर्क साधावा.

# मुंबई विजयाची परंपरा कायम राखणार?

### खराब कामगिरी सुधारणार हैदराबाद

◆ **हैदराबाद, २२ एप्रिल**

खराब फॉर्ममध्ये असलेला सनरायझर्स हैदराबाद संघ विजयी मार्गावर परतण्याचा प्रयत्न करेल, तर गमावलेला फॉर्म परत मिळवण्याचा प्रयत्न मुंबई इंडियन्स संघ करणार आहे. आयपीएल हंगामात बुधवारी मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात येथे सामना होणार आहे. मुंबई संघ आपली विजयी पताका कायम राखण्याचा प्रयत्न करेल.

सात सामन्यांपैकी दोन विजयांनंतर सनरायझर्सची स्थिती चांगली नाही. त्यांच्या स्टार फलंदाजांनी या संघाला चांगलेच निराश केले आहे. सोबतच गोलंदाजांनाही प्रभावी कामगिरी करता आलेली नाही.



सनरायझर्सना संथ आणि वळणाऱ्या खेळपट्ट्यांवर अडचणींचा सामना करावा लागला आहे. पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील संघाने घरच्या मैदानावर दोन सामने गमावले आहेत. वानखेडे स्टेडियमच्या अवघड खेळपट्टीवर मुंबईने त्यांना चार गड्यांनी पराभूत केले आणि त्याच सामन्यात आव्हानात्मक परिस्थितीला तोंड देताना त्यांच्या कमकुवतपणा समोर आला.

सपाट खेळपट्टीवर सनरायझर्सच्या फलंदाजांनी चांगली कामगिरी केली आहे. मुंबई इंडियन्सविरुद्ध अनुकूल खेळपट्टीवर खेळून त्यांचा गमावलेला फॉर्म परत मिळवण्याची सुवर्णसंधी त्यांच्याकडे आहे.

सनरायझर्सच्या फलंदाजीची जबाबदारी त्यांच्या सलामी जोडी अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेडवर असेल. पॉवर प्लेमधील त्याचे यश संघासाठी खूप महत्त्वाचे आहे. अभिषेकने पंजाब किंग्जविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात ५५ चेंडूत १४१ धावा केल्या. जी या आयपीएलमधील कोणत्याही फलंदाजाची सर्वोच्च धावसंख्या आहे.

ट्रॅव्हिस हेडच्या कामगिरीत सातत्य नसणे ही चिंतेची बाब आहे. या सामन्यातील पराभवामुळे संघाची स्थिती आणखी बिकट होईल. त्यामुळे सनरायझर्सना त्यांच्या ऑस्ट्रेलियन खेळाडूकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल.

मुंबई इंडियन्ससाठी मैदानाबाहेर स्वतःची चाचणी घेण्याची आणि त्यांची लय कायम ठेवण्याची ही सुवर्णसंधी आहे. रविवारी त्यांना त्यांच्या घरच्या मैदानावर लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध पुन्हा खेळायचे आहे. सलग तीन विजयांसह मुंबई आयपीएलच्या निराशाजनक सुरुवातीपासून सावरत आहे. पाच वेळा विजेत्या झालेल्या संघाने फलंदाजांना अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर चेन्नई सुपर किंग्जचा नऊ गड्यांनी पराभव केला.

रोहित शर्माने नाबाद ७६ धावा करत फॉर्ममध्ये परतला, तर सूर्यकुमार यादवने नाबाद ६८ धावा केल्या. तिलक वर्माला फलंदाजीची संधी मिळाली नाही पण तो उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे तर नमन धीरनेही शानदार खेळी केली.

जसप्रीत बुमराह त्याच्या परिचित फॉर्ममध्ये दिसत नव्हता. त्याने कदाचित इतके गडी बाद केले नसतील पण त्याने लय बरोबर साधली आहे जी सनरायझर्सच्या फलंदाजांसाठी एक इशारा असू शकते. ◀(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**मुंबई इंडियन्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, हैदराबाद
**वेळ** : संध्याकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

## कोलकाताच्या फलंदाजांना आत्मविश्वासाची गरज

### मार्गदर्शक ड्वेन ब्राव्होचे परखड मत

◆ **कोलकाता, २२ एप्रिल**

यावर्षीच्या आयपीएल हंगामात आठपैकी पाच पराभवानंतर कोलकाता नाईट रायडर्स संघाने आत्मविश्वास गमावला आहे. फलंदाजांमध्ये आत्मविश्वासाची गरज आहे. यात खेळपट्टीचा दोष नाही, असे परखड मत कोलकाताचे मार्गदर्शक ड्वेन ब्राव्हो याने व्यक्त केले.

सोमवारी येथे गुजरात टायटन्सकडून केकेआरला ३९ धावांनी पराभव पत्करावा लागला. सामन्यानंतर माध्यमांशी बोलताना ब्राव्होने ड्रेसिंग रूमच्या वातावरणाबद्दल सांगितले. तो म्हणाला, आयपीएल ही एक कठीण स्पर्धा आहे आणि जेव्हा तुम्ही चांगली सुरुवात करत नाही तेव्हा तुम्हाला माहिती असते की फलंदाज अशा टप्प्यातून जातात जिथे त्यांचा आत्मविश्वास डळमळीत होतो.

सध्या हेच घडत आहे. आपण त्यांना पाठिंबा देत राहिले पाहिजे आणि आशा आहे की ते चांगली कामगिरी करतील. आमच्या फलंदाजांमध्ये सध्या आत्मविश्वासाचा अभाव आहे. त्यामुळे ते धावा काढू शकत नाहीत. चांगली कामगिरी केली तरच आत्मविश्वास बळावतो. पण सध्या आमच्याकडे त्याचीच कमतरता आहे.

या हंगामात ईडन गार्डन्सची खेळपट्टी चर्चेत राहिली आहे कारण ती यजमान संघ केकेआरला मदत करत नाहीये, परंतु ब्राव्होने खेळपट्टीला दोष देण्याचे टाळले. खेळपट्टीचा दोष नाही. मला वाटते की दोन्ही संघ एकाच खेळपट्टीवर खेळतात. आम्ही चांगले क्रिकेट खेळलो नाही. ते आमच्यापेक्षा चांगले खेळले, एवढेच मी म्हणेन. ◀(वृत्तसंस्था)

## मास्टर व मॉडेल क्रिकेट अकादमीचे शानदार विजय

### एनजीसीए करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आयोजित एनजीसीए करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मास्टर अकादमी व मॉडेल क्रिकेट अकादमीने शानदार विजय मिळविले.

डोणगाव रोडवरील पुष्प अकादमीच्या मैदानावर मंगळवारी झालेल्या सामन्यात मास्टर क्रिकेट अकादमीने युनायटेड क्रिकेट क्लबवर १३५ धावांनी हरविले. शानदार अर्धशतक झळकाविणारा ऋषिकेश गज्जम सामन्याचा मानकरी व सर्वोत्कृष्ठ फलंदाजाचा मानकरी ठरला. ४ बळी टिपणाऱ्या सिद्धार्थ गोपाळेने उत्कृष्ट गोलंदाजाचे पारितोषिके मिळविले. दुसऱ्या सामन्यात मॉडेल अकादमीने नीलेश गायकवाड अकादमीने ७ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. ५ बळी व २१ धावा फटकाविणाऱ्या संस्कार माळीने सामनावीर व गोलंदाजाचे पारितोषिके तर हर्ष माळीने (४६ धावा) उत्कृष्ट फलंदाजाचे पारितोषिके मिळविले. नीलेश गायकवाड यांच्या हस्ते ही पारितोषिके देण्यात आली.

संक्षिप्त धावफलक : **मास्टर क्रिकेट अकादमी** : ३० षटकांत ५ बाद १९९ (ऋषिकेश गज्जम ५१, सचिन अजबे ४०, अभिषेक देशमुख ४३, समर्थ बोबडे, श्रीराज गवळी व पुष्कर पवार प्रत्येकी १ बळी) वि.वि. **युनायटेड क्रिकेट क्लब** : १८.५ षटकांत सर्व बाद ६४ (श्रीराज गवळी १४, सोहम गायकवाड १६, सिद्धार्थ गोपाळे ४-२२).

**निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी** : २८.२ षटकात सर्व बाद १२९ (आनंद शेंडे ४०, जयवर्धन भोसले १५, आयुष्या भोसले २-१४, संस्कार गवळी ५-७) पराभूत विरुद्ध **मॉडेल क्रिकेट ॲकॅडमी** : २६.१ षटकात तीन बाद १३० ( हर्ष माळी ४६, संस्कार गवळी २१. अनुज वाल्मिकी २-१५, आनंद शेंडे १-२२)



## विराज स्पोर्टस् अकादमीच्या वतीने वरकड व अक्षय कंदी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

नेहरूनगर शासकीय मैदानावर विराट स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने दोन सुपुत्र जे खेळामुळे उच्चपदस्थ अधिकारी झाले, असे आंतरराष्ट्रीय पॅराऑलिम्पिक खेळाडू दत्ता वरकड व नूतन पोलीस उप निरीक्षक अक्षय कंदी यांचा सत्कार करण्यात आला

वरकड हे जिल्हा क्रीडा कार्यालय येथे जिल्हा मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी या पदी तर कंदी हे पोलीस उपनिरीक्षक पदी रुजू झाले आहेत. हे दोन्ही खेळाडू विराट स्पोर्ट्स अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक सूर्याजी लिंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झाले आहेत. अकॅडमीच्या वतीने कबड्डी राज्य पंच सुभाष माने, शहर भाजप क्रीडा प्रकोष्ट यशवंत पाथरूट, सामाजिक कार्यकर्ते विशाल गायकवाड, जॉगर्स फाउंडेशनचे माजी अध्यक्ष संतोष कदम यांच्या उपस्थितीत पुष्पहार, शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी विराट स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रशिक्षक सुर्याजी लिंगडे, संचालिका व एन.आय. एस. कोच भारती लिंगडे, पोलीस हवालदार महेश थोरात चांगुणाबाई लिंगडे आदी उपस्थित होते.

# मार्शल आर्ट्सबरोबरच रग्बी, फुटबॉल टेनिसचा विकास करणार

## कराटे प्रशिक्षक व संघटक भीमराव बाळगे यांचा ध्यास

**सोलापूर शहर व जिल्ह्यात मार्शल आर्ट्स मधील विविध खेळाचा प्रचार व प्रसार करणारे प्रशिक्षक व क्रीडा संघटक भीमराव शिवप्पा बाळगे यांचा आज वाढदिवस आहे. यानिमित्त त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा घेतलेला आढावा...**

**- अजितकुमार संगवे । मो. ९८८११३३१०३**

मार्शल आर्ट्स या खेळामधील राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते खेळाडू भीमराव शिवप्पा बाळगे यांनी प्रशिक्षक व क्रीडा संघटकाच्या माध्यमातून मार्शल आर्ट्स मधील विविध खेळाबरोबरच रग्बी व फुटबॉल टेनिस या खेळाच्या विकासाचा ध्यास घेतला आहे.


भीमराव बाळगे


नार्थकोट प्रशालेत कबड्डी व खो-खो या खेळाचा श्री गणेशा करणारे भीम राव हे वयाच्या १२व्या वर्षापासूनच कराटे या खेळाकडे आकर्षित झाले. ह. दे. प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय येथे शिकत असताना कराटे या खेळात त्यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. कराटेच्या तीन राष्ट्रीय स्पर्धेतून एक सुवर्ण व दोन रौप्यची कमाई केली.

**मार्शल आर्टसच्या १० राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन**

क्रीडा संघटकांच्या भूमिकेतून त्यांनी सोलापूर येथे आजतागायत विविध मार्शल आर्टस् खेळांच्या १० राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन केले आहे. १६ वेळा राज्य किकबॉक्सिग अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन केले. शालेय स्पर्धेमध्ये हा खेळ समावेश करण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला आहे. दोन राष्ट्रीय व एक इन्डोअर एशियन निवड चाचणी अजिंक्यपद स्पर्धेचेही नेटके आयोजन त्यांनी केले आहे. ९ राज्य व ४ राष्ट्रीय सिकई अजिंक्यपद स्पर्धेचे तसेच १५ जिल्हा व राज्य कराटे अजिंक्यपद स्पर्धेचे तसेच ७ राज्य व २ राष्ट्रीय फुटबॉल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. राजनंदिनी डेव्हलपर्सच्या माध्यमातून ते रिअल इस्टेटचा व्यवसाय करतात. ते सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाचे सरचिटणीस आहेत. हे सर्व समाजकार्य करीत असताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती महादेव चाकोते, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील, उद्योजक मनीष सुरवसे, मुकुंद जाधव, राज्य सिकाई सदस्य शिवकुमार पाटील, स्वामी समर्थ देवस्थान अध्यक्ष महेश इंगळे, सोलापूर विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक डॉ. सुरेश पवार, राज्य किक बॉक्सिंगचे अध्यक्ष सी. ए. तांबोळी, राज्य सिकई अध्यक्ष मझहर खान, राष्ट्रीय फुटबॉल टेनिस अध्यक्ष राम अवतार यांचे मार्गदर्शन मिळाले असल्याचे बाळगे सांगतात. हे सर्व समाजकार्य सांभाळून त्यांनी क्रीडा क्षेत्राचा ध्यास घेतला आहे. त्यांच्या या क्रीडा कार्यास शुभेच्छा...

### विविध क्रीडा संघटनेची बाळगे यांच्याकडे असलेली पदे

- महासचिव, अखिल भारतीय फुटबॉल टेनिस.
- सचिव, सोलापूर जिल्हा रग्बी.
- सदस्य, नॅशनल कराटे फेडरेशन.
- सरचिटणीस, महाराष्ट्र फुटबॉल टेनिस.
- अध्यक्ष, सोलापूर जिल्हा टेनिक्काईट.
- सचिव, सोलापूर शहर व जिल्हा किक बॉक्सिंग.
- सचिव, सोलापूर जिल्हा सिकई.
- सचिव, सोलापूर जिल्हा ॲम्युचर स्पोर्टस् कराटे.
- सचिव, सोलापूर जिल्हा युनिफाईट.
- अध्यक्ष, सोलापूर जिल्हा टेंग-सु-डो.
- सचिव, सोलापूर जिल्हा थाय बॉक्सिंग.
- अध्यक्ष, सोलापूर जिल्हा मु-थाई.
- सचिव, सोलापूर जिल्हा बॉक्सिंग




### पोटावरून जीप क्रॉस करण्याचा दोनदा विक्रम

वयाच्या १८व्या वर्षी १९९२ मध्ये त्यांनी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पोटावरून जीप क्रॉस करण्याचा विक्रम केला. या विक्रमाचे जिल्हा अधिकारी दिनेशकुमार जैन व जिल्हा क्रीडा अधिकारी जनक टेकाळे यांनी कौतुक केले होते. त्यानी असा उपक्रम परत कराल का? अशी विचारणा केल्यानंतर त्यांनी परत दुसऱ्यांदा म्हणजे १९९४ मध्ये हा विक्रम केला. पहिले पोलीस आयुक्त श्रीवास्तव यांच्या स्वागतासाठी हा विक्रम त्यांनी केला.



### ४० हजार मुलींना स्व-संरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण

जिल्हा परिषद महिला बालकल्याण विभागामार्फत ग्रामीण भागातील शालेय मुलींना मोफत कराटे प्रशिक्षण योजनेअंतर्गत आजतागायत १५ वर्षांमध्ये ४० हजार मुलींना स्व-संरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण दिले आहे. आजतागायत सोलापूर शहर व जिल्ह्यातून विविध मार्शल आर्टस् खेळाच्या माध्यमातून अनेक मुले व मुलींना शालेय व असोसिएशनच्या वतीने जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतर्राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून प्राविण्य मिळविले आहे. या खेळातील विद्यार्थ्यांना शासकीय सेवेमध्ये पाच टक्के कोट्यातून नोकरी मिळण्यासाठी आणि दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना ग्रेस गुण मिळण्यासाठी उपयोग झाला आहे.

### मलेशियाचे बुडोकॉन मार्शल आर्ट्सची ब्लॅक बेल्ट पदवी

कराटे या खेळात त्यानी मलेशियाचे बुडोकॉन मार्शल आर्ट्स संस्थेकडून ग्रँडमास्टर चू-चू सूट यांच्या मार्गदर्शनाखाली ब्लॅक बेल्ट ही पदवी धारण केली. आंध्रप्रदेशचे सी. हनुमंतराव व राजस्थानचे रामेश्वर निर्वाण यांच्या मार्गदर्शनाखाली मार्शल आर्ट्समधील विविध खेळाचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण त्यांनी घेतले. त्यानंतर ते प्रशिक्षकाकडे वळाले. १९९२ मध्ये त्यांनी बोजू रियू मार्शल आर्ट्स या कराटे संघटनेची तसेच सोलापूर जिल्हा ॲम्युचर स्पोर्ट्स कराटे असोसिएशनची स्थापना केली. पार्क स्टेडियम जिमखाना हॉलवरील टेरेसवर त्यांचे मुख्य प्रशिक्षण केंद्र सुरु असून अश्विनी हॉस्पिटलजवळील राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर दुसरे प्रशिक्षण केंद्र त्यांचे सहकारी इक्बाल शेख हे चालवतात. गेल्या ३५ वर्षाच्या कालखंडात त्यांच्या मुख्य प्रशिक्षण केंद्राबरोबरच सिद्धेश्वर देवस्थानच्या सर्व शाळा, अण्णाप्पा काडादी प्रशाला, इंडियन मॉडेल स्कूल, एम. ए. पानगल या शाळांमध्ये तसेच जिल्ह्यातील इतर तालुक्यातील शाळांमध्ये जाऊन त्यांनी शालेय मार्शल आर्ट्स या खेळातील कराटे, किक बॉक्सिंग, सिकाई, थाय बॉक्सिंग या खेळातील सुमारे १५ हजार खेळाडू घडविले आहेत. त्यात पाचशे राष्ट्रीय खेळाडूंचा समावेश आहे. प्रशिक्षिकाबरोबरच त्यांनी असोसिएशनच्या राष्ट्रीय स्पर्धा व शालेय राष्ट्रीय स्पर्धेत पंच म्हणून भूमिका बजावली आहे. १९९७ मध्ये पुणे येथे झालेल्या साउथ एशियन कराटे स्पर्धेतही त्यांनी पंचाची कामगिरी केली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### पेटलेला कापूर विझवताना विवाहितेचे हात भाजले; अंकोली येथील घटना

**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

मोहोळ तालुक्यातील अंकोली येथील यात्रेत पूजा करताना पेटलेला कापूर खाली पडून कपड्याला लागलेली आग विझवताना दोन्ही हात भाजून विवाहिता जखमी झाली. हा प्रकार २१ एप्रिल रोजी रात्री ११.४५ वाजता घडला. प्रतिक्षा सचिन सलवदे (वय २१, रा. अंकोली ता मोहोळ) असे भाजून जखमी झालेल्या तरुणीचे नाव आहे. २१ एप्रिल रोजी मोहोळ तालुक्यातील अंकोली येथे यात्रा होती. यावेळी पूजा करताना पेटलेला कापूर खाली पडल्याने अंगावरील कपड्याला आग लागली. ती आग नियंत्रणात आणताना दोन्ही हात तसेच पायाला भाजल्याने प्रतिक्षा जखमी झाली. रात्री १२.१० वाजता नितीन सलवदे यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### वळणा-या ट्रकला धडक बसल्याने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

सोलापूर ते मोहोळ जाताना सावळेश्वर टोल नाका येथे वळणा-या ट्रकला दुचाकीची धडक बसल्याने दुचाकीवरील एकजण जखमी झाला. हा अपघात २१ एप्रिल रोजी रात्री १०.३० वाजता घडला. ज्ञानेश्वर धोडिंबा पडवळकर (वय ४५, रा. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. सोमवार २१ रोजी यातील जखमी ज्ञानेश्वर हे दुचाकीवर बसून सोलापूर ते मोहोळ असे जात होते. सावळेश्वर टोळ नाका येथे समोरून वळणा-या ट्रकला धडक बसली. यात डोक्याला जखम झाली असून हात व पायाला मुकामार तसेच खरचटल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून पत्नी छाया यांनी मध्यरात्री १.२५ वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### इलेक्ट्रिक लाईन दुरूस्तीचे काम करणाऱ्यांना मारहाण

**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

कुमठे येथे इलेक्ट्रिक लाईन दुरुस्तीचे काम करणाऱ्यांना लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी करणाऱ्या दोघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गजानन माधवराव मचाले (वय ३०, रा. जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुजीत भोपळे, केदार नंदुरे (रा. कुमठे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० एप्रिल रोजी सायंकाळी कुमठे येथे गजानन मचाले हे इलेक्ट्रिक लाईन दुरुस्तीचे काम करीत होते. त्यावेळी मचाले यांच्या साईटशेजारी सुजित भोपळे व केदार नंदुरे या दोघांनी येऊन चला काम बंद करा, इथे काम करायचे नाही, काम केल्यास तुम्हांला सोडणार नाही असे म्हणून शिवीगाळ करून धमकी दिली. त्यानंतर मचाले हे काम बंद करून जात असताना सुजित भोपळे याने मचाले यांच्या हातावर लोखंडी रॉडने मारहाण करून त्यास जखमी केले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मणुरे पुढील तपास करीत आहेत.

### पैशाच्या व्यवहारातून तरुणाने प्राशन केले पेट्रोल

**सोलापूर, दि.२२ एप्रिल -**



पैशाच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या तणावातून तरुणाने पेट्रोल प्राशन केल्याची घटना न्यू पाच्छा पेठेत २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता घडली. किसन अशोक पासकंटी (वय २९) असे तरुणाचे नाव आहे. एम आयडीसीतील कलाल नगरात किसन सध्या राहण्यास आहे. तेथे त्याने पैशाच्या कारणातून पेट्रोल प्राशन केले. यात त्याला त्रास होऊ लागल्याने भाऊ गोवर्धन याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पाणी समजून थिनर पिल्याने बालक अत्यवस्थ

**सोलापूर, दि.२२ एप्रिल -**

घरात रंग देण्याचे काम सुरु असताना, पाणी समजून थिनर पिल्याने चार वर्षाचा बालक अत्यवस्थ झाला. त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हा प्रकार सोमवारी सायंकाळी ७.३० वाजता घडला. फैजान मौला बागवान (वय ४, रा. आदर्श नगर, शेळगी) असे बालकाचे नाव आहे. फैजान राहत असलेल्या घराचे रंगकाम सुरु आहे. यामुळे घराच्या अंगणात रंगाचे डबे ठेवण्यात आले होते. सोमवारी सायंकाळी खेळत असताना फैजान याने पाणी समजून थिनर पिले. त्यात त्याला त्रास होऊ लागल्याने वडील मौला याने शासकीय रुग्णालयात रात्री ८.२० वाजता दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## निधन वार्ता

### सरोजनाबाई पामुल

**सोलापूर, दि.२२ एप्रिल -**



सरोजनाबाई सिद्राम पामुल यांचे दि. २२ एप्रिल रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले एक मुलगी आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### बळीराम बुधनेर

**सोलापूर, दि.२२ एप्रिल -**



येथील आय.टी.आय.चे निवृत्त शिल्प निदेशक बळीराम भगवान बुधनेर (वय ६८) यांचे अल्प आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, १ भाऊ, असा परिवार आहे. गांधीनाथा हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्रीमती सुनंदा बळीराम बुधनेर यांचे पती होत.

### ताजोद्दीन मुजावर

**सोलापूर, दि.२२ एप्रिल -**



न्यू हायस्कूल सलगरवाडी येथील सेवानिवृत्त शिक्षक ताजोद्दीन अब्बासअली मुजावर (वय ७२) राहणार रामलिंग नगर यांचे दीर्घ आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. अंबिका विद्यामंदिर शिरापूर (ता. मोहोळ) येथील सेवानिवृत्त शिक्षिका मेहरुन्नीसा मुजावर यांचे ते पती होत.

# करमाळ्यात आज धनगरी रूद्रनाद कार्यक्रम बैठक

## आ.पडळकर अहिल्याप्रेमी जनतेशी साधणार संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२२ एप्रिल**



करमाळा येथे बुधवार दि. २३ एप्रिल रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी जयंतीनिमित्त धनगरी रूद्रनाद कार्यक्रमाच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आमदार गोपीचंद पडळकर हे अहिल्याप्रेमी जनतेशी संवाद साधणार आहेत. अहिल्याप्रेमी जनतेने जुने गेस्टहाउस सकाळी उपस्थित राहण्याचे आवाहन सकल धनगर समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची या वर्षी ३०० वी जयंती आहे. सन २०२५ या वर्षात महाराष्ट्रासह देशभर विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत. दि. ३१ मे रोजी पंतप्रधान नरेन्द्र मोदी हे अहिल्या जन्मस्थळ चोंडी या ठिकाणी येत आहेत. अहिल्यादेवी होळकर यांच्या सन्मानार्थ पुढील आठवड्यात चोंडी येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक देखील येथे होत आहे. थोडक्यात शासनाच्या पातळीवर तसेच विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून त्रीशताब्दीचे भव्यदिव्य असे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. असाच एक कार्यक्रम पुण्यश्लोक ३०० निमीत्ताने ५०,००० ढोल वादनाचा विश्वविक्रम नोंदवणारा कार्यक्रम पुण्यात १५ मे रोजी आयोजित करण्यात येत आहे. या कार्यक्रमास केंद्रीय ग्रहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमात धनगर समाजाच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अभिवादन करताना आदीम धनगरी संस्कृतीचे दर्शन जगभरातील जनतेला घडविण्यासाठी पन्नास हजार धनगरी ढोल वादनाचा धनगरी रूद्रनाद हा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होत आहे. या कार्यक्रमातराज्यभरातीलअहिल्याप्रेमीजनतेचा उस्फूर्त सहभाग वाढविण्यासाठी व या कार्यक्रमाची रूपरेखा लोकांना सांगण्यासाठी आमदार गोपीचंद पडळकर हे राज्यभर दौरा करत आहेत. या दौऱ्यादरम्यान आमदार पडळकर करमाळा येथे संवाद साधून सहभाग वाढविण्यासाठी, नियोजनाबद्दल माहीती देण्यासाठी करमाळा येथे बुधवारी सकाळी ११ वाजता करमाळा येथे येत आहेत. तरी करमाळा तालुक्यातील अहिल्याप्रेमी नागरिकांनी जुने गेस्ट हाऊस, कोर्टाशेजारी,करमाळा येथे बहुसंख्येने सकाळी १०.३० वाजता हजर रहावे असे आवाहन करमाळा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सांगोला तालुक्यातील ७६ ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ एप्रिल-**

सांगोला तालुक्यातील ७६ ग्रामपंचायतीचे सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठीचे सरपंच पदाचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम मंगळवार दि.२२ एप्रिल रोजी सांगोला तहसिलदार संतोष कणसे यांचे अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन, सांगोला येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी अनेक गावातील विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




सदर ७६ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण पुढील प्रमाणे - धायटी-अनु.जमाती स्त्री, आगलावेवाडी-अनु.जाती स्त्री, भोपसेवाडी-अनु.जाती, बुरंगेवाडी-अनु. जाती, हणमंतगाव-अनु. जाती स्त्री, खिलारवाडी-अनु.जाती, निजामपूर-अनु. जाती स्त्री, तरंगेवाडी-अनु.जाती, चिकमहुद-अनु. जाती, राजुरी-अनु.जाती, नाझरे/सरगरवाडी-अनु. जाती स्त्री, लक्ष्मीनगर-अनु.जाती स्त्री, मांजरी/देवकतेवाडी-अनु.जाती स्त्री, वाढेगाव-अनु.जाती, सोनलवाडी-अनु.जाती स्त्री, लोटेवाडी-अनु.जाती स्त्री, अजनाळे/लिगाडेवाडी-अनु.जाती, आलेगाव-ना.मा.प्र, बामणी-ना.मा.प्र, देवळे-ना.मा.प्र.स्त्री, ह.मंगेवाडी-ना.मा.प्र, हलदहीवडी-ना.मा.प्र.स्त्री, कडलास-ना.मा.प्र.स्त्री, वासुद/केदारवाडी-ना.मा.प्र, पाचेगाव खुर्द-ना.मा.प्र, राजापूर-ना.मा.प्र, संगेवाडी-ना.मा.प्र.स्त्री, अचकदाणी-ना.मा.प्र, अकोला-ना.मा.प्र, बुध्देहाळ/करांडेवाडी-ना.मा.प्र, गायगव्हाण-ना.मा.प्र.स्त्री, हंगिरगे/गावडेवाडी-ना.मा.प्र. स्त्री, जवळा-ना.मा.प्र.स्त्री, जुजारपुर/गुणाप्पावाडी-ना.मा. प्र.स्त्री, मानेगाव-ना.मा.प्र, इटकी-ना.मा.प्र.स्त्री, बागलवाडी-ना.मा.प्र.स्त्री, शिवणे-ना.मा.प्र. स्त्री, महिम-सर्वसाधारण स्त्री, सोमेवाडी-सर्वसाधारण स्त्री, तिप्पेहाळळी-सर्वसाधारण स्त्री, वाणी चिंचाळे-सर्वसाधारण, चोपडी-सर्वसाधारण, डिकसळ-सर्वसाधारण स्त्री, डोंगरगाव-सर्वसाधारण, गौडवाडी-सर्वसाधारण स्त्री, घेरडी-सर्वसाधारण, हतीद-सर्वसाधारण, जुनोनी/काळुबाळुवाडी-सर्वसाधारण स्त्री, कमलापूर/गोडसेवाडी-सर्वसाधारण स्त्री, कटफळ-सर्वसाधारण स्त्री, किडबिसरी-सर्वसाधारण स्त्री, कोळा-सर्वसाधारण, महुद बु-सर्वसाधारण, मेडशिंगी/बुरलेवाडी-सर्वसाधारण, मेथवडे-सर्वसाधारण स्त्री, नराळे-सर्वसाधारण, पाचेगाव बु-सर्वसाधारण, पारे-सर्वसाधारण स्त्री, शिरभावी-सर्वसाधारण स्त्री, उदनवाडी ग्रुप-सर्वसाधारण, वाकी घेरडी-सर्वसाधारण, वाटंबरे-सर्वसाधारण स्त्री, वझरे-सर्वसाधारण, वाकी शिवणे- सर्वसाधारण स्त्री, य.मंगेवाडी-सर्वसाधारण, सोनंद-सर्वसाधारण, चिंचोली-सर्वसाधारण स्त्री, चिणके- सर्वसाधारण स्त्री, अनकढाळ-सर्वसाधारण, खवासपूर-सर्वसाधारण स्त्री, सावे-सर्वसाधारण स्त्री, गळवेवाडी-सर्वसाधारण, बलवडी-सर्वसाधारण स्त्री, एखतपुर-सर्वसाधारण, लोणविरे-सर्वसाधारण.

# मोहोळमधील ९० ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत प्रक्रिया पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ दि.२२ एप्रिल-**

मोहोळ तालुक्यातील २०२५ ते २०३० या कालावधीमध्ये संपणाऱ्या ग्रामपंचायत आरक्षण सोडत मंगळवारी तहसिल कार्यालयाच्या आवारात काढण्यात आली यामध्ये अनुसुचित जातीसाठी १३, अनुसूची जमाती १, नागरिकांचा मागास प्रवर्ग २४, सर्वसाधारण ५२ असे एकूण ९० ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत करण्यात आली. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार प्राधिकृत अधिकारी तहसीलदार सचिन मुळीक यांनी लहान मुलांच्य हस्ते सोडत चिट्टी काढून जाहीर केले.

आरक्षण प्रक्रिया अनुसूचित जाती जमातीसाठी १९९५ ते २०२० या वर्षाच्या कालावधीमधील आरक्षण विचारात घेऊन, तर नागरिकांचा मागास प्रवर्ग २००५ ते २०२० आरक्षण विचारात घेऊन निश्चित, सर्वसाधारण लगतच्या निवडणुकीतील आरक्षण विचारात घेऊन आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

यावेळी आरक्षण सोडत उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, निवासी नायब तहसीलदार संदेश भोसले, निवडणूक नायब तहसीलदार अनिल शहापुरे, तालुका महसूल नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. अनुसूचित जाती ६ महिला तर ७ पुरुष असे एकूण १३आरक्षण करण्यात आले. सर्वसाधारण २६ पुरुष तर २६ महिला असे एकूण ५२ आरक्षण करण्यात आली.

**अनुसूचित जाती- महिला-** जामगाव (बु), सारोळे, विरवडे खुर्द, मनगोळी, भोयरे, बैरागवाडी

**अनुसूचित जाती, सर्वसाधारण -** लांबोटी, शिरापुर मो, तेलंगवाडी, कुरणवाडी (आष्टी), वडाचीवाडी, मुंढेवाडी, सिद्धेवाडी **अनूसूचित जमाती महिला -** परमेश्वर पिंपरी **नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला -** कोरवली, चिखली, रामहिंगणी, टाकळी सिकंदर, जामगाव खुर्द, मिरी, नरखेड, सय्यद वरवडे, भांबेवाडी, पेनुर, येणकी, कातेवाडी

**नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण -** नजिक पिंपरी, दादपूर, वडदेगांव, अर्जुनसोंड, हिवरे, सौंदणे, येवती, अरबळी, यावली, कामती बू. आष्टी, नांदगाव

**सर्वसाधारण प्रवर्ग महिला-** हिंगणी (नि), लमाणतांडा, देगाव (वा.), कोथाळे, मसले चौधरी, डिकसळ, खंडाळी, मलिकपेठ/दाईगडेवाडी, कोन्हेरी, सोहाळे, बिटले, एकुरके, बोपले, पोफळी, अंकोली, सावळेश्वर, पिरटाकळी, अर्धनारी, कामती खुर्द, शिंगोली/तरटगाव, पाटकुल, पापरी, वाफळे, घाटणे, वडवळ, देवडी.

**सर्वसाधारण -** कुरूल, यल्लमवाडी, घोडेश्वर, कोळेगाव, आढेगांव, गोटेवाडी, आष्टे, खवणी, चिंचोली काटी, मोरवंची, खुनेश्वर, शेजबाभुळगांव, ढोकबाभुळगाव, पोखरापुर, तांबोळे, इंचगाव, वटवटे, वाळूज, विरवडे बू. हराळवाडी, शिरापुर (सो.), शेटफळ, वरकुटे, औंढी, पासलेवाडी, वाघोली / वाघोलीवाडी या गावांचा समावेश आहे

# पंढरपूर तालुक्यातील ९५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ एप्रिल -**

पंढरपूर तालुक्यातील ९५ ग्रामपंचायतींच्या संरपंचपदाचे आरक्षण मंगळवारी सोडतीव्दारे जाहीर करण्यात आले. या मध्ये सर्वसाधारण (४६), एसटी.(०३), एस.सी.(२०) आणि ओबीसीसाठी (२६) आरक्षणे सोडतीव्दारे काढण्यात आली.



दरम्यान तालुक्यातील गावनिहाय सरपंच पदाच्या आरक्षणाची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे - आवे तरटगाव (ना.मा.प्र.), उंबरगाव (ना.मा.प्र.), खरसोळी ( सर्वसाधारण महिला), पळशी (सर्वसाधारण महिला), भटुंबरे (ना.मा.प्र.महिला), चळे (सर्वसाधारण महिला), नेपतगाव (सर्वसाधारण), मेंढापूर (ना.मा.प्र.महिला), शिरढोण (ना.मा.प्र.), शेवते ( ना.मा.प्र.), शेगावदुमाला (अनुसूचित जाती), सुस्ते (ना.मा.प्र.महिला), कोंढारकी (ना.मा.प्र.), आंबेचिंचोली (ना.मा.प्र.महिला), सोनके (ना.मा.प्र.महिला), तिसंगी ( ना.मा.प्र.), बार्डी ( ना.मा.प्र.महिला), नारायणचिंचोली ( अनुसूचित जाती महिला), गादेगाव (अनुसुचित जाती), भंडीशेगाव (अनुसुचित जाती महिला), अजनसोंड (अनुसुचित जाती महिला), भाळवणी ( अनुसुचित जाती महिला), बोहाळी (अनुसुचित जाती महिला), सुगावभोसे (अनुसुचित जाती), धोंडेवाडी (अनुसुचित जाती महिला), नेमतवाडी (अनुसुचित जाती), विटे (अनुसुचित जाती), आढीव (अनुसुचित जाती महिला), करोळे (अनुसुचित जाती महिला), खर्डी (अनुसुचित जाती), गार्डी (अनुसुचित जाती), व्होळे (अनुसुचित जाती महिला), सुपली (अनुसुचित जाती), उपरी (अनुसुचित जाती महिला), चिंचोली भोसे ( अनुसुचित जाती), शंकरगाव - नळी ( सर्वसाधारण ), ईश्वरवठार (सर्वसाधारण महिला), बाभुळगाव (सर्वसाधारण), फुलचिंचोली (सर्वसाधारण महिला), तुंगत (सर्वसाधारण), सिध्देवाडी - तरटगाव- कासेगाव ( ना.मा.प्र.), तारापूर (सर्वसाधारण महिला), टाकळी गुरसाळे ( ना.मा.प्र.), पेहे (सर्वसाधारण ), पिराचीकुरोली (सर्वसाधारण), शेटफळ (ना.मा.प्र.), सांगवी-बादलकोट (अनुसुचित जमाती महिला), मुंढेवाडी (ना.मा.प्र.महिला), कासेगाव (सर्वसाधारण), पोहरगाव (ना.मा.प्र.महिला), तावशी (सर्वसाधारण महिला), टाकळी (सर्वसाधारण महिला), सरकोली (सर्वसाधारण), अनवली (सर्वसाधारण महिला), खेडभाळवणी (ना.मा.प्र.महिला), कोर्टी (सर्वसाधारण महिला), रोपळे (सर्वसाधारण), पटवर्धनकुरोली (सर्वसाधारण महिला), आंबे ( सर्वसाधारण), नांदोरे (सर्वसाधारण महिला), गुरसाळे (सर्वसाधारण महिला), देगांव (सर्वसाधारण), जळोली ( सर्वसाधारण), एकलासपूर ( ना.मा.प्र.), पुळूज ( सर्वसाधारण महिला), करकंब ( सर्वसाधारण महिला), कान्हापूरी ( सर्वसाधारण महिला), वाखरी (अनुसुचित जमाती), शिरगाव (सर्वसाधारण महिला), गोपाळपूर (सर्वसाधारण महिला), उंबरे (सर्वसाधारण), बिटरगाव (सर्वसाधारण), मगरवाडी (ना.मा.प्र.महिला), तनाळी (सर्वसाधारण), वाडीकुरोली (ना.मा.प्र.महिला), भोसे (ना.मा.प्र.महिला), ओझेवाडी (सर्वसाधारण), उजनीवसाहत (सर्वसाधारण), शेळवे (सर्वसाधारण), देवडे (ना.मा.प्र.महिला), राझंणी (ना.मा.प्र.), कौठाळी (सर्वसाधारण), केसकरवाडी (सर्वसाधारण), खेडभोसे (सर्वसाधारण), जैनवाडी (सर्वसाधारण महिला), खरातवाडी (सर्वसाधारण महिला), पांढरेवाडी (सर्वसाधारण), जाधववाडी (सर्वसाधारण महिला), चिलाईवाडी (सर्वसाधारण), अजोती (अनुसुचित जामाती), लोणारवाडी (सर्वसाधारण महिला), पुळुजवाडी (ना.मा.प्र.), सुगावखुर्द (सर्वसाधरण महिला), शेंडगेवाडी (अनुसुचित जाती) आणि चिंचणी (ना.मा.प्र.).

# अक्कलकोट तालुक्यातील ११८ ग्राम पंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि २२ एप्रिल**

अक्कलकोट तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत मंगळवारी जाहीर करण्यात आले .

सर्व साधारण : तोरणी सुलतानपूर सुलेर जवळगे नागणसूर तोळनुर, हैद्रा अंकलगी जेऊर संगोगी ब शिरवळ बोरेगाव, धारसंघ शेगाव बऱ्हाणपूर मराठवाडी, सांगवी बु/हिंगणे/कोळेकरवाडी, समर्थनगर, बबलाद/परमानंद नगर, किरनल्ली, घुंगरे गाव, कर्जळ, बॅगेहल्ली, गौडगाव खुर्द, उमरगे, इब्राहिमपूर किनी आळगे जेऊरवाडी, कोर्सेगाव, चिंचोली मै, सलगर दहिटणे वाडी गोगाव कुडल.

सर्वसाधारण महिला : मुगली, हत्ती गणपती, चुंगी करजगी बासलेगाव/रामतीर्थ, शावळ, शिरसी/बादोले बु/ काळेगाव, सातन दुधनी, दहिटणे, वागदरी, उडगी, बिंजगेर/ हालहळी मै, मैसलगी, तडवळ, हन्नूर, बोरोटी बु/महालक्ष्मी नगर, मोठ्याळ/बसवगीर, आंदेवाडी खु, हिल्लूली, कोन्हाळी, गुड्डेवाडी पालापूर मुंडेवाडी, चपळगाव/ बावकरवाडी, भोसगे, हालचिंचोळी, नाविंदगी, घोळसगाव, चिंचोली न, आंदेवाडी बू, डोंबर जवळगे/ अकतनाळ, दर्शनाळ सांगवी खुर्द/कोळेबेट/ ममदाबाद, हांद्राळ/ जैनापूर

नागरिकांचा मागास प्रवर्ग : गौडगाव बु, कडबगाव /सेवालाल नगर, मंगरूळ, कल्लकरजाळ, सदलापूर दोड्याळ बादुले बु हंजगी नागोरे कंटेहळली, बोरोटी खू/सेवानगर/ विजयनगर, बोरगाव दे, भुरीकवठे, खैराट, आंदेवाडी ज, नन्हेगाव

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला : रुद्देवाडी, खानापूर शेगाव बु, रामपूर/इटगे, सिन्नुर, काझीकणबस, साफळे निमगाव, कलहिप्परगे अरळी गळोर्गी, बनजगोळ, चिक्केहळी, हालहल्ली अ, कुमठे, संगोगी आ.

अनुसूचित जाती : चपळगाव वाडी, किनीवाडी, मिरजगी केगाव बु, वसंतराव नाईकनगर, तळेवाड, गुरववाडी, शिरवळवाडी.

अनुसूचित जाती महिला : पितापूर कुरनुर, नागनहळी, जकापूर मातनहळली, गांधीनगर (सोळशे तांडा)/ग्रामीण/मैत्री तांडा.

अनुसूचित जमाती : हसापूर, देवीकवठे.

अनुसूचित जमाती महिला : कल्लाप्पावाडी.

# दक्षिण तालुक्यातील ८३ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

## ४२ गावात ‘लाडकी बहीण’ होणार सरपंच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी ८३ गावांचे सरपंच आरक्षण जाहीर करण्यात आले. श्री शिवछत्रपती रंगभवन सभागृह येथे आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी सुमित शिंदे, दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे, नायब तहसीलदार राजाभाऊ भंडारे यांच्यासह गटविकास अधिकारी उपस्थित होते.



८३ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे आरक्षण याप्रमाणे : अनुसूचित जाती प्रवर्ग १३, त्यामध्ये ७ महिला, सर्वसाधारण ६, अनूसूचित प्रवर्ग ४, महिला २, सर्वसाधारण २, इतर मागास प्रवर्ग एकूण २२, महिला ११, सर्वसाधारण ११, खुला प्रवर्ग ४४, महिला २२, सर्वसाधारण २२ असे आरक्षण जाहीर झाले आहे. यावेळी तालुक्यातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

सर्वसाधारण प्रवर्ग : वडजी, धोत्री, कुडल, तिर्थ, तांदुळवाडी, सादेपुर, हिपळे, अंत्रोळी, वरळेगाव, औज (मं), हत्तुर-चंद्रहाळ, सिंदखेड, आचेगाव, आहेरवाडी, लिंबीचिंचोळी, वांगी, उळे, मंद्रुप-इंदिरानगर, तेलगांव (मं), कूसूर-खानापूर, कुंभारी, घोडातांडा.

महिला राखीव : भंडारकवठे, होटगी स्टेशन, बक्षीहिपरगे, इंगळगी, चिंचपूर, निंबर्गी, विंचूर, रामपुर, वळसंग, कासेगाव, बोळकवठे बंदलगी, येळेगाव, मुस्ती, दोड्डी, तोगराळी-गुर्देहळ्ळी, बंकलगी, शिरवळ, वडगांव-शिरपनहळी, कारकल, फताटेवाडी, कर्देहळ्ळी, आलेगाव, औराद.

नागरीकांचा मागास प्रवर्ग ओबीसी : अकोले (मं), बोरामणी, दिंडूर, होटगी-सावतखेड, बरूर,बोरूळ, संगदरी, मनगोळी, कंदलगांव, मद्रे, माळकवठा.

महिला राखीव : बाळगी, दर्गनहळी, शिंगडगाव,



वडापूर, नांदणी, तिल्लेहाळ, उळेवाडी, विंचूर, लवंगी, गुंजेगाव, वडकबाळ.

अनूसूचित जाती प्रवर्ग : औज (आ), गावडेवाडी, टाकळी, यत्नाळ, हणमगाव, कुरघोट.

महिला राखीव : बसवनगर, गंगेवाडी, मुळेगाव तांडा, पिंजारवाडी, शंकरनगर, कणबस, हत्तरसंग.

अनुसूचित जमाती प्रवर्ग : होनमुर्गी- बिरनाळ, संजवाड.

महिला राखीव : मुळेगाव, राजुर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पालिका शाळांमधील शिक्षकांची बदली प्रक्रिया राबविण्याची गरज

## एकाच शाळेत १० वर्ष सेवा झालेले अनेक शिक्षक तळ ठोकून



तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे
सोलापूर, दि. २२ एप्रिल-

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ अंतर्गत महापालिका शाळांमधील शिक्षकांची बदली प्रक्रिया राबविण्याची गरज आहे. एका शाळेत १० वर्ष सेवा झालेले अनेक शिक्षक तळ ठोकून आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तातडीने या संदर्भात कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे.

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाअंतर्गत महापालिकेच्या विविध माध्यमांच्या एकूण ५८ शाळा आहेत. महापालिका शाळांमध्ये एकूण २२७ शिक्षक कार्यरत आहेत. प्राथमिक शिक्षण मंडळाचे तत्कालीन प्रशासन अधिकारी संजय जावीर यांनी सन २०२३ मध्ये महापालिका शाळांमधील शिक्षकांचे बदली धोरण निश्चित केले होते. तत्कालीन महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांच्या आदेशानुसार हे बदली धोरण नेटक्या पद्धतीने राबविण्यात आले होते. एकाच शाळेत १० वर्ष सेवा करणाऱ्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. सुमारे ४६ शिक्षकांच्या बदल्या त्यावेळी करण्यात आल्या होत्या. त्यानंतर त्यानुसार नियमित बदल्या धोरण राबविणे आवश्यक होतो होते मात्र यामध्ये खंड पडला असल्याचे दिसून येते.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेल्या शिक्षकांच्या बदलींचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. दुसरीकडे सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ अंतर्गत असलेल्या मनपा शाळांच्या शिक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया अद्याप राबविण्याच्या हालचाली दिसून येत नाहीत. एकच शिक्षक १० वर्षाहून अधिक एकाच शाळेत सेवा बजावत असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होतो. यामुळे बदल्या प्रक्रिया आवश्यक मानले जाते.

मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ अंतर्गत मागील धोरणानुसार एकाच शाळेत दहा वर्ष सेवा झालेले सुमारे ७० शिक्षक असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यांची अद्यापही बदली झाली नाही. या शैक्षणिक वर्षापासून नियमानुसार शिक्षकांच्या बदल्या होणे अपेक्षित आहे. त्यासाठी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाने प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे. सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी प्रशासन अधिकारी पदाचा कार्यभार सध्या महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्याकडे आहे. तर नियंत्रण अधिकारी म्हणून उपायुक्त किरण मोरे हे आहेत. महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेच सध्या महापालिका शिक्षण मंडळाची धुरा असल्याने हे बदली धोरण राबविणे सुलभ आहे. यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने याकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज वर्तवली जात आहे.

### महापालिकेच्या ५८ शाळांमध्ये २२७ शिक्षक

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ अंतर्गत महापालिकेच्या विविध माध्यमांच्या ५८ शाळा आहेत. यामध्ये सुमारे ५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर एकूण २२७ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत. अंदाजे ६० ते ७० शिक्षक हे एकाच शाळेत दहा वर्ष सेवा बजावलेले आहेत.

---

## महत्वाचे...



### कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये पारितोषिक वितरण

सोलापूर, दि. २२ एप्रिल-

कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे ५२ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डॉ. शशिकांत तांबे यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यस्थानी प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने दीपाली दुरूगकर यांनी केले व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. दत्ता वाघमारे यांनी केले. प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. शशिकांत तांबे यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच या कार्यक्रमात वर्षभर विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन मिळवलेल्या विजयाचा आज गुणगौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ. बोंदार्डे यांनी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षीस मिळवल्याबद्दल अभिनंदन केले. याप्रसंगी बी.एड. व एम.एड. चे सर्व प्राध्यापक, बी.एड.एम.एड.चे प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन कांचन मरीकंठी यांनी केले. दिपाली दुरुगकर यांनी आभार मानले.

### परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठानची आज बैठक

सोलापूर, दि. २२ एप्रिल-

परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठानच्या वतीने विजापूर रोड भागातील समाज बांधवाची बैठक दि. २३ एप्रिल रोजी सायंकाळी ६. ३० वाजता इंदिरा नगर येथील गणपती मंदिरात आयोजित करण्यात आली आहे. यासाठी सर्व ब्रह्मवृंदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष बी. जी. कुलकर्णी, महीला अध्यक्ष डॉ माधुरी दबडे, विश्वस्थ नितीन कुलकर्णी, सल्लागार समिती सुहास देशपांडे, आद्य गुरुजी, संचालक सेवा संघ वामन कुलकर्णी, रेखा संगापुरकर यांनी केले आहे.

### पशुसंवर्धन उपायुक्तांच्या हस्ते कुक्कुट पालन प्रशिक्षण शुभारंभ

सोलापूर दि. २२ एप्रिल-

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागांतर्गत सधन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथे कुक्कुट पालन प्रशिक्षणाची तुकडी क्र. १ चे उद्घाटन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. विशाल येवले यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे यांनी भूषविले. ही प्रशिक्षण तुकडी २५ एप्रिलअखेर चालणार असून, सदर प्रशिक्षणार्थ्यांना पशुधन विकास अधिकारी डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. येवले यांनी प्रशिक्षणार्थ्यांना विविध शासकीय कुक्कुटपालन योजनाचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले. डॉ. नरळे यांनी भविष्यातील शेतीपुरक जोड व्यवसायास चालना मिळण्यासाठी व त्यातून पशुपालकांचे अर्थार्जन होण्यासाठी प्रशिक्षण देणार असून, यातून शेतमजूर, महिला, सुशिक्षित बेरोजगार यांना व्यवसाय सुरु करण्याची सुवर्ण संधी लाभणार आहे असे सांगितले. सूत्रसंचालन सहाय्यक पशुधन विकास अधिकारी एस.पी. माने यांनी केले.

### गाळेधारकाला बोलल्याच्या कारणातून दोघांना मारहाण

सोलापूर, दि. २२ एप्रिल-

भाड्याने गाळा घेतलेल्या गाळेधारकाला बोलल्याच्या कारणातून महिलेसह दोघांना मारहाण करण्यात आली. हा प्रकार गुरुनानक चौकातील गुरु दत्ता हौसिंग सोसायटीत सोमवारी सायंकाळी ६.३० वाजता घडला. धिरज प्रकाश न्यायनिरगुडे (वय ४०) व सारिका धिरज न्यायनिरगुडे (वय ३६, रा. गुरु दत्ता हौसिंग सोसायटी, सोलापूर) असे मारहाण झालेल्यांची नावे आहेत. हौसिंग सोसायटीत असणा-या दुकानाच्या भाडेकरूला धिरज आणि सारिका या सोमवारी सायंकाळी ६.३० च्या सुमारास बोलल्या. यावरून चिडलेल्या शैलेश अर्जुन सोनवणे व उमेश सोनवणेसह एक यांनी तु आमच्या गाळ्याच्या भाडेकरूला का बोलला याकारणावरून लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात धिरज आणि सारिका यांच्या सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री ९.५० वाजता दोघे शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

---

## पोलिस बंदोबस्त संपला; आता बदल्यांकडे लक्ष

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ एप्रिल-

सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व महत्वाचे बंदोबस्त संपले असून शहर व जिल्हा पोलिस दलातील कर्मचाऱ्यांना आता बदल्यांचे वेध लागले आहेत. राज्याच्या पोलिस दलातदेखील सध्या बदल्यांचे वारे वाहात असून महिनाअखेरपर्यंत कालावधी पूर्ण झालेल्या सोलापूर शहर व ग्रामीण जिल्हा पोलिस दलातील अधिकाऱ्यांच्यादेखील बदल्या होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुक झाली की सोलापूर शहर व जिल्ह्यातील सण उत्सवाचे सर्व महत्वाचे बंदोबस्त संपले जातात. त्यानंतर श्रावण महिना सुरु होईपर्यंत सुमारे अडीच महिने पोलिस विभागास कोणताही महत्वाचा नियोजित बंदोबस्त नसतो. त्यामुळे एप्रिल-मे या महिन्यात पोलिस दलातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येतात. पोलिस शिपाई ते सहायक फौजदार या पदावरील कर्मचाऱ्यांचे विनंती बदल्यांचे अर्ज मार्च महिन्यातच मागवून घेण्यात आलेले आहेत. एप्रिल अखेरपर्यंत आयुक्तालयातील तसेच ग्रामीण पोलिस दलातील समितीकडून एकाच ठिकाणचा कालावधी पूर्ण केलेल्या तसेच विनंती अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात येतील असे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. त्यामुळे बदल्यांच्या आदेशाकडे सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

---

## 'एआय'च्या युगात शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा

### कुलगुरु डॉ. महानवर; विद्यापीठात अध्यापक विकास कार्यशाळा




तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ एप्रिल-

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) व मशीन लर्निंगच्या युगात शिक्षकांनी अध्यापन व संशोधनामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भाषा व वांग्मय संकुलातर्फे पीएम उषा निधी अंतर्गत पाच दिवसीय अध्यापक विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू प्रा. डॉ. महानवर हे बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रमुख अतिथी मुंबई येथील वाणिज्य व्यवस्थापनाचे प्रा. डॉ. रिंकेश छेडा, भाषा व वांग्मय संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. तानाबाई पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यशाळेचेसमन्वयक प्रा. विजयकुमार झुंबरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले. कुलगुरु प्रा. महानवर म्हणाले की, शिक्षक हा कायम विद्यार्थी असतो. आता नवीन तंत्रज्ञानाच्या युगामध्ये नवनवीन कौशल्य शिक्षकांनी आत्मसात करावीत. आता एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता हा एक आवश्यक भाग बनला आहे. त्याचाही वापर शिक्षकांनी अध्यापनात करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. प्र-कुलगुरु प्रा. दामा यांनी विद्यापीठास पीएम उषा योजनेअंतर्गत शंभर कोटी निधी प्राप्त झाल्याने विविध उपक्रम चालू आहेत तसेच विद्यापीठाची प्रगती सुरू असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली व प्रा. श्रुती देवळे यांनी केले तर आभार डॉ. तानाबाई पाटील यांनी मानले.

---

## 'ते' अतिक्रमण काढण्यास न्यायालयाची स्थगिती

### १६ जून रोजी पुढील सुनावणी; अतिक्रमण जमीनदोस्त करण्याची पालिकेने केली होती तयारी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ एप्रिल-

शहरातील विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील सर्विस रोडवर उभारण्यात आलेली अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमित खोकी व दुकाने येत्या १० दिवसात हटविण्याची नोटीस बजावल्यानंतर पाडकामासाठी महापालिकेच्या पथकाने जय्यत तयारी केली असतानाच संबंधित विक्रेत्यांनी न्यायालयात धाव घेतली. दरम्यान, न्यायालयाकडून कारवाईस स्थगिती देण्यात आली आहे. न्यायालयाने पुढील सुनावणी दि. १६ जून रोजी ठेवली आहे.

यातील विक्रेत्यांनी न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाने पुढील सुनावणी १६ जून २०२५ रोजी ठेवली आहे. तोपर्यंत या अतिक्रमण हटाव मोहिमेस स्थगिती मिळाली आहे. या सर्विस रोडवरील जागेची फेर तपासणी करण्यात यावी अशी मागणी संबंधित विक्रेत्यांनी न्यायालयाकडे केली आहे. त्याप्रमाणे फेर तपासणी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

सोलापूर शहरातील विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील सर्विस रोडवर उभारण्यात आलेली बांधकामे आणि अतिक्रमित खोकी व दुकाने येत्या १० दिवसात हटविण्यात यावीत अन्यथा महापालिका हे अतिक्रमण हटवून संबंधितांकडून दंडासह रक्कम वसूल करणार आहे. या संदर्भात सर्वच अतिक्रमण धारकांना महापालिकेने नोटीसा बजावल्या असून याची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते.

या संदर्भात महापालिका प्रशासनाने जाहीर प्रसिद्धीकरण देखील केले होते. विजापुर रोडवरील विजापुर नाका ते ए. जी. पाटील महाविद्यालय पर्यंतच्या सर्व्हिस रोडचे अतिक्रमण काढण्याची बाब महापालिका प्रशासनाकडून नियोजित होती. यानुसार विजापूर नाका ते ए. जी. पाटील कॉलेज पर्यंत महामार्गाच्या पूर्व व पश्चिम बाजूस प्रत्येकी १२ मी रुंद सर्व्हिस रोड आहे. जागेवर सोलापूर महानगरपालिके मार्फत हद्द निश्चितीही करण्यात आली. या सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणात तात्पुरते स्ट्रक्चर, खोके, कपाउंड भिंत, गेट उभारण्यात आले आहे. हे अतिक्रमण पूर्णपणे हटविण्यात येऊन या महामार्गावरील सर्विस रोडची जागा पूर्णपणे खुली करण्यात येणार होती. या सर्विस रोडला बाधित साधारणतः ९५ अतिक्रमणे असल्याची माहिती आहे. विजापूर रोडवरील विजापूर नाका ते ए. जी. पाटील कॉलेज पर्यंत महामार्गाच्या पूर्व व पश्चिम बाजूकडील प्रत्येकी १२ मीटर रुंद सर्व्हिस रोडवरचे अतिक्रमण १० दिवसाच्या आत स्वतःहून काढून घ्यावे. अन्यथा मुदतीत अतिक्रमण निष्काशित न केल्यास महानगरपालिकेकडून अतिक्रमण निष्काशित करणेची कार्यवाही करण्यात येईल व त्याचा खर्च संबंधीत मिळकत धारकाकडून वसूल करण्यात येईल असा इशाराही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला होता. त्यानुसार महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने बुधवारपासून सर्विस रोडवर बाधित अतिक्रमण काढण्याच्या मोहिमेची जय्यत तयारी केली होती. जेसीबी, क्रेन, डंपर वगैरे आवश्यक ते साहित्य तयार ठेवले होते. दरम्यान, येथील संबंधित विक्रेत्यांनी न्यायालयात धाव घेतली. याप्रकरणी न्यायालयाने कारवाई स्थगिती दिली आहे न्यायालयाच्या स्थगितीमुळे आता ही कारवाई टळली आहे.

---

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष देणार



### डॉ. उमेश काकडे यांचे आश्वासन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ एप्रिल-

महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष देण्यात येईल, असे अश्वासन उच्च शिक्षण विभाग सोलापूरचे सहसंचालक डॉ. उमेश काकडे यांनी दिले.

डॉ. काकडे यांनी सोलापूर विभागाचा पदभार सोमवारी घेतला. यावेळी सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनच्या वतीने त्यांची भेट घेण्यात आल्यानंतर त्यांनी हे आश्वासन दिले.

यावेळी युनियनच्या वतीने त्यांचे स्वागत युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले यांनी केले. यावेळी युनियनचे सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, खजिनदार राहूल कराडे, उपाध्यक्ष आनंद व्हटकर, विद्यापीठ सिनेट सदस्य अजितकुमार संगवे, वालचंद समाजकार्य विभागाचे अधिक्षक अमोल सुपाते, लेखापाल वैभव सुपेकर आदी उपस्थित होते.

---

## तत्कालीन प्रभारी सहाय्यक आयुक्त दोषमुक्त

### समाजकल्याण शिष्यवृत्ती घोटाळा प्रकरण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २२ एप्रिल-

अत्यंत गाजलेल्या सोलापूर समाज कल्याण खात्यातील शिष्यवृत्ती घोटाळा प्रकरणातून तत्कालीन प्रभारी सहाय्यक आयुक्तांना न्यायालयाने केले दोषमुक्त करण्याचा आदेश दिला.

सन २०११ ते २०१५ या कालावधीत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकारकडून राज्य शासनास प्राप्त झालेले अनुदान हे मास्टेक कंपनीचे तत्कालीन कर्मचारी सारिका काळे व इतर ३० आरोपींनी मिळून शिष्यवृत्तीची ऑनलाईन बिले काढून त्यावर अधिकाऱ्यांची स्वाक्षरी झालेल्या यादीमध्ये बिगर शिष्यवृत्तीच्या विद्यार्थ्यांची नावे घालून फेरफार करून खोटे व बनावट दस्ताऐवज तयार करून तांत्रिक कौशल्याचा गैरवापर करून शासनाचे रक्कम रुपये एक कोटी पेक्षा जास्त रक्कमेचा अपहार करून फसवणूक केल्याप्रकरणी सोलापूर समाज कल्याण खात्याच्या तत्कालीन सहाय्यक आयुक्त मनीषा फुले यांनी फिर्याद दाखल केलेली होती. त्यानुसार सदर बझार ठाण्यात आरोपी सारिका काळे व इतर ३४ जणांविरोधात भारतीय दंड विधान संहितेन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्ह्याची व्याप्ती व गांभीर्य पाहून गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आलेला होता. सदरच्या गुन्ह्यात समाजकल्याण विभागाचे तत्कालीन विविध सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण निरीक्षक, सहाय्यक लेखाधिकारी, वरिष्ठ व कनिष्ठ लिपिक व इतर १०० पेक्षा अधिक लोकांविरुद्ध सोलापूर येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयात भारतीय दंड संहिता, अनुसूचित जातीजमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा व लाचलुचपत प्रतिबंधक कायदान्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

सदर प्रकरणातील तत्कालीन प्रभारी सहाय्यक आयुक्त प्रफुल्ल शाळिग्राम वैराळकर यांनी दोषमुक्तीसाठी अर्ज दाखल केलेला होता. या अर्जाच्या सुनावणीवेळी दि.१५/०४/२०१३ ते ०५/०५/२०१३ या कालावधीत प्रफुल वैराळकर हे सहाय्यक लेखाधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांच्याकडे प्रभारी सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यभार देण्यात आला होता. सदर कालावधीमध्ये प्रफुल्ल वैराळकर यांनी कोणत्याही ई. सी. एस. मंजूर करून निर्गमित केल्या नव्हत्या व बँकेकडे लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी पाठवण्यात आलेली नव्हत्या व त्या यादीवर त्यांच्या स्वाक्षऱ्या नव्हत्या. तसेच त्यांच्या कालावधीत कोणत्याही रक्कमा अदा करण्यात आलेल्या नसल्याने त्यांनी कोणत्याही प्रकारची खोटी व बनावट कागदपत्रे तयार करून अपहार केला नसल्याचे व मंजुरी नाकारल्याचे वैराळकर यांच्या वकिलांनी कागदपत्रांच्या आधारे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देवून पोलिसांनी आरोपीविरुद्ध कोणताही सबळ व ठोस पुरावा नसताना देखील खोटेपणाने प्रस्तुत प्रकरणात गुंतवले असल्याचे कागदपत्राच्या आधारे दाखवून युक्तिवाद केला. वैराळकर यांच्या वकिलांचा युक्तिवाद मान्य करून जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी तत्कालीन प्रभारी सहाय्यक आयुक्त प्रफुल्ल वैराळकर यांना प्रस्तुत खटल्यातून दोषमुक्त केले.

सदर प्रकरणात आरोपी प्रफुल्ल वैराळकर यांच्या वतीने ॲड. निलेश जोशी, ॲड. यशश्री जोशी, ॲड. राणी गोडबरलू (गाजुल), ॲड ओंकार परदेशी, ॲड. मधुश्री देशपांडे यांनी काम पाहिले.

---

## दुचाकी घसरल्याने महिला जखमी

सोलापूर, दि. २२ एप्रिल-

ग्रामीण पोलीस मुख्यालयाजवळील कालिका मंदिर येथून बापूजी नगरकडे जाताना अशोक चौकात दुचाकी घसरल्याने पडून महिला जखमी झाली. हा अपघात मंगळवारी सकाळी ९.१५ वाजता घडला. मिनाक्षी श्रीनिवास यंकनोर (वय ३४,रा. बापूजी नगर) असे जखमी महिलेचे नाव आहे. मंगळवारी सकाळी ९.१५ वाजता मिनाक्षी या दुचाकी चालवित राहत्या घराकडे जात होत्या. अशोक चौकातीन एसबीआय बँकेच्या एटीएमसमोरील रस्त्यावर अचाकन त्या चालवित असलेली दुचाकी घसरली. यात खाली पडल्याने चेहरा तसेच उजव्या गुडघ्याला खरचटल्याने मुलगा ओंकार याने १२.१० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले.

---

## राजश्री ऑर्केस्ट्रा बारवरील कारवाईचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना पाठविला

### सोलापूर तालुका पोलिसांची माहिती

तभा वृत्तसेवा
सोलापूर दिनांक २२ एप्रिल-

सोलापूर-हैदराबाद महामार्गावर मुळेगाव तांडा येथील हॉटेल राजश्री आर्केस्ट्रा बार या ठिकाणी परिविक्षाधीन पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व्हीएस यांच्या पथकाने छापा मारून केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल सोलापूर तालुका पोलिसांकडून जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात आला आहे. त्यामुळे आता या अहवालावरून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काय कारवाई होते याकडे लक्ष लागले आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईत बारबाला आणि ग्राहक अशा ३८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

परिविक्षाधीन पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व्हीएस यांना मिळालेल्या माहितीवरून पोलिस पथकाने हैदराबाद रोडवरील राजश्री आर्केस्ट्रा बारवर २० एप्रिल रोजी रात्री एकच्या सुमारास छापा टाकला. त्यावेळी हॉटेलमध्ये असलेल्या दोन डान्स फ्लोअरवर बारबाला तोकड्या कपड्यांवर नृत्य करताना मिळून आल्या होत्या. या बारबालांवर ग्राहकांकडून नकली पैसे उडविले जात होते. या कारवाईत पोलिसांनी दहा बारबाला आणि हॉटेल मालक, कामगार व ग्राहक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईनंतर सोलापूर तालुका पोलिसांकडून कारवाईचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मावा खाण्यासाठी वाद; मारहाणीत तरूणाचा मृत्यू

### इरण्णा वस्ती येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

शहरातील इरण्णा वस्ती येथील सार्वजनिक शौचालयाजवळ रस्त्यावर मावा खाण्यासाठीच्या वादातून तरूणास मारहाण करण्यात आली. यावेळी जमिनीवर डोक्यावर पडून तरूणाचा मृत्यू झाला.

याप्रकरणी मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी तरूणाविरूध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिमण्णा सिद्राम बंडे (रा. मधुकर उपलप वस्ती, लहान इराण्णा वस्ती, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत लक्ष्मीबाई सिद्राम बंडे (वय ६५) यांच्या फिर्यादीवरुन सिध्दांत जंगले (वय २५) याच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० एप्रिल रोजी रात्री दहाच्या सुमारास लहान इराण्णा वस्ती येथील सार्वजनिक शौचालयाच्या बोळाच्या रस्त्यामध्ये लक्ष्मीबाई यांचा मुलगा तिमण्णा याच्यासोबत सिध्दांत जंगले याचा मावा खाण्यासाठी वाद झाला होता. त्यावेळी तिमण्णा यास सिध्दांत याने कानाखाली हाताने चापट मारून हाताने ढकलून दिले होते. त्यामध्ये तिमण्णा हा जमिनीवर डोक्यावर पडून बेशुध्द पडला होता. त्यामुळे तिमण्णा यास उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर तो मरण पावला. तिमण्णा याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी सिध्दांत याच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### महत्वाचे...

## सराईत गुन्हेगार कय्यावाले दोन वर्षासाठी तडीपार

**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

शहरातील कुमठा नाका परिसरातील महाराणा प्रताप झोपडपट्टीत राहणारा सराईत गुन्हेगार शुभम कय्यावाले यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मंजूरीने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार केले. शुभम सुरेश कय्यावाले (वय २४) असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. शुभम कय्यावाले याच्याविरूध्द सन २०१९, २०२१ आणि २०२५ या कालावधीमध्ये दंगा व मारामारी करणे, महिला अत्याचार तसेच ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना पायबंद घालण्यासाठी एमआयडीसी पोलिस ठाण्याच्यावतीने शुभम कय्यावाले यास तडीपार करण्यासाठी प्रस्ताव पोलिस उपायुक्तांकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस आयुक्तांच्या सूचनेनुसार उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत शुभम कय्यावाले यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोना वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर शुभम कय्यावाले यास पुणे येथे सोडण्यात आले आहे.





## तरूणास दगडाने मारहाण करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

तरूणास दगडाने मारहाण करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अकलाख अब्दुलवहाब काझी (वय ३१, रा. शांती नगर, नई जिंदगी, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुना फिरोज याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० एप्रिल रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास शांती नगर येथे अकलाख काझी व त्याचे मित्र तबरेज जमादार, अझहर शेख, फैय्याज सगरी, सद्दाम शेख असे मिळून पाण्याच्या टाकीजवळ गप्पा मारत होते. त्यावेळी फिरोज याने चेष्टा मस्करी करीत असताना अचानकपणे अकलाख काझी यास शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने मारहाण केली. यावेळी भांडण सोडविण्यासाठी अकलाख काझी यांचे मित्र आले असताना तिथे पडलेल्या दगडाने अकलाख याच्या डोक्यात व कानावर मारून त्यास जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.



## कॉंक्रीट मशीनच्या चाकाखाली सापडून एकजण जखमी

**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

टोईंग केलेल्या कॉंक्रींट मिक्सरच्या मशीनच्या चाकाखाली सापडून तरूण जखमी झाला. रावसाहेब प्रकाश नरूटे (वय २८, रा. कल्याण नगर भाग १, जुळे सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. याबाबत प्रकाश मलकारी नरूटे (वय ५२) यांच्या फिर्यादीवरुन राम चंद्र उत्तम सोनवणे (वय ४०, रा. महात्मा फुले झोपडपट्टी, मोदीखाना, जुळे सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुम ारास जुळे सोलापूर येथील डिमार्टसमोर रावसाहेब नरूटे हा बसला होता. तो लघुशंकेसाठी वैष्णवी प्लाझा इमारतीसमोरील मोकळ्या मैदानात जाऊन परत डीमार्ट ते दावत चौकाकडून आसरा चौकाकडे येणाऱ्या रस्त्याने डिव्हायडरवरून रस्ता ओलांडत होता. त्यावेळी टेम्पो नं. एमएच २४ एबी ६२०६ या गाडीचा रावसाहेब यास कट लागला आणि त्याचा तोल जाऊन तो टेम्पोमागे टोईंग केलेल्या कॉंक्रीट मिक्सरच्या मशिनच्या म ागील चाकाखाली पडला. मिक्सर मशिनचे चाक रावसाहेब याच्या पायावरून जाऊन तो गंभीर जखमी झाला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गावडे पुढील तपास करीत आहेत.

# शहरात एकीकडे पाणीटंचाई तर दुसरीकडे रस्त्यावर वाहते पाणी; प्रशासनाचे दुर्लक्ष

- हद्दवाढ भागातील नागरिक झोन कार्यालयातून नेत आहेत रिक्षातून पाणी..!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ एप्रिल-**

सोलापूर शहराचे तापमान ज्याप्रमाणे वाढत आहे. त्याप्रमाणे पाण्याची टंचाई देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ऐन उन्हाळ्यात शहरात नेहमीच पाणीटंचाई भेडसावते. पाण्याचे वाटपाचे योग्य नियोजन नसल्याने शहरात एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात टंचाई जाणवत आहे. दुसरीकडे पाणी आल्याच्या दिवशी सर्वत्र पाणीच पाणी दिसून येते. त्यामुळे नागरिकांनी महापालिकेच्या नियोजन शून्य कारभारावर ताशेरे ओढले आहेत.

शहराच्या हद्दवाढ भागात नेहमीच पाण्याची बोंब आहे. मात्र, उन्हाळ्यात यात आणखीन भर पडत आहे. पाणी वाटपाचे योग्य नियोजन असल्याने शहरी भागात मोठ्या प्रमाणात पाणी, तेही कमी टप्प्याने दिले जाते. मात्र दुसरीकडे हद्दवाढ भागातील अनेक नगरांमध्ये आठ दिवस झाले तरी पाण्याचा दिवस उगवत नाही. अशा अवस्थेत नागरिकांनी काय करावे असा प्रश्न उपस्थित होत आहे.



दरम्यान आठ दिवसानंतर देखील पाणी आले नसल्याने शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांनी साधू वासवानी येथील झोन कार्यालयात थेट पाणी भरण्यासाठी रिक्षा घेऊन गेले. चिमुकला बालगोपाळांसह वृद्धांनी येथील नळातून पाणी भरले. परंतु तेथे देखील कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिक हैराण झाले. भरलेले भांडे रिक्षामध्ये घालून नागरिकांनी आपले घर गाठले. अशा अवस्थेत आम्ही कसे जायचे, घरामध्ये लहान लहान मुले आहेत. पाण्याविना हाल बेहाल झाले आहेत. अशी व्यथा यावेळी पाणी भरण्यासाठी आलेल्या वृद्धांनी मांडली. तर दुसरीकडे शहरात काही ठिकाणी आज पाण्याचा दिवस होता. मात्र तेथे मोठ्या प्रम ाणात पाणी आल्याने रस्त्यावर पाणीच पाणी दिसून आले. पाण्याचा अपव्यय टाळा असे महापालिका प्रशासनाने आवाहन केले आहे. मात्र, त्या आवाहनाला नागरिकांनी केराची टोपली दाखवली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात रस्त्यावरून पाणी वाहताना दिसून आले. एकीकडे पाहण्यासाठी नागरिक वणवण फिरत असताना दुसरीकडे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याचे चित्र यावेळी दिसून आले.



**सोलापूर : शहरात पाणीटंचाईसह पाण्याचा अपव्यय होत आहे. दुसऱ्या छायाचित्रात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांनी रिक्षाद्वारे थेट झोन कार्यालयात येऊन पाणी भरले.**

### महापालिका प्रशासनाने पाण्याचे योग्य नियोजन करावे

दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते. पाणी मुबलक प्रमाणात असताना देखील त्याचे वाटपासाठी योग्य नियोजन होत नाही. उजनी धरण सोलापूर शहर जिल्ह्यासाठी असताना, त्यातून इतर जिल्ह्यांना पाणी दिले जाते. त्यामुळे सोलापूरच्या हक्काच्या धरणाचा काही उपयोग राहिला नाही. त्यामुळे सोलापूरकरांवर अन्याय होत आहे. शासनाने तसेच प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी.

**- दत्तात्रय काळे, नागरिक**

## प्रस्थापितांनी निवडणुकीसाठीच स्वत:च्या कुटुंबातील व्यक्तीच्या नावावर सोसायट्या काढल्या

- बाजार समितीच्या राजकीय आखाड्यात आमदार सुभाष देशमुख यांची विरोधकांवर टीका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ एप्रिल**

प्रस्थापितांनी केवळ स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीच्या नावावर सोसायट्या काढल्या, त्यातून शेतकऱ्यांचे हित न पाहता कृषी उत्पन्न बाजार समिती व डीसीसी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मतांचा वापर करून घेतला. अनेक वर्षे बाजार समितीची सत्ता आपल्याकडे होती तेव्हां तुम्ही काय केले? असा सवाल आमदार सुभाष देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांना विचारला.

श्री सिद्धेश्वर बाजार समिती परिवर्तन पॅनलच्या प्रचारानिमित्त वडाळा येथे आयोजित बैठकीत आ. देशमुख बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे, महादेव चाकोते, जितेंद्र शिलवंत, उमेदवार संग्राम पाटील, भाजपाचे तालुकाध्यक्ष रामकाका जाधव, वडाळ्याचे सरपंच जितेंद्र साठे, हरीदास शिंदे, भाजपा महिला आघाडीच्या वृषाली पवार, अण्णू मार्तडे, रविकांत पाटील आदींसह



उत्तर तालुक्यातील विकास सोसायटी व ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते.

आ. देशमुख पुढे म्हणाले, शेतकऱ्यांचा विकास करण्यासाठी योजनांवर अभ्यास करायला हवा. मात्र, १० मिनिटात संचालक मंडळाची बैठक संपते. मोठी उलाढाल असल्याने सोलापूर बाजार समिती देशात नंबर १ बाजार समिती आणण्यासाठी प्रयत्न करायला हवे होते. मात्र, तसे कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. महादेव चाकोते म्हणाले, मी चेअरमन असताना बाजार समितीच्या ठेवी ४० कोटींहून अधिक झाल्या होत्या. त्यानंतर आमदार विजयकुमार देशमुख चेअरमन झाल्यावर ठेवीत वाढ झाली. मग मधल्या काळात ठेवी का वाढल्या नाहीत?

काका साठे म्हणाले, शेतकऱ्यांसाठी काहीही न करता केवळ निवडणूक लढविण्यासाठी एकत्र यायचे हे काही नवे नाही. अवघ्या १० मिनिटात बैठक संपविली जात असेल, तर नियोजन कसे होणार? या बाजार समितीची बोलणी करताना आमदार सुभाष देशमुख यांना विचारात घेतले नाही, असा आरोपही यावेळी त्यांनी केला. एकंदर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राजकीय आखाड्यात आता प्रचाराला वेग आला आहे. प्रचारामध्ये सत्ताधारी विरुद्ध विरोधक यांच्यामध्ये आरोप प्रत्यारोपांच्या टीकेची झोड उठवली जात असून यामाध्यमातून सत्ताधारी का विरोधक? नेमके निवडणुकीत बाजी मारणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## बाजार समिती निवडणुकीसाठी उद्धवसेनेचा सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनलला पाठिंबा

- शिवसैनिकांना पॅनलमधील उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ एप्रिल**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सत्ताधारी श्रीसिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनल मधील सर्व उमेदवारांना मतदान करण्याचा निर्धार मंगळवार (दि.२२)एप्रिल रोजी दक्षिण सोलापूर तालुका येथे आयोजित करण्यात आलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या बैठकीत करण्यात आला.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती पंचवार्षिक निवडणुकीच्या अनुषंगाने तसेच नवनिर्वाचित निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा गौरव सोहळा दक्षिण सोलापूर तालुका उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या वतीने विजापूर रोडवरील मांगल्य मंगल कार्यालयात पार पडला. यावेळी व्यासपीठावर जिल्हाप्रमुख संतोष पाटील, गणेश वानकर, लक्ष्मण जाधव, भीमाशंकर म्हेत्रे



आदी उपस्थित होते.

दरम्यान, शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या आदेशानुसार ही बैठक घेण्यात आली. याबैठकीमध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार गणेश वानकर यांच्यासह पॅनल टू पॅनल मतदान करण्याचे आवाहन शिवसैनिकांनी केले. शहर उत्तर आणि दक्षिण सोलापुरातील अनेक गावांमध्ये अनेक सोसायटीमध्ये शिवसेनेचे ग्रामपंचायत सदस्य आणि सोसायटी सदस्य असल्याने जवळपास साडेपाचशे मतदान शिवसेनेचे या दोन्ही तालुक्यांमध्ये आहे. हे सर्व मतदान शेतकरी विकास पॅनलला करावे, तसेच बाजार समितीमधील शेतकरी विकास पॅनलला निवडून आणण्याचा निश्चय या बैठकीत करण्यात आला.

यावेळी विराज घंटे, खंडू सलगरकर, गंगाराम चौगुले संतोष घोडके, सखाराम वाघ, राजू कोळी, सय्यद सत्तार, इलियास शेख, शिवा माळी, विकास डोलारे, दत्ता जाधव, प्रशांत पाटील, परमेश्वर देवकाते, कबीर शेख, गणेश कडवे, वाल्मिकी घंटे, पंडित गावडे, बंडू नदाब यांच्यासह ग्रामीण भागातील पदाधिकारी ग्रामपंचायत सदस्य सोसायटी सदस्य उपस्थित होते.

### डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण...

# शवविच्छेदनावेळी डॉ. वळसंगकरांच्या डोक्यातून काढली अर्धी गोळी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

मेंदूविकार तज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांनी स्वत: गोळी मारून आत्महत्या केली. डॉक्टरांनी डोक्यात बंदुकीतून मारून घेतलेली गोळी पूर्णपणे डोक्यातून बाहेर पडली नव्हती. गोळीतील अर्धा भाग डोक्यातच अडकला होता. तो शवविच्छेदन करताना डॉक्टरांनी काढला. हा प्रकार शुक्रवार १८ एप्रिल रोजी रात्री ८.३० वाजता घडला आहे.

मोदी स्मशानभूमीसमोरील एस. पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्सेसचे संस्थापक तथा प्रसिध्द मेंदू विकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांनी त्यांच्या राहत्या घरी बंदुकीतून गोळी झाडून स्वत:चे जीवन संपवले. संवेदनशील व्यक्तीने उचलेले टोकाचे पाऊल सोलापुरकरांना मात्र रुचले नाही. ०.३२ बंदुकीतून त्यांनी स्वत:वर मारून घेतलेली गोळी ही ०.२ एमएमची आहे. सुरुवातीला ट्रिगर दाबताना झालेल्या चुकीतून पहिली गोळी घरात खाली पडली असल्याचे पोलिसांचे मत आहे. त्यानंतर पुन्हा केलेल्या प्रयत्नात गोळी डोक्यात घुसली. परंतु ती पूर्णपणे बाहेर पडली नव्हती. अर्धी गोळी बाहेर पडली तर अर्धी गोळी डोक्यातच अडकली होती. शवविच्छेदनावेळी ती अर्धी गोळी काढण्यात आली असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, घटना घडल्यानंतर रात्री ब-याच प्रयत्नानंतरही डॉ. वळसंगकर यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. त्यानंतर त्यांच्या आत्महत्येमागील कारणांचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरु आहे. त्यांच्या आत्महत्येनंतर अनेक चर्चा रंगल्या, पण पोलिसांना मिळालेल्या चिठ्ठीतून या प्रकरणाच्या तपासाला दिशा मिळाली आहे. या चिठ्ठीतून डॉ. वळसंगकरांनी टोकाचे पाऊल का उचलले याचा उलगडा होत असला तरी आणखी खोलात जाऊन पोलिसांकडून तपास केला जात आहे. संशयित महिलेला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून १७ एप्रिल रोजी तिने डॉक्टरांना केलेल्या ई-मेलची प्रतही पोलिसांच्या वतीने जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिस आता कसून तपास करत असून आणखी काय माहिती समोर येते? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पोलिसांकडून घटनेच्या सर्व बाजूंनी तपासाची चक्रे फिरवली जात आहेत. यात घरातील व्यक्तींकडेही संशयाचे बोट केले जात असले तरी पोलिसांनी याला दुजोरा दिला नाही. चर्चा होतात, पण आमचा तपास योग्य मार्गाने सुरु असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अटक केलेल्या त्यांच्याच हॉस्पिटलमधील महिला कर्मचाऱ्याची पोलिसांनी कसून चौकशी सुरु केली आहे. मनीषा महेश मुसळे ऊर्फ मनीषा माने (वय ४५, रा. बसवराज नेलेनगर, जुळे सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या म हिलेचे नाव आहे. याप्रकरणी डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### रुग्णालय व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा असायली हवीय...

मोठ्या स्वरूपात असलेल्या रुग्णालयात संबंधित डॉक्टरांनी तेथील व्यवस्थापन सांभाळण्यासाठी कुशल तसेच प्रशिक्षित व्यक्तीची निवड करून नियुक्ती करावी. त्यांच्या माध्यमातून रुग्णालयाच्या व्यवस्थापनाची बाजू सांभाळावी अशी अपेक्षा पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिका-यांनी व्यक्त केली आहे. रुग्णसेवा आणि पुन्हा त्यात व्यवस्थापनाचा भार वैयक्तिक डॉक्टरांचा मानसिक ताण वाढविणारा ठरू शकतो. व्यवस्थापन यंत्रणा स्वतंत्रपणे राबविल्यास कामाची मांडणी आणि रुग्णांची सेवा या दोन्ही बाबी व्यवस्थितपणे सांभाळता येतील, असे अधिका-यांचे म्हणणे आहे.







## रक्तपेढीतून साद अन् परमेश्वर माळगेंचा प्रतिसाद

### जुळे सोलापुरात ७५ जणांचे झाले रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

रक्ताच्या तुटवड्यामुळे रक्तपेढ्यांनी दिलेल्या हाकेला प्रतिसाद देत जुळे सोलापुरातील सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर माळगे व मित्र मंडळाने तत्काळ रक्तदान शिबिर घेतले. अन् त्याम ध्ये ७५ जणांनी रक्तदान केले.

उन्हाळ्यात सोलापुरातील अनेक रक्तपेढीमध्ये रक्ताचा तुटवडा असतो. यावर्षी तर अधिकच उन्हाळा असल्याने रक्तपेढ्यात रक्ताची मागणी वाढल्याचे चित्र आहे. त्यामुळे रक्तदानासाठी नेहमी पुढाकार घेणाऱ्या संस्थांना रक्तपेढ्यातून याबाबत साद घातली जाते. त्याला प्रतिसाद देणारे काही मोजकेच असतात. अशीच साद यंदाही रक्तपेढीतून घातली गेली. अन् जुळे सोलापुरातील परमेश्वर माळगे मित्र मंडळाने रक्तदान शिबीरचे आयोजन केले. जुळे सोलापुरात सामाजिक कार्यकर्ते म ाळगे हे नेहमीच सामाजिक कार्यात पुढाकार घेतात. कोविड काळात लसीकरण शिबिर राबवले, सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, क्रिकेट स्पर्धांचे आयोजन, धार्मिक कार्यात महाप्रसादाचे वाटप आदीसह रक्तदान शिबिराच्या आयोजनातही त्यांचा पुढाकार असतो. जुळे सोलापुरातील परमेश्वर माळगे संपर्क कार्यालयात केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सचिन कुसेकर, श्रीकांत जमादार, अविनाश बोदले, कोस्तुभ स्वामी, लक्ष्मण कावळे, दिपक भोसले, धनराज गायकवाड, पवार, अप्पू स्वामी, प्रथमेश माळगे, पवन खवसकर यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०९५

**आतां भारतीं कमळपरागु । गीताख्यु प्रसंगु ।**
**जो संवादला श्रीरंगु । अर्जुनेशी ।।**

महाभारत म्हणजे नेमके काय आहे याचे स्पष्टीकरण केल्यानंतर ज्ञानेश्वर माऊलींनी हा महाभारतीय संवाद कोणा-कोणामध्ये झाला किंवा कोणासाठी झाला या विषयाला या ओवीपासून सुरुवात केली आहे. सुरुवातीस देवदेवतांचे, सदगुरुंचे नमन व महाभारतात काय आहे याची महती व स्पष्टीकरण केले आहे. हे स्पष्टीकरण व नमन संपल्यानंतर माऊलींनी या ओवीचा प्रारंभ आतां या शब्दाने केला आहे. आतां म्हणजे यापूर्वी सांगीतलेले सर्व सांगणे झाल्यानंतर असा होय. महाभारत हा संवाद प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण व भक्तरुपी श्रोता अर्जुन या दोघातील आहे. प्रत्यक्ष रणभूमीवर अर्जुनाला या कथेची गरज होती हे जरी सत्य असले तरी आपण सुध्दा एका आगळया-वेगळया संसाररुपी रणभुमीतच आहोत हे विसरता कामा नये. प्रत्यक्षात अर्जुन मरण्याच्या किंवा मारण्याच्या तयारीत रणभूमीवर उतरला असला तरीही आपण सुध्दा काम, क्रोध, मोह, मत्सर, स्वार्थ अशा शत्रूंशी लढण्यासाठी संसारुपी रणभूमीतच उतरलेले आहेत. या रणभूमीत जिंकण्यासाठी आपणालाही



श्रीकृष्ण भगंवतासारखा कोणीतरी मार्गदर्शक हवा आहे. अर्जुन ईतरांशी लढण्यासाठी तयार होत नव्हता कारण त्याला त्याच्या अंतर्गत शत्रूंनी हतबल केले होते. या अंतर्गत शत्रूंना हरवून युध्दासाठी तयार करण्याकरिता श्रीकृष्णांनी अर्जुनाशी हा संवाद केला आहे. माऊलींनी या संवादाला, महाभारताला कमळाची उपमा देऊन या कमळातील सुगंधी कणच प्रसंगानुरुप श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगीतले आहेत. या सुगंधी कणांचे श्रवण करण्यासाठी किंवा सुगंधी कणांचा सुगंध घेण्यासाठी अर्जुन सुध्दा तेवढाच पात्र झाला होता. अर्जुनाप्रमाणे आपण पण आपल्या जीवनातील प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी हा महाभारतरुपी ज्ञानाचा सुगंध स्विकारला पाहिजे. अर्जुनाला संवाद करण्यासाठी श्रीकृष्ण होते. आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी किंवा सुसंवाद करण्यासाठी प्रत्यक्ष श्रीकृष्ण नसले तरी त्यांनी सांगीतलेली ही गीता त्यांच्याच रुपात पाहून आपण हा संवाद स्वीकारायला हरकत नाही. अर्थात, आपण श्रोत्यांनी, वाचकांनी अर्जुनाची भूमीका स्वीकारायची ठरवले तर गीतारुपी किंवा ज्ञानेश्वरीरुपी श्रीकृष्ण परमात्मा आमच्यासाठी मार्गदर्शन करण्यास तयारच आहे यात शंका नाही. श्रीकृष्णांचे हे मार्गदर्शन माऊलींनी ओव्यांच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे. माऊलींच्या ओव्या आम्ही आमच्या शब्दांत सांगण्याचा प्रयत्न करीत आहोत. आमचा हा छोटासा प्रयत्न आपणास आनंद देईल यात आम्हाला शंका वाटत नाही. हा आनंद आपणास सदैव मिळावा यासाठी आपण सदैव आमच्या सोबत अर्थात, या लेखमालेच्या सहवासात राहावे. भाव आणि आवड कोणत्याही क्षेत्रतील आनंद वाढवण्यासाठी आवश्यक असणारे असल्याने आपण येथेही सकारात्मक भाव आणि आवड जोपासाल अशी अपेक्षा आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस, श्री भैरवनाथ यात्रा श्रीगोंदा |
| दि. २३ एप्रिल २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - चैत्र | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. दशमी (१६.४३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - ग्रीष्म | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - धनिष्ठा (१२.०७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - शुक्ल (१८.५०) | |
| करण - बव (२७.४२) | |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.

# आश्रमशाळांची शिक्षक भरती 'पवित्र पोर्टल' मार्फत

## आदिवासी विकास विभागाचा निर्णय; शिक्षक संचमान्यतेचा सुधारित आदेश जारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**




राज्याच्या शालेय शिक्षण विभागापाठोपाठ आदिवासी विकास विभागानेही आश्रमशाळांमधील शिक्षक भरती पवित्र पोर्टलमार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, शासकीय आश्रमशाळा व खासगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक संचमान्यतेचा सुधारित आदेश जारी केला. त्यानुसार इयत्ता पहिली ते पाचवी, आठवी, दहावी व बारावीपर्यंत विद्यार्थी संख्येच्या आधारे यापुढे शिक्षक, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षकांची पदे मंजूर करण्यात येणार आहेत.

विस्तृत कार्यक्षेत्र असलेल्या आदिवासी विकास विभागाने 'आरटीई-२००९ अंतर्गत संचमान्यतेचा सुधारित आदेश निर्गमित केला. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे शिक्षण पदे मंजूर करण्यात येतील. एकाच वर्गाची अधिक शिक्षक असल्यास शिक्षक पदे मंजूर करण्याबाबत सुधारित निकष लागू केले आहेत. इयत्ता पहिली ते पाचवी, पहिली ते सातवी ,आठवी, पहिली ते दहावी व पहिली ते बारावी या वर्गासाठी विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक, मुख्याध्यापक व इतर पदांना मंजुरी देण्यात येईल. त्याची कार्यवाही व कार्यकाळही ठरवून दिल्याने आता संचमान्यता करणे शक्य होईल.

### आदिवासी विकास विभाग अंतर्गत येणाऱ्या शाळा व संख्या

- आदिवासी आश्रमशाळा ४९७
- पहिली ते बारावी विद्यार्थी संख्या :- दोन लाख ४ हजार ४५८
- ५५२ अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थी संख्या २ लाख ५२ हजार ७७८
- राज्यात ४९० शासकीय वस्तीगृहात ५८ हजार विद्यार्थी

### सुधारित संचमान्यतेतील सूचना

- आश्रमशाळांनी १६ ऑगस्टपर्यंत विद्यार्थी संख्या निश्चित करणे.
- ३१ ऑगस्टपर्यंत प्रकल्प अधिकारी संबंधित अप्पर आयुक्तांकडे संचमान्यतेचा प्रस्ताव पाठवणे
- अप्पर आयुक्त १५ ऑक्टोबरपर्यंत संचमान्यता मंजूरी प्रदान करणार.
- १५ नोव्हेंबरपूर्वी अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणे.
- ३० नोव्हेंवरपर्यंत पदांचा गोषवारा सादर होईल, १५ डिसेंबरपर्यंत शासनाकडे सादर करण्यात येणार.

सोलापूर जिल्ह्यासह आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळेमध्ये शिक्षक भरती होत असून सोलापूर जिल्ह्यातील जवळपास दोन ते तीन शाळेमध्ये सुद्धा आतापर्यंत कंत्राटी मानधना व काम करणाऱ्या शिक्षकांची नेमणूक होत होती. यापुढे यांची नेमणूक कायमस्वरूपी पवित्र पोर्टल बुद्धिमत्ता चाचणीच्या माध्यमातून होणार असून सोलापूर जिल्ह्यातील आश्रम शाळालाही पावित्र मार्फत शिक्षक उपलब्ध होऊ शकतील.

आदिवासी विकास विभागाच्या शाळेत पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक भरती होत असेल तर स्वागत आहे. आदिवासी विकास विभागाच्या संचमान्यता दुरुस्ती करून प्रक्रिया राबवावी. सुधारीत आरक्षण व विषयानुसार जागा पात्रताधारक उमेदवारांची जागा भरण्यात यावी. भरती प्रक्रिया पारदर्शक व गतीमान व्हावे.त्यामुळे भविष्यात आदिवासी विकास विभागाच्या शाळांना गुणवंत व आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यासु शिक्षक उपलब्ध होऊ शकतील.

**- प्रशांत शिरगुर,**
**राज्य उपाध्यक्ष**
स्पर्धा परीक्षा विद्यार्थी
असो.पवित्र पोर्टल शिक्षक भरती

# वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या वतीने बसव सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

कुंभार वेस येथील वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या वतीने महात्मा बसवेश्वर महाराज जन्मोत्सवानिमित्त दि. २४ ते ३० एप्रिल दरम्यान बसव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उत्सव अध्यक्ष सुनील रामशेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गुरुवार दि. २४ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता गणपती घाट सिद्धेश्वर तलाव परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. सायंकाळी ७ वाजता प्रतिष्ठान कार्यालय येथे श्री बसव मूर्ती प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्यानंतर २५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता प्रतिष्ठान कार्यालय येथे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. २६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता आरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. रविवार दि. २७ एप्रिल रोजी सायंकाळी व सकाळी ६ वाजता सिद्धेश्वर योगा प्राणायाम वर्ग घेण्यात येणार आहेत. दि. २८ एप्रिल रोजी वीरेश तंबाके स्वीट्स, कुंभार वेस येथे पाणपोईचे उद्घाटन करण्यात येणार आहे तसेच महिला मंडळ भजन संध्या कार्यक्रम होणार आहे. २९ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता श्रीशैल कावडी महापूजा होणार आहे. बुधवार दि. ३० एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता प्रतिष्ठान कार्यालय येथे मान्यवरांच्या हस्ते महापूजा होणार आहे. या पत्रकार परिषदेस आडव्यप्पा कडगंची, राजशेखर विजापुरे, कैलास जेऊरे, शशिकांत बिराजदार आदी उपस्थित होते.

# छ. संभाजी महाराज मध्यवर्ती मंडळाच्या जयंती उत्सव अध्यक्षपदी सावळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाच्या जयंती उत्सव अध्यक्षपदी निशांत सावळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

शिवपुत्र संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष राम जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मुरारजी पेठ येथील हिंदवी स्वराज्य भवनात मंगळवारी सायंकाळी झालेल्या बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून जयघोष करून बैठकीला सुरुवात करण्यात आली. १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आहे. या निमित्ताने मध्यवर्ती महामंडळाच्या अधिपत्याखाली मिरवणुका निघणार आहेत. सोलापूर शहरातील मंडळांना येणाऱ्या अडचणी संदर्भातही बैठकीत चर्चा करण्यात आली. पारंपारिक वाद्य आणि डॉल्बी संदर्भात प्रशासनाकडून घालून दिलेल्या नियमांचे पालन करूनच छत्रपती संभाजी महाराजांच्या मिरवणुका काढण्यात येणार आहेत. मंडळाला येणाऱ्या अडचणी संदर्भात संपर्क साधण्याचे आवाहन शिवपुत्र संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष राम जाधव यांनी केले आहे. अठरापगड जातींना सोबत घेऊन सोलापुरात छत्रपती संभाजी महाराजांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येणार आहे .या माध्यमातून संभाजी महाराजांचे कर्तृत्व आणि विचार पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सोलापुरातील मंडळांनी छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी करताना संभाजी महाराजांच्या इतिहासाला चित्र आणि देखाव्याच्या माध्यमातून प्राधान्य द्यावे ,असे आवाहन नूतन उत्सव अध्यक्ष निशांत सावळे यांनी केले आहे. उत्सव अध्यक्षपदी निशांत सावळे, कार्याध्यक्षपदी वीरेश कलशेट्टी आणि उपाध्यक्षपदी सागर गायकवाड आणि सॅम पतंगे यांची निवड करण्यात आली. यावेळी मध्यवर्ती महामंडळाचे विश्वस्त राजाभाऊ गेजगे, पवन आलुरे, हरिभाऊ सावंत, नागेश भोसले आणि राहुल दहीहंडे उपस्थित होते.



# बुर्ला महाविद्यालयात वसुंधरा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

नैसर्गिक संकटापासून सजीवसृष्टीचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने वसुंधरेला हिरवे करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले पाहिजे तरच पृथ्वीवर सजीव सृष्टीचे अस्तित्व टिकून राहिल.असे प्रतिपादन पर्यावरणप्रेमी डॉ.तुकाराम शिंदे यांनी केली.

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पर्यावरण अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वसुंधरा दिवस साजरा करण्यात आला. पुढे बोलताना डॉ. शिंदे म्हणाले की, पर्यावरणाच्या रक्षणासाठी केवळ एक दिवस काम करणे पुरेसे नाही तर बाराही महिने वृक्षांचे संगोपन केले पाहिजे तरच वृक्षांचे चांगल्या प्रकारे संगोपन होऊ शकेल. यानिमित्ताने महाविद्यालय परिसरामध्ये १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. पूर्वी लागवड करण्यात आलेल्या १०० वृक्षांभोवती आळी करण्यात आली.

उन्हाळाच्या कडाक्यात पक्षांना पाणी मिळावे म्हणून झाडांच्या फांद्यांना जलपात्र बांधण्यात आले. त्याचबरोबर पर्यावरण वाचवा वसुंधरेला सजवा अशा घोषणा देण्यात आल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक एक्कलदेवी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, डॉ.शंकर राजे व प्रा.उमाशंकर नादरगी यांनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेविकेंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.



## विपरीत विपर्यास

**काय गंमत असते ना ? एकाच गोष्टीबाबत, एकाचवेळी किती गंमतीच्या कल्पना असतात ना? आणि त्याही परस्पर विरोधी आणि तरीही त्या कल्पना एकाचवेळी, सारख्याच प्रभावाने सुरू असतात सुखेनैव...**

---

आता हेच बघा ना रामनाम आणि रामस्मरण (रामनामाचा अखंड जप ) याचे महत्व आपल्याकडे अक्षरश: शतकानुशतके चालत आले आहे. पण तरीही रामकथा मात्र घरी करू नये असा संकेत आहे. रामकथा सामूहिक श्रवणाचा भाग आहे आणि असावा असा त्या संकेताचा अर्थ आहेच. पण त्याचबरोबर रामकथा राहत्या घरी करू नये असा संकेत आहे. राम हा कितीही आदर्श म्हणून डोळ्यासमोर सर्वांनी सतत ठेवावा असा आपला पिढीजात संस्कार असला तरी सुद्धा हाही संकेत आहेच. याला असणारा एकमेव अपवाद म्हणजे जर घरी सोळा सोमवार सारखे चार - सव्वा चार महिने शंकर- आराधना व्रत सुरू असेल तर त्याकाळात भगवान रामाचे आराध्य दैवत शंकर होते म्हणून रामकथा घरी केली तरी चालते.

विपरीत विपर्यास असाच काहीसा प्रकार भगवद् गीतेबाबतही आहे. धर्मग्रंथ म्हणून , तत्वचर्चा म्हणून , भगवद गीता सर्वश्रेष्ठ आहे हे तर सार्वकालीक संस्कार आहे. पण त्याचवेळी आपल्या देशाच्या काही भागात भगवद् गीतेचे पुस्तक घरात ठेवू नये असाही समज आहे. कारण भगवद् गीता हे कुरुक्षेत्रावर सांगितले गेलेले तत्वज्ञान आहे आणि कुरुक्षेत्र हे वंशवृक्षाच्या रणांगणाचे कारण आणि परिणाम आहे असे तिथे मानले जाते.

विपरीत विपर्यास असाच थोडासा प्रकार महाभारत या आपल्या सर्वश्रेष्ठ ग्रंथाबाबतही आहे. या ग्रंथाच्या सर्वश्रेष्ठतेबाबत कोणतेही दुमत नाही. पण हा ग्रंथ घरात ठेवल्यास कलह माजतो असे मानणाराही एक वर्ग अनेक ठिकाणी आहे. विपरीत विपर्यास अशी अजूनही उदाहरणे निश्चितच असतील. पण याक्षणी तरी मला ती आठवत नाहीयेत. त्यासाठी आठवणीला ताण देताना मनात आले की पलटती राजकीय परिस्थिती , बदलत्या धार्मिक भावना , अस्थिर सामाजिक परिस्थिती यातून असे विपर्यास जन्माला येत असतील का ?

**- चन्द्रशेखर टिळक**

# 'पितांबरी'चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**ठाणे, दि. २२ एप्रिल-**

'डॉक्टर' ही पदवी मी केवळ नावामागे लावायचा मान म्हणून पाहत नाही, तर तिच्यामागे दडलेला विचार उद्योगासाठी खूप महत्त्वाचा आहे. 'डी' 'डिफरेंशिएटर' अर्थात आपल्या प्रॉडक्टचं वेगळेपण, 'ओ' 'ऑब्जेक्टिव्ह' म्हणजे उद्योगाचं स्पष्ट ध्येय आणि उद्दिष्ट असणे, 'सी' 'कलेक्टिवली' म्हणजे टीमवर्क आणि एकजूट, 'टी' टाइम मॅनेजमेंट अर्थात वेळेचं काटेकोर नियोजन,'ओ' ऑर्डर म्हणजे नियोजनबद्ध अंमलबजावणी, 'आर' रिझल्ट म्हणजे शंभर टक्के रिझल्टची खात्री. अशा प्रकारे 'डॉक्टर' या शब्दातील प्रत्येक अक्षर पितांबरी उद्योगाच्या यशाचा पाया आहे. म्हणूनच पितांबरी उद्योगाला पाठबळ देणाऱ्या प्रत्येक संस्थेला, मला मिळालेली ही 'डॉक्टरेट' पदवी अर्पण करतो, असे प्रतिपादन डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांनी पुरस्कार स्विकारताना केले.




टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्यावतीने उद्योगक्षेत्रातील नेत्रदीपक कर्तृत्व आणि सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पितांबरीचे व्यवस्थापकीय संचालक रविंद्र प्रभुदेसाई यांना नुकतीच डि. लिट. ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली. या निमित्त त्यांचा नागरी सत्कार गुरुवारी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात नागरी अभिवादन सत्कार समिती ठाणेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, प्रसिद्ध व्याख्याते डॉ. सच्चिदानंद शेवडे, चितळे उद्योगसमूहाचे श्रीकृष्ण चितळे, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. ठाणेकरांची उपस्थिती लाभलेल्या आणि ब्रह्मवृंद आशीर्वचनाने मंत्रमुग्ध झालेल्या भरगच्चं सभागृहात मान्यवरांच्या हस्ते पुणेरी पगडी आणि मानपत्र देऊन डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांचा सत्कार करण्यात आला.

ठाण्यातील जवळपास २५ हून अधिक प्रतिष्ठित संस्था, त्यांचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि ठाणेकर नागरिक मोठ्या संख्येने या गौरव सोहळ्याला उपस्थित राहिले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांना डॉक्टरेट प्राप्त झाल्याविषयी पाठवलेल्या संदेशाचे व्यासपीठावरून वाचन करण्यात आले. रविंद्र प्रभुदेसाई यांनी पुढे बोलताना देशी गाईंचे आरोग्यदायी आणि आध्यात्मिक महत्व अधोरेखित करत पितांबरीच्या गोमूत्र कॅम्सूलची निर्मिती आणि परिणामकारकता याविषयी माहिती दिली. तसेच भविष्यात गोमूत्रावर अधिक संशोधन करण्याची आवश्यकता असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या मार्गदर्शनाने व सनातन संस्थेच्या मार्गदर्शन तत्वानुसार गुरुकृपा योगानुसार साधना ही पितांबरीच्या व्यावसायिक वृद्धीसाठी कशी साहाय्यभूत ठरली तसेच ऐहिक आणि आध्यात्मिक अडचणी सुटण्यासाठी साधना का आवश्यक आहे हे देखील त्यांनी सांगितले. दरम्यान, रविंद्र प्रभुदेसाई यांचे उद्योग, सामाजिक व आध्यात्मिक कार्यातील मोलाचे योगदान उलगडणारा लघुपट दाखविण्यात आला. तसेच प्रभुदेसाई यांच्या प्रेरणादायी वाटचालीविषयीचा लेख, सविस्तर माहिती आणि अभिप्रायांचा समावेश असलेली स्मरणिका यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली.

मी देशाचा आणि देश माझा. माझ्या देशासाठी अधिकाधिक काय करता येईल या विचारातून रविंद्रजींनी उद्योग क्षेत्रात कार्य केले. उद्योगात प्रगती करतानाच अनेक सामाजिक, धार्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना साहाय्य केले. असे मत डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी व्यक्त केले.सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र असाव्यात त्याचप्रमाणे आध्यात्म आणि उद्योग यामध्येही विरोधाभास नाही. एका मराठी उद्योजकाने आपल्या उत्पादनाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर झेप घेतली. म्हणून त्यांचा सन्मान हा ठाणेकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा आहे. अशा शब्दात डॉ. काकोडकरांनी प्रभुदेसाई यांचा गौरव केला. रविंद्र प्रभुदेसाई यांच्या उदाहरणातून उद्योग आणि व्यवसाय वेगळे नाहीत हे लक्षात येते. त्यांची ही घौडदौड गुरूंच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. ते भविष्यात व्यवसायात पुष्कळ प्रगती करतील असे मत श्रीकृष्ण चितळे यांनी व्यक्त केले. राजकारणात काम करताना सचोटीने काम करणारे मोजके उद्योजक पाहिले, त्यात रविंद्र प्रभुदेसाई हे एक आहेत. त्यांच्या कामात शिस्त आहे. त्यांच्या कार्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा पगडा आहे.

यशस्वी व्यक्तीमध्ये अहंकारमुक्त नम्रता दुर्मिळ असते, रविंद्रजींमध्ये ती पाहायला मिळते. नेहमी प्रसन्नमुख असणारे उद्योजक ठाण्याला लाभले हे ठाणे शहराचं भाग्य आहे असे गौरवोद्गार आमदार संजय केळकर यांनी काढले. तर समाजातील प्रत्येक घटकाला ते साहाय्य करण्यासाठी प्रयत्नशील असतात. केवळ आर्थिक नव्हे तर वैचारिक धनही त्यांनी समाजाला दिले आहे. असे मत आमदार निरंजन डावखरे यांनी डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांच्याबद्दल व्यक्त केले.

सूत्रसंचालन अभिनेते अधोक्षज कऱ्हाडे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय ढवळीकर यांनी केले.

## महत्वाचे...



### श्री स्वामी समर्थ पतसंस्थेच्या अध्यक्षपदी बेंबळकर, उपाध्यक्षपदी झिंगे

**मोडनिंब, दि. २२ एप्रिल-**

मोडनिंब (ता.माढा) येथील स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली. सोमवारी झालेल्या नवीन मंडळाच्या बैठकीत, अध्यक्षपदी रमेश बेंबळकर तर उपाध्यक्षपदी रामदास झिंगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ए.एस. कोळी यांनी काम पाहिले. संचालक मंडळामध्ये जयवंत समुद्र, राजेंद्र बारवे, रविकांत जाधव, जयवंत ओहोळ, अभिजित गिड्डे, लता काळे, राजू सुरवसे, रुक्मिणी कोळी यांची बिनविरोध निवड झाली. अध्यक्षपदी रमेश बेंबळकर तर उपाध्यक्षपदी रामदास झिंगे यांचा संचालक मंडळाच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.श्री स्वामी समर्थ पतसंस्था जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या या पतसंस्थेचे जवळपास अकराशे सभासद आहेत. संस्थेच्या मोडनिंब येथील मुख्य कार्यालयात झालेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीवेळी संस्थेचे सचिव प्रसाद दप्तरदार, अरुण गिड्डे, अमरनाथ गुरव, डॉ. योगेश गिड्डे, आप्पा ढेकळे, जयंत पाटील, शाखाधिकारी वैभव कुलकर्णी, सोमनाथ साखरे, ॲड. वैभव भांगे, अजित फुले उपस्थित होते.



### देवळालीच्या सरपंचपदी संजयमामा शिंदे गटाचे पोपट बोराडे यांची निवड

**करमाळा, दि.२२ एप्रिल**

करमाळा तालुक्यातील देवळाली ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी पोपट बोराडे यांची ७ विरुद्ध ४ मताने निवड झाली असून या ग्राम पंचायतीवर माजी आमदार संजयमामा शिंदे गटाचा झेंडा फडकला आहे. पोपट बोराडे हे देवळालीचे माजी सरपंच आशिष गायकवाड यांचे समर्थक आहेत. या ग्रामपंचायतीची सदस्य संख्या १३ असून राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी काल निवड प्रक्रिया गुप्त मतदान पद्धतीने घेण्यात आली यामध्ये ११ सदस्यांनी सहभाग नोंदवला.त्यामध्ये ७ मते मिळाल्याने पोपट बोराडे यांची सरपंचपदी निवड झाली आहे. देवळाली ही बहुचर्चित ग्रामपंचायत आहे. या ग्राम पंचायतीचे माजी सरपंच आशिष गायकवाड यांचे काही दिवसापूर्वी सदस्यत्व रद्द करण्यात आले होते, परंतु आयुक्त यांच्याकडे झालेल्या सुनावणीनंतर त्यांच्या आदेशाने त्यांचे सदस्यत्व शाबित राहिलेले आहे. अशा या ग्रामपंचायती वरती माजी आमदार संजय मामा शिंदे यांचा झेंडा फडकल्यामुळे सरपंच पोपट बोराडे व माजी सरपंच आशिष गायकवाड यांच्यावरती अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



### कुसमोड येथील जि.प. लक्ष्मीनगर शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पिलीव, दि. २२ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर येथे मंथन, अभिरुप यासह इतर स्पर्धेत दैदीप्यमान यश संपादन करणाऱ्या विदयार्थनचा सत्कार समारंभ तसेच इयत्ता चौथीमधील विदयार्थीनचा निरोप समारंभ व पहीलीमधील प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा स्वागतोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत घडयाळे होते. यावेळी मंथन परिक्षेत व अभिरुप टीएसी हया परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पहीलीमधील प्रवेश पात्र विदयार्थीनचा सत्कार तसेच इयत्ता चौथीमधील विद्यार्थीनींचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अधक्षस्थानी अध्यक्ष शशिकांत घड्याळे होते. कार्यक्रमास उपाध्यक्ष स्वाती गारुळे, सुशीला मदने, नंदीनी मदने, स्वाती मदने, पल्लवी मदने, पुनम लवटे, ज्ञानेश्वर मदने, विजय मदने, संजय मदने, नंदकिशोर पाटील, उपस्थित होते. यावेळी संजय पाटील, सुशिला मदने, सहशिक्षक सुनिल डुरे व मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांनी विदयार्थीना मार्गदर्शन केले. आभार सुहास कोल्हे यांनी मानले.



### सत्यवान वाघमारे यांना गौरव महाराष्ट्राचा पुरस्कार

**पिलीव, दि. २२ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयाचे शिक्षक सत्यवान वाघमारे यांना शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्था पुनतगाव यांच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिखर आयकॉन अवार्ड हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. सदरचा पुरस्कार प्रदान करतेवेळी या संस्थेचे अध्यक्ष संजय वाघमारे, बाबासाहेब शिरसाठ, सचिव वाघमारे यावेळी उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल शिक्षक सत्यवान वाघमारे यांचे मुख्याध्यापक शिवाजी कापसे, पर्यवेक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ आदींनी अभिनंदन केले.

# 'दामाजी' कडून २ हजार ८०० रूपये प्रमाणे बील जमा

## चेअरमन शिवानंद पाटील; मोफत माती परिक्षण अभियानाचा सांगता समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा,दि.२२ एप्रिल-**

श्रीसंत दामाजी सहकारी साखर कारखान्याकडून २०२४-२५ हंगामातील जानेवारीत ऊस पुरवठा केलेल्या शेतक-यांना प्रतिटन २ हजार ८०० रूपयांप्रमाणे ऊसाचे बिल संबंधीत शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांच्या खात्यात वर्ग केल्याची माहिती चेअरमन शिवानंद पाटील यांनी दिली.

पुढे बोलताना ते म्हणाले, दामाजी कारखान्याने नुकत्याच झालेल्या हंगामामध्ये तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांच्या संपुर्ण ऊसाचे गाळप करुन तालुक्यातील इतर कारखान्याच्या तुलनेत जास्तीचे गाळप केले आहे. कारखान्याकडे कोणताही उपपदार्थ निर्मिती प्रकल्प नसताना इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन नसताना काटकसरीने इतर खर्चाचे नियोजन करून ऊस उत्पादक शेतक-यांच्या विश्वासाला पात्र राहणेसाठी संचालक मंडळाने २ हजार ८०० प्रमाणे ऊसबील दिले आहे. कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी हंगाम अखेर गळीतास आलेल्या शेवटच्या पंधरवाडयाचे संपुर्ण ऊसबिल येत्या दहा ते पंधरा दिवसात देण्याची व्यवस्था करणार असल्याचे सांगितले.

> मुख्यमंत्री यांच्या आवाहनानुसार १०० दिवसांचा कृती आराखडा राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स च्या विद्यमाने मोफत मातीपरीक्षण अभियान झाले. त्याचा सांगता समारंभ बुधवारी दि. २३ एप्रिल रोजी मंगळवेढा (नागणेवाडी) येथील गट ऑफीससमोर होणार आहे. माती परिक्षण न केलेल्या शेतकऱ्यांनी यावेळी ते करुन घ्यावे. अभियानात सहभाग घेतलेल्या शेतक-यांचे माती परीक्षण रिपोर्ट कारखान्याचे कर्मचाऱ्यांमार्फत घरपोच देणेची व्यवस्था करण्यात येईल असे सांगितले.

धनश्री पतसंस्था मंगळवेढा - बठाण, उचेठाण, ब्रम्हपुरी, माचणूर, रहाटेवाडी, तामदर्डी, मुंढेवाडी, धर्मगाव, मल्लेवाडी, ढवळस, घरनिकी, मारापूर, मुढवी, महमदाबाद शे, तांडोर, सिध्दापूर, बोराळे, नंदुर, बालाजीनगर, डोणज, पाठखळ, खुपसंगी, मेटकरवाडी, शिरसी,गोणेवाडी, जुनोनी, नंदेश्वर खडकी, भोसे, हुन्नूर, महमदाबाद हु, रेवेवाडी, लोणार, पडोळकरवाडी, शिरनांदगी, चिक्कलगी, रड्डे, सिध्दनकेरी, मानेवाडी, कात्राळ, मरवडे, कागष्ट, भालेवाडी, डिकसळ, तळसंगी, येड्राव, जित्ती, फटेवाडी, कर्जाळ, हुलजंती, सोड्डी, शिवनगी, आसबेवाडी, हिवरगाव, देगाव, आंधळगाव, गणेशवाडी, येळगी, सलगर बु, लवंगी, सलगर खु, बावची, मारोळी, निंबोणी, पौट, भाळवणी, जालिहाळ, जित्ती, खवे, जंगलगी तसेच महाराष्ट्र गेटकेन मधील पंढरपूर, जत, मोहोळ, द।सोलापूर, उ।सोलापूर व संपुर्ण कर्नाटक गेटकेन, जिजामाता पतसंस्था,मंगळवेढा - मंगळवेढा, खोमनाळ, डोंगरगाव, गुंजेगाव, लेंडवे-चिंचाळे, कचरेवाडी, लक्ष्मी दहिवडी, अकोला, शेलेवाडी, रतनचंद शहा बँक,मंगळवेढा-सांगोला गेटकेन, धनलक्ष्मी पतसंस्था,अरळी-अरळी,दसुर,उब्र्ज, भैरवनाथ पतसंस्था, कंदलगाव-कंदलगाव, अकोला (मंद्रूप) ज्ञानेश्वरी को।क्रे। सोसायटी,मंगळवेढा मागणीनुसार लक्ष्मी महिला पतसंस्था अरळी- मागणीनुसार तसेच शेतक-यांचे मागणीप्रमाणे वैयक्तिक चेक देण्याची व्यवस्था केली आहे. व्हा.चेअरमन तानाजी खरात यांनी नुकत्याच झालेल्या हंगामात दामाजी कारखान्याने हंगामअखेर एकूण ९२ दिवसात २लाख ९७ हजार ६८६ मेट्रीक टन गाळपातून ३ लाख ५ हजार क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झाल्याचे सांगितले. साखर उतारा सव्वा दहा टक्के मिळाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख उपस्थित होते.

# माढा तालुक्यातील१०८ ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदासाठीचे आरक्षण निश्चित

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २२ एप्रिल-**



जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने माढा तालुक्यातील १०८ ग्रामपंचायतींच्या २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीतील सरपंच पदाचे आरक्षण मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी माढा येथील माढेश्वरी मंगल कार्यालयात मंद्रूपचे अप्पर तहसीलदार तथा माढाचे प्रभारी तहसीलदार सुजित नरहरे यांच्या उपस्थितीत काढण्यात आली.

माढा तालुक्यातील १०८ गावच्या सरपंच पदाचे आरक्षण एकाचवेळी काढले आहे. मुदत संपेल त्या पद्धतीने ते पुढील निवडणुकीसाठी लागू असणार आहे. यावेळी अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, खुला या गटातून आरक्षण काढले यामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण असणार आहे. माढा तालुक्यातील ग्रामपंचायतींमधून १४ ठिकाणी अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी १ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी २९ ग्रामपंचायतींमध्ये आरक्षण असणार आहे. खुल्या प्रवर्गासाठी ६४ जागा असणार आहेत. या आरक्षणातून ५० टक्के जागा ज्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असणार आहेत.

**माढा तालुक्यातील १०८ गावातील सरपंच पदासाठी आरक्षित झालेली जागा**

अनुसुचित जाती महिला -

वडाचीवाडी (उबु), चव्हाणवाडी (टे), जाधववाडी (मा), सोलनकरवाडी, लोंढेवाडी, रोपळे खुर्द, महादेववाडी.

पुरूषांसाठी : ढवळस, आकुंबे, विठ्ठलवाडी, अंजनगाव (उ) खैरेवाडी, शिंदेवाडी,वडाचीवाडी (तम) अनुसुचित जमाती - तांदुळवाडी (महिला)

**नागरिकांचा मागास प्रवर्ग -**

**महिला** : रिधोरे,बेंबळे,आलेगांव (बु), चिंचोली, सुर्ली, रोपळे (क),लोणी नाडी, घोटी, अरण, मानेगांव, वेणेगाव, पडसाळी, कापसेवाडी/हटकरवाडी, -व्हळे खुर्द,दहिवली

**पुरूष** : बुद्रुकवाडी,आकुलगाव,केवड चव्हाणवाडी, भेंड, पालवण, घाटणे, कुर्डु, बावी, शिंगेवाडी, भुताष्टे, मुंगशी, उपळाई (बु) मिटकलवाडी, तडवळे,

**सर्वसाधारण महिला**

सुलतानपूर, उपळवाटे, उजनी (टे) चिंचगांव, पिंपळनेर, आहेरगांव भोइंजे, निमगांव (मा),वडोली, निमगांव (टे), बादलेवाडी, उंदरगांव, आलेगांव (खुर्द), शेडशिंगे, दारफळ,टाकळी (टे)वडशिंगे, म्हैसगांव, वाकाव, लऊळ, आढेगांव, आंबाड, भोगेवाडी, सापटणे (टे),तुळशी,बिटरगांव, वेताळवाडी, शेवरे, कुंभेज,वडाचीवाडी (अ.ऊ), रूई, माळेगांव, उपळाई (खु),वरवडे

**सर्वसाधारण पुरूष**

अकोले (बु), जामगांव,खैराव,भोसरे, पिंपळखुटे,गारआकोले,कव्हे,नगोर्ली,महातपूर उजनी (मा), फुटजवळगांव, बारलोणी, चांदज , टेंभुर्णी,आकोले (खु), धानोरे, कन्हेरगांव बैरागवाडी,शिराळ (मा), लव्हे, अंजनगाव (खे), सापटणे (भो) शिराळ (टे) पापनस, चौबे पिंपरी, तांबवे, जाधववाडी (मो) परितेवाडी, रणदिवेवाडी, रांझणी, मोडनिंब, परीते. या सोडतीच्या चिट्ट्या शंभू गणेश तोडकर या विद्यार्थी मुलाच्या हस्ते काढण्यात आल्या. आरक्षण सोडतीची संपूर्ण प्रक्रिया मंद्रूपचे अप्पर तहसीलदार तथा माढाचे प्रभारी तहसीलदार सुजित नरहरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



# अरोग्यदायी जीवनासाठी सेंद्रिय शेतीच फायद्याची

**मल्लिकार्जून मुरडे : रा.स्व.संघाचे भूमी सुपोषण अभियान; ३० गावांत मातीपूजन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२२ एप्रिल-**

रासायनिक खतांमुळे शेतीसह मनुष्य जीवन धोक्यात आले आहे. त्यामुळे अरोग्यदायी जीवनासाठी यापुढे सेंद्रिय शेतीच फायद्याची आहे. त्यामुळे रासायनिक खतांचा वापर बंद करण्याचे आवाहन सोलापूर जिल्हा ग्रामविकास संयोजक मल्लिकार्जुन मुरडे यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ग्राम विकास आयामातर्फे भूमी सुपोषण अभियान राबवण्यात येत आहे. त्यामध्ये गुढीपाडवा ते अक्षय तृतीयेपर्यंत शेतातील मुठभर माती आणून तिचे पूजन करण्यात येत आहे. त्याअंतर्गत तालुक्यातील रुद्देवाडी, बदोला बुद्रुक व बादोला खूर्द येथे कार्यक्रम घेण्यात आला. त्याप्रसंगी श्री. मुरडे बोलत होते. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ग्रामविकास जिल्हा मंडळ सदस्य संदीप कटकधोंड, विश्व हिंदू परिषदेचे तालुका संयोजक मेजर बालाजी राजपूत, भीमाशंकर कत्ते, विठ्ठल कत्ते, व्यंकट सलगरे, आकाश ममनाबाद, गजानन बिराजदार आदीसह शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी जिल्हा मंडळ सदस्य श्री. कटकधोंड यांनी तालुक्यात ३० गावात पूजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## भागुबाई गुंजाळ यांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्याता निधीतून एक लाख रुपये अर्थसहाय्य

**आ. नारायण आबा पाटलांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२२ एप्रिल-**

करमाळा तालुक्यातील सोगावच्या बाहुबली शिवदास गुंजाळ यांना आमदार नारायण आबा पाटील यांच्या प्रयत्नातून वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून एक लाख रुपयाचे अर्थसहाय्य झाले आहे

अनेक दिवसापासून कर्करोगाशी लढत असणाऱ्या भागुबाई गुंजाळ यांच्या उपचारासाठी निधी उपलब्ध झाल्याने त्यांना जीवनदान मिळाले आहे घरची परिस्थिती बेताची असल्याने भागुबाई गुंजाळ यांच्या कुटुंबीयांपुढे दवाखान्याचा खर्च भागवणे अवघड बनले होते परंतु शासनाच्या मुख्यमंत्री सहायता निधीतून रुग्णांकरिता उपलब्ध होणाऱ्या अर्थसाहयामुळे अनेकांचे प्राण वाचत आहे हे संपूर्ण प्रक्रियेत आमदार नारायण आबा पाटील यांनी लक्ष घालून अर्थसाह्य मागणीचे पत्र मुख्यमंत्री कार्यालयाला पाठवले व त्यातून गुंजाळ यांना निधी उपलब्ध झाला. सध्या रुग्ण भागुबाई गुंजाळ हे अहिल्यानगरच्या कर्करोग रुग्णालयात उपचार घेत आहेत त्यांची प्रकृती स्थिर असून पुढील उपचार करता प्राप्त झालेल्या अर्थसाहयामुळे त्यांच्यावरील उपचार सुरू आहेत.

# भाजपाच्या तालुकाध्यक्षपदी योगेश पाटील

**मोडनिंब, दि. २२ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी माढा पूर्व मंडलच्या तालुकाध्यक्षपदी पडसाळीचे सरपंच योगेश पाटील यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी माढा पूर्व मंडलची मोडनिंब (ता.माढा) येथे बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी शशिकांत कल्याणी यांनी यासंबंधीची घोषणा केली.




मंडल अध्यक्ष पदासाठी योगेश पाटील यांच्या व्यतिरिक्त धनाजी लादे, दत्तात्रय जाधव हे दोघे इच्छुक होते. प्रदेश पातळीवर घेण्यात आलेल्या निर्णयात योगेश पाटील यांच्या नावाला हिरवा कंदील देण्यात आला. योगेश पाटील हे पडसाळी (ता. माढा) येथील सरपंचपद भूषवीत आहेत. यावेळी भाजप दत्तात्रय जाधव, ॲड. गणेश सुर्वे, राहूल केदार, माया माने, नंदकुमार मोरे, डॉ. नवनाथ मोहिते, वैभव मोरे, जिल्हा उपाध्यक्ष अमर महाडिक, नितीन शिंगाडे, गुरुदेव शेळके, नितीन भांगे, पांडुरंग राऊत, राहुल जाधव, युवा मोर्चा अध्यक्ष शहाजी यादव, सुरज मोरे, बालाजी माळी, अर्जुन माने, सोमनाथ वाघमारे, नावजी अनभुले, महेश पाटील, भैया पाटील, अजिंक्य पाटील, गणेश मुटकुळे, अमोल देशमुख, लखन पवार उपस्थित होते.

माढा पश्चिमसाठी निवड आज जाहीर झाली नाही.अद्याप माढा पश्चिम साठी इच्छुकांची संख्या जास्त असल्याने वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा करून लवकरच ही निवड जाहीर करू असे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम करणार असल्याचे पाटील यांनी यावेळी म्हणाले. माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर व जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्या सहकार्याने आपली निवड झाल्याचेही ते म्हणाले.

# माळशिरस तालुक्यातील १०३ ग्रामपंचायतीचे सरपंच आरक्षण जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २२ एप्रिल-**



तालुक्यातील १०३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण आज पंचायत समिती सभागृहात प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ, गटविकास अधिकारी आबासाहेब पवार ,नायब तहसीलदार अमोल कदम यांच्या उपस्थितीत काढण्यात आले. तालुक्यात १०३ ग्राम पंचायती असून अनुसुचीत जातीसाठी २४ जागा आरक्षीत करण्यात आल्या त्यामधून अनुसुचीत जाती महिलासाठी १२, नागरीकांच्या मागास प्रवर्गासाठी २८ जागा आरक्षीत करण्यात आल्या त्यामधून १४ जागा नागरीकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षीत करण्यात आल्या. ५० जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी असुन त्यामध्ये महिला प्रवर्गासाठी २५ जागा आरक्षीत करण्यात आल्या. आरक्षणाच्या चिठ्ठ्या लहान मुलांच्या हस्ते काढण्यात आल्या . अनुसुचीत जमाती साठी एक जागा असून ती माळीनगरसाठी आरक्षित झाली.

**संरपच आरक्षण पुढील प्रमाणे**

**अनुसुचित जाती महिला (१२)**

संगम, झिंजेवस्ती ( पिलीव ), बिजवडी, खळवे, कोंढारपट्टा, मांडवे, पठाणवस्ती, संग्रामनगर, भांब, फोंडशिरस, भांबुर्डी, मोटेवाडी (माळशिरस)

**अनुसुचित जाती (१२)**

पिलीव, देशमुखवाडी, उंबरे(दहिगाव), मेडद, माडंकी, मळोली, बचेरी, कोळेगाव, तामशीदवाडी, तांदुळवाडी, पिरळे, पळसमंडळ

**नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला (१४)**

लवंग, पिसेवाडी, गुरसाळे, तोडले, विजयवाडी, गोरडवाडी, गणेशगांव, बागेचीवाडी, निमगाव, सदाशिवनगर, हनुमानवाडी, एकशिव, कोथळे, जाधववाडी.

**नागरिकांचा मागास प्रवर्ग (१४)**

पानीव (घुलेनगर), कुरभावी, लोणंद, खुडुस, चाकोरे (प्रतापनगर), सवतगव्हाण, बोंडले, कचरेवाडी, चौंडेश्वरवाडी, फळवणी, दहिगांव, तांबवे, शिंदेवाडी, सुळेवाडी .

**सर्वसाधारण महिला (२५)**

डोंबाळवाडी (कु),तांबेवाडी, मोरोची, कण्हेर, तिरवंडी, इस्लामपूर,जळभावी, कोंडबावी (वटपळी), आनंदनगर, विझोरी, बाभूळगाव,नेवरे, विठ्ठलवाडी, शेंडेचिंच, चांदापुरी, कुसमोड,काळमवाडी, डोंबाळवाडी (खुडूस),कदमवाडी, वेळापूर, शिंगोर्णी, यशवंतनगर, गिरझणी, धानोरे, उंबरे(वेळापूर),

**सर्वसाधारण (२५)**

फडतरी, गिरवी, गारवाड (मगरवाडी), माळखांबी, धर्मपुरी, मिरे, बांगार्डे, पुरंदावडे, झंजेवाडी ( खुडूस ), उघडेवाडी, पिंपरी, खंडाळी ( दत्तनगर ), मारकडवाडी, येळीव, तरंगफळ, बोरगाव, दसुर, वाघोली, रेडे कळंबोली, लोंढेमोहितेवाडी, वाफेगाव, जांभूड, कारुंडे, माळेवाडी (बोरगाव )

**अनुसुचित-जमाती** (१) माळीनगर

वरील प्रमाणे आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी तालूक्यातील नागरिक उपस्थित होते. यापूर्वी आरक्षण काढण्यात आले आहे परंतु त्यागावाची निवडणूक झाली नाही .अश्या गावांच्या बाबतीत निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे आरक्षण राहणार आहे.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महाळुंगच्या यमाई देवी यात्रेत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २२ एप्रिल-**

महाळुंग (ता. माळशिरस) येथील यमाई देवीचा यात्रेमध्ये विविध धार्मिक व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती महाळुंग-श्रीपूरचे उपनगराध्यक्ष भिमराव रेडे-पाटील यांनी दिली.

याप्रसंगी नगरसेवक निनाद पटवर्धन, प्रकाश नवगिरे, डॉ. स्वाती काटे, जोत्स्ना सावंत -पाटील, कल्पना काटे, उज्वला लोखंडे, रावसाहेब सावंत-पाटील, डॉ. संजय लाटे, नागनाथ काटे, जालिंदर लोखंडे उपस्थित होते. यात्रा महोत्सव माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहोते-पाटील, सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहीते-पाटील, खा. धैर्यशिल मोहीते-पाटील, आ. रणजितसिंह मोहीते-पाटील, शिवतेजसिंह मोहीते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून यात्रेस सोमवार दि. २१ एप्रील रोजी पहाटे यमाई देवीस अभिषेक करून सुरुवात झाली. रात्री आकर्षक दारूकाम व ढोल ताशांच्या निनादात



देवीचा छबीना काढण्यात आला. तर मंगळवार दि.२२ एप्रिल रोजी भव्य कुस्ती स्पर्धा पार पडल्या. यामध्ये पै. सुरज मुलाणी व पै. जमिर मुलाणी यांची ७५ हजारांची निकाली कुस्ती, माईन पटेल व लखन राजमाने ५१ हजार, संग्राम चव्हाण व निकेतन पाटील, प्रशांत चंदनकर व आण्णा सोलनकर, अजय माने व मशिद शेख यांच्या प्रत्येकी ४१ हजार रु बक्षिसाच्या कुस्त्या झाल्या. शुक्रवार दि. २५ रोजी गाण्यांचा कार्यक्रम होणार आहे. संयोजक तेजस रेडे-पाटील, आबा जाधव, गणेश रेडे-पाटील, किरण रेडे-पाटील, नितीन रेडे-पाटील, किशोर रेडे-पाटील, प्रतिक रेडे-पाटील, शामराव भोसले, आण्णा कदम, पै. किशन वडशिंगकर, शहाजी जाधव, आण्णा जाधव परिश्रम घेत आहेत.



## महत्वाचे...



### ग्लोबल टीचर रणजितसिंह डिसले यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

**टेंभुर्णी, दि.२२ एप्रिल-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उजनीनगर येथे दिनांक २२ एप्रिल रोजी ग्लोबल टीचर सध्या अमेरिका येथील हार्वर्ड विद्यापीठात शिक्षण घेत असलेले रणजितसिंह डिसले यांनी इयत्ता ६ वी व ७ वी मधील विद्यार्थ्यांशी झूम मिटींगच्या माध्यमातून थेट संवाद साधला.या संवादसत्रात सरांनी विज्ञान व गणिताच्या संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. विद्यार्थ्यांना आऊट ऑफ बॉक्स थिंकिंगबद्दल प्रेरणादायी मार्गदर्शन केले. संवादादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले. स्नेहा शिंदे हिने अमेरिकेत शिक्षणासाठी दिलेल्या परीक्षा विचारल्या तर यशराज कांबळे याने अमेरिका देशातील शिक्षण पद्धतीबद्दल जाणून घेतले. मुख्याध्यापक विजय लोंढे, वर्षा देशमुख, बालिका नाईकवाडी, संजय लांडगे यांच्यासह अन्य शिक्षकांनी देखील भारत-अमेरिका शिक्षण तुलना, परीक्षा प्रणाली आणि उच्च शिक्षणावरील चर्चा केली. हार्वर्ड ते टेंभुर्णी अंतर, हवामान व वेळ यासंबंधी सरांनी विद्यार्थ्यांना भौगोलिक माहिती दिली. तांत्रिक समन्वयन प्रदीप तांदळे यांनी केले. बालिका नाईकवाडी यांनी आभार मानले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जॉकी सुर्वे, सदस्य स्वराली बोबडे व सर्व सदस्य तसेच केंद्रप्रमुख वरकुटे, मुख्याध्यापक विजय लोंढे यांनी प्रयत्न केले.

### तक्रार देण्यासाठी आलेल्या महिलेचा विनयभंग

**बार्शी, दि २२ एप्रिल**

शहर पोलीस ठाण्याला तक्रार देण्यासाठी आलेल्या पिडीता महिलेचा चक्क पोलीस ठाण्यातच विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार घडल्याबाबत पिडीतेने आरोपी विरुद्ध शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २० एप्रिल रोजी घडली.याप्रकरणी इब्राहीम शेख (रा. मंगळवार पेठ, बार्शी) याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पिडीत महिला शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी आली असताना तेथे आरोपी इब्राहीम शेख हा खुर्चीवर बसलेला होता. फिर्यादीने त्यास खुर्चीवरुन उठण्यास सांगितले असता त्याने अश्लील वर्तन केले. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गर्भवती महिलेला मारहाण

**बार्शी, दि.२२ एप्रिल-**

शहरातील गाडेगाव रोड येथे एका गर्भवती महिलेवर घराबाहेर येऊन नऊजणांनी मिळून शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पीडित महिलेने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० एप्रिल रोजी संध्याकाळी ७ ते रात्री ९.३० च्या दरम्यान, इरफान शेख, बबलू शेख (दोघे रा. बांरगुळे प्लॉट, बार्शी), मोहसीन शेख, इरफान शेखची पत्नी व बहीण, रज्जाक शेख, हसन ऊर्फ बाबा शेख, जावेद मिराज पठाण (सर्व रा. गाडेगाव रोड), यांनी फिर्यादीच्या घरासमोर येऊन गोंधळ घालून जातीवाचक शिवीगाळ केली. रात्री पाठीमागील दरवाज्यातून घरात घुसून पीडित महिलेला मारहाण केली आणि तिच्या उजव्या हातातील तीन ग्रॅमची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली. तसेच तिचा पती यांनी पोलिसांना जुगार अड्ड्याची माहिती दिल्याचा राग मनात धरुन धमक्या दिल्या. महिलेला धमकावणे, मारहाण करणे, जातीवाचक शिवीगाळ करणे व सोन्याची अंगठी जबरदस्तीने घेणे या गंभीर आरोपा विरोधात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस याचा अधिक तपास करीत आहेत.




### जिजाऊ गुरुकुल खांडवीला राज्यस्तरीय द बेस्ट स्कूल पुरस्कार

**बार्शी, दि २२ एप्रिल**

जिजाऊ गुरुकुल खांडवी या शैक्षणिक संस्थेने आपले शैक्षणिक व सर्वांगीण कार्यकौशल सिद्ध करत 'ढहश इशीीं डलहेश्र ुरीव' मिळवून एक मानाचा टप्पा गाठला आहे. ठाणे, मुंबई येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे पार पडलेल्या मेस्टा राज्यस्तरीय अधिवेशनात शाळेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. संभाजी घाडगे सर यांच्या हस्ते स्वीकारण्यात आला. हा सन्मान मिळाल्यामुळे संपूर्ण जिजाऊ गुरुकुल परिवारात आनंदाचे वातावरण असून, विद्यार्थ्यांमध्ये व शिक्षकवृंदामध्ये उत्साहाचे नवीन पर्व सुरु झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार व आधुनिक तंत्रज्ञानाचा समतोल साधत घडवणाऱ्या जिजाऊ गुरुकुलच्या कार्याची ही योग्य दखल असून, यामुळे भविष्यात आणखी प्रेरणादायी उपक्रम राबविण्यास बळ मिळणार आहे.

# समाजमाध्यमांवरील आराखड्यावर विश्वास ठेवू नका

## पालकमंत्री जयकुमार गोरे | कॉरिडोरचा अंतिम आराखडा लवकरच देणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ एप्रिल-**

पंधरा दिवसांपूर्वी सोशल मिडीयावर व्हायरल झालेला पंढरपूरचा कॉरिडोर आराखडा अंतिम नसून त्यावर नागरिकांनी विश्वास ठेवू नये. लवकरच अंतिम आराखडा तयार होऊन तो पंढरपूरातील नागरिकांसाठी उपलब्ध करुन देणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

आषाढी यात्रा नियोजना संदर्भात पालकमंत्र्यांनी सोमवारी (ता.२१) येथे जिल्हा प्रशासनातील आधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते. त्यानंतर पालकमंत्री गोरे यांनी पत्रकारांशी बोलताना वरील माहिती दिली. यावेळी त्यांच्या समवेत माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार समाधान आवताडे आदींसह जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, पंढरपूरात कॉरिडोर होणारच आहे. मात्र तो सर्वांना विश्वासात घेऊन साकारण्यात येणार आहे. कुणाच्याही त्या संदर्भात शंका राहणार नाहीत. कॉरिडोरबाबत कोणालाही अंधारात ठेवले जाणार नाही. तिर्थक्षेत्र पंढरपूरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी कॉरिडोर करण्यात येणार आहे. पंढरपूरकर नागरिकांच्या पुढील पिढ्यानपिढ्यासाठी कॉरिडोरचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे कॉरिडोर बाबत पंढरपूरकर वासियांमध्ये संभ्रमावस्था राहणार नाही असा विश्वास देखील यावेळी पालकमंत्र्यांनी व्यक्त केला.



**प्रयागराजच्या धर्तीवर चंद्रभागा स्वच्छतेचे नियोजन**

कुंभमेळाच्या वेळी प्रयागराज येथे ज्या तंत्रज्ञानाने गंगा नदीतील पाणी स्वच्छ, निर्मळ राहिले. त्या तंत्रज्ञानाचा वापर आषाढी यात्रा कालावधीत करुन येथील चंद्रभागा नदीपात्रातील पाणी स्वच्छ राहिल असे नियोजन केल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. यात्रा कालावधीत खास करुन एआय तंत्रज्ञानाचा देखील पुरेपुर वापर केला जाणार असल्याचेही सांगितले.

**पंढरपुरातील वाळू चोरी सुरूच**

चंद्रभागा नदीची तसेच संपुर्ण वाळवंटाची पाहणी केली. नदीत पाणी किती असावं, नदी कायम स्वच्छ कशी राहील यासाठी निर्णय घेतला. जिल्ह्यातील वाळू चोरी कमी झाली परंतु पंढरपुरातील वाळू चोरी कमी होत नाही. या वाळू चोरीत पोलिस कर्मचारी किंवा महसूल कर्मचारी सहभागी असतात. अशा लोकांना शोधून त्यांच्यावर कारवाई करणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

**यंदा लवकर बैठक घेतली**

यात्रा कालावधीत गर्दीमुळे तात्पुरता मार्ग बनविला जातो. परंतु पर्यायी विशेष मार्गासाठी कायमचा मार्ग काढण्यासाठी निर्णय घेण्यात आला आहे.

**यात्रेमधील कामांचे प्रस्ताव लवकर सादर करा**

यात्रेसाठी म्हणून विविध कामे प्रशासनाकडून केली जातात. त्यामुळे जी कामे करावयाची आहेत त्या बाबतचे प्रस्ताव लवकर सादर करा. जे प्रस्ताव लवकर येतील, ती कामे येत्या २ महिन्यांत पूर्ण होतील. वाखरी पालखी तळ येथे सर्व पालख्या एकत्र येतात. त्याठिकाणी सर्व सोयी सुविधा अधिक देण्याबाबत सूचना केल्या आहेत.पासष्ठ एकर मध्ये शेकडो दिंड्या वास्तव्यास असतात. त्या ठिकाणी वारकऱ्यांना सावली रहावी यासाठी मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्याच्या सुचना प्रशासनास केल्याची माहिती देखील पालकमंत्र्यांनी दिली.

**जुन्या दगडी पुला शेजारी तात्पुरता पुल उभारणार**

येथील चंद्रभागा नदीवरील जुन्या दगडीपुलावर यात्रा कालावधीत अधिक गर्दी होत असते. त्यामुळे तेथे पर्यायी तात्पुरता पूल बनविण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

**नगरपरिषदेने अतिक्रमणे काढावित व स्वच्छता मोहीम राबवावी**

आषाढी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने भाविक येथे दाखल होत असतात. त्यामुळे यात्रेच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. अनेक रस्त्यांवर अतिक्रमणे झालेली आहेत. या अतिक्रमाणामुळे भाविकांना रस्त्यांवरुन जाताना कमालाची त्रास होतो. त्यामुळे नगरपरिषदेने यात्रेच्या अगोदर शहरातील सर्व अतिक्रमणे काढावीत तसेच यात्रा कालावधी मध्ये शहरात सर्वत्र स्वच्छता ठेवण्यासाठी लक्ष केंद्रित करावे त्यामुळे नगरपरिषदेने यात्रेच्या अगोदर शहरातील सर्व अतिक्रमणे काढावीत असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

**साऊंड सिस्टिम लावणार**

यात्रेच्या काळात पंढरपूरात खूप मोठ्या प्रमाणात वारकरी येतात. अनेक लोकांची राहण्याची सोय होत नाही. पंढरपूर शहरात बाहेरगावाहून एकुण सात रस्ते येतात. त्या रस्त्यावर राहण्याची सोय करण्यात येणार आहे. यात्रा कालावधीत फोन लागत नाहीत यामुळे वायफाय टॉवर देखील उभा करण्यात येणार आहे. यात्रा काळात पंढरपुरात भक्तिमय वातावरण राहावे यासाठी साउंड सिस्टम लावणार असे जयकुमार गोरे यांनी सांगितले.

### कॉरिडोरच्या माहिती संदर्भात बैठक घेऊन माहिती देण्याची प्रशांत परिचारकांची मागणी

**पंढरपूर, दि. २२ एप्रिल-**

पंढरपूरातील कॉरिडोर संदर्भात शहरवासियांमध्ये मोठी संभ्रमावस्था आहे. ती संभ्रमावस्था दूर व्हावी यासाठी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्याकडे कॉरिडोर संदर्भात खास बैठकीचे आयोजन करुन आपण स्वत: त्यामध्ये योग्य ते मार्गदर्शन करावे अशी मागणी एका पत्राव्दारे केली आहे. या संदर्भात माजी आमदार परिचारक यांनी सांगितले की, पंढरपूरातील विठ्ठलरुक्मिणी मंदिर परिसरात कॉरिडोर करण्याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केलेली आहे. त्यानंतर शंभर मीटर पर्यंत हा कॉरिडोर करणे बाबतची एक चित्रफित सोशल मिडियावर फिरत आहे. त्यामुळे परिसरातील लोकांमध्ये भिती व संभ्रमाचे वातावरण आहे. याबाबत लोकांना विश्वासात घेऊन व चर्चा करुन प्रशासनाने लोकांचा संभ्रम दूर करणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: पंढरपूर मध्ये येऊन स्थानिक लोकांशी चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन करुन नागरिकांना योग्य माहिती देऊन दिलासा द्यावा, असेही परिचारकांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केलेले आहे. दरम्यान या बाबतचे पत्र आपण सोमवारी (ता.२१) जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले असल्याचेही माजी आमदार परिचारक यांनी सांगितले.

## वसुंधरेचे रक्षणच मानवी अस्तित्व टिकवू शकते : प्रा. डॉ. पालके

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ एप्रिल-**

फ्रेंच राज्यक्रांतीचा भयावह परिणाम पाहून थोर कवी विल्यम वर्डस्वर्थ यांनी निसर्गाच्या सान्निध्यात आश्रय घेतला. निसर्ग व मानवाचे अतूट नाते आहे. वसुंधरेचे रक्षणच मानवी अस्तित्व टिकवू शकते असे प्रतिपादन डॉ. राहुल पालके यांनी केले.

जागतिक वन दिन, जागतिक वसुंधरा दिन व जागतिक हवामान दिनानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालयाच्या परिसरात आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, ग्रंथपाल प्रा. माधव टिपरसे व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.




पालके यांनी पर्यावरणाचे चिंतन करुन मनुष्याच्या मदतीला निसर्ग कसा येतो यासंबंधी विचार प्रकट केले. पुढे बोलताना ते म्हणाले, उत्तर आधुनिक कालखंडात विविध देश औद्योगिक विकासाकडे वाटचाल करताना निर्सगाच्या होत असलेली हानीकडे दुर्लक्ष करीत आहेत. तापमान वाढ ही जागतिक समस्या असून त्यावर नियंत्रण ठेवणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. संकटांवर मात करण्यासाठी उपाययोजना तातडीने करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## वागदरीतील बंदिस्त गटार कामात भ्रष्टाचार

**● चौकशी करुन सरपंच व ग्रामसेवकांवर कारवाईची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ एप्रिल-**

अक्कलकोट पंचायत समितीमधील पाणी पुरवठा खात्याच्या गलथान कारभारामुळे तालुक्यातील वागदरी येथील चौदावा व पंधरावा वित्त आयोगातून करण्यात आलेल्या बंदिस्त गटार कामात मोठा भ्रष्टाचार झाला असून या बंदिस्त गटार कामाची चौकशी करण्याची मागणी तत्कालीन विस्तार अधिकारी शंकर घुगरे यांनी झेडपीच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे केली आहे.

येथील जुने दगडी ओपन गटारीमध्ये निकृष्ट दर्जाचे काम केले आहे. लोकल सिमेंट पाईप ठेऊन नव्याने बंदिस्त गटार काम झाल्याचे दर्शवून खोटे रेकॉर्ड तयार करुन चौदावा व पंधरावा वित्त आयोगाचे पैसे नियमबाह्य काढले आहेत. शासनाच्या चौदावा व पंधरावा वित्त आयोगाचा एक प्रकारे दुरुपयोग करुन भ्रष्टाचार केला आहे. त्यामळे सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या कामाध्ये मुख्यतः चावडी परिसरातील बंदिस्त गटारीचे झालेली कामे, शिक्षक सोसायटी ते डॉक्टर कलशेट्टी यांचे घरापर्यंतची कामे, कस्तुरबाई काटे घर ते महिबुब मंजील घर, विरभद्र मुनोळी घर ते मल्लाबादे घर किंवा हनुमान मंदिरापर्यंत, शेळके घर ते चावडी, मलप्पा निरोली ते शेळके घर, तलाठी कार्यालय ते जनावराचे दवाखाना, नागू वडार घर ते मुंजाळे घर, मागासवर्गीय वस्ती व झोपडपट्टी वस्ती या ठिकाणी करण्यात आलेले कामे हे निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे संगनमताने खोटे रेकॉर्ड तयार करुन निधीचा परस्पर विल्हेवाट लावली आहे.



> बंदिस्त गटारमध्ये कोणत्या ठिकाणी भ्रष्टाचार झाला आहे त्याबाबत मी चौकशी करणार आहे. त्यासाठी तक्रारदार यांना समोर घेवून जावून त्या ठिकाणी पाहणी करतो.
>
> **- विद्याधर राठोड, डेप्युटी इजिनिअर**
> पाणी पुरवठा विभाग, अक्कलकोट.

## जिल्ह्यात सहा टँकरने पाणीपुरवठा; मागील वर्षापेक्षा टँकरच्या संख्येत घट



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

जिल्ह्यात सहा गावातील १५ हजार लोकांना सहा टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मागील वर्षी एप्रिल महिन्यात १४२ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. मात्र, यंदा जिल्ह्यात चांगला पाऊस आणि जलजीवन मिशन अंतर्गत ३५० पेक्षा जास्त कामे झाल्याने मागील वर्षीपेक्षा यंदा टँकरच्या संख्येत घट झाली आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात एक हजारांपेक्षा जास्त कामे सुरू आहेत. त्यातील साडेतीनशेपेक्षा जास्त कामे पूर्ण झाली आहेत. तसेच चांगला पाऊस पडल्याने व जलसंधारणाची कामे झाल्याने यंदाच्या वर्षी पाणी टंचाईच्या झळा कमी बसत आहेत. मात्र, जिल्ह्यातील अनेक भागात अल्पप्रमाणात पाऊस पडला आहे. तसेच त्या भागात जलजीवन मिशनचे कामे पूर्ण झाली नाहीत, अशा गावांना पाणी टंचाईच्या झळा आहेत.त्यामुळे जिल्हा परिषदेने तत्काळ जलजीवन मिशनची कामे पूर्ण करून पाण्याची सोय करावी, अशी मागणी होत आहे.परिसरातील पाणी पातळी घटल्याने विहीर, बोर कोरडे पडले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत या गावांच्या आजूबाजूच्या गावांनाही टँकरने पाणीपुरवठा करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून पूर्वतयारी करण्यात येत आहे. गतवर्षी चांगला पाऊस पडल्याने यंदाच्या वर्षी कमी प्रमाणात पाणीटंचाई भासत आहे. मात्र,उन्हाळ्यांच्या अखेर पाणीटंचाई भासेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

- गावे : गारवाड, मारवाडी, येड्राव, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी,
- मागील वर्षी टँकर संख्या : १४२
- सध्या सुरु असलेले टँकर : ६
- लोकसंख्या : १५ हजार

**एप्रिल महिन्यात सहा टँकरने पाणीपुरवठा**

गेल्यावर्षी या महिन्यात १४२ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. गतवर्षी चांगला पाऊस पडल्याने आणि जलजीवनची साडेतीनशेपेक्षा जास्त कामे पूर्ण झाल्याने यंदा एप्रिल महिन्यात फक्त सहा टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

**- संजय धनशेट्टी,**
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जि. प. सोलापूर

## अरण येथे शुक्रवारी चंदनउटी सोहळा

**पालकमंत्री जयकुमार गोरे व दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांची प्रमुख उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२२ एप्रिल-**

तीर्थक्षेत्री अरण (ता .माढा) येथे चैत्र महिन्यात दरवर्षी होणारा चंदनउटी सोहळा यंदा शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे आणि बहुजन कल्याण व दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सावता महाराज वसेकर, प्रभू महाराज माळी यांनी दिली.

तीर्थक्षेत्र अरण हे वारकरी संत परंपरेचा उगमस्थळ मानले जाते. संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत नामदेव यांच्या समकालीन संत तसेच संतसाहित्यातील पहिला अभंग लिहिणारे संत शिरोमणी सावता महाराज यांचे हे जन्म व संजीवन समाधीस्थान आहे. त्यांच्या संजीवन समाधीस्थळी चैत्र महिन्यात चंदन उटी लावण्याची परंपरा गेल्या शेकडो वर्षांपासून सुरू आहे. या निमित्ताने परिसरातील अनेक मानाची गावे आणि हजारो भाविक मोठ्या श्रद्धेने या सोहळ्यास उपस्थित राहतात.

या पवित्र पर्वानिमित्त संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्ट व संत शिरोमणी सावता महाराज भक्त परिवार यांच्या वतीने भक्त परिवार मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्याला ग्रामविकास मंत्री श्री. गोरे, दुग्धविकास मंत्री श्री.सावे, आ. योगेश टिळेकर तसेच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच महाराष्ट्राच्या विविध भागांतून हजारो भाविक या सोहळ्यात सहभागी होणार असल्याचेही ट्रस्टचे सावता महाराज वसेकर प्रभू महाराज माळी यांनी सांगितले.